# || श्रीमद्विद्यारण्यमुनिप्रणीत सार्थ पंचदशी ||

## (भाग पहिला)




**शुध्द, स्थिर, व्यापक आणि परिपूर्ण म्हणजे परमार्थ.**

www.vchindia.com

**Vinayanand Charitable Home India 416203**

"Kaivalya", 924/30, Vishalnagar, **HUPARI.** Dist. Kolhapur.(MS)

**Phone : 0230-2450365 Mob. 0-932500-5525**
**Email: vchindia@gmail.com**

## Guruparampara of Dakshinamnaya Sringeri Sharada Peetham

Divine Group=Lord Sadashiva-Lord Narayana-Lord Brahma
Semi-Divine Group=Vasishta Maharishi-Shakti Maharishi-
Parashara Maharishi-Veda Vyasa-Sri Shuka Acharya-
Sri Gaudapada Acharya-Sri Govinda Bhagavatpada-Sri Shankara Bhagavatpada

| S.N | Jagadgurus of the Sringeri Sharada Peetham | Period of Reign (CE) |
|---|---|---|
| 01. | Sri Shankara Bhagavatpada | 0820 (videha-mukti) |
| 02. | Sri Sureshwaracharya | 0820 - 0834 |
| 03. | Sri Nityabodaghana | 0834 - 0848 |
| 04. | Sri Jnanaghana | 0848 - 0910 |
| 05. | Sri Jnanottama | 0910 - 0954 |
| 06. | Sri Jnanagiri | 0954 - 1038 |
| 07. | Sri Simhagiri | 1038 - 1098 |
| 08. | Sri Ishwara Tirtha | 1098 - 1146 |
| 09. | Sri Nrisimha Tirtha | 1146 - 1229 |
| 10. | Sri Vidya Shankara Tirtha | 1229 - 1333 |
| 11. | Sri Bharati Krishna Tirtha | 1333 - 1380 |
| 12. | Sri Vidyaranya | 1380 - 1386 |
| 13. | Sri Chandrasekhara Bharati I | 1386 - 1389 |
| 14. | Sri Nrisimha Bharati I | 1389 - 1408 |
| 15. | Sri Puroshottama Bharati I | 1408 - 1448 |
| 16. | Sri Shankara Bharati | 1448 - 1455 |
| 17. | Sri Chandrasekhara Bharati II | 1455 - 1464 |
| 18. | Sri Nrisimha Bharati II | 1464 - 1479 |
| 19. | Sri Puroshottama Bharati II | 1479 - 1517 |
| 20. | Sri Ramachandra Bharati | 1517 - 1560 |
| 21. | Sri Nrisimha Bharati III | 1560 - 1573 |
| 22. | Sri Nrisimha Bharati IV | 1573 - 1576 |
| 23. | Sri Nrisimha Bharati V | 1576 - 1600 |
| 24. | Sri Abhinava Nrisimha Bharati | 1600 - 1623 |
| 25. | Sri Sacchidananda Bharati I | 1623 - 1663 |
| 26. | Sri Nrisimha Bharati VI | 1663 - 1706 |
| 27. | Sri Sacchidananda Bharati II | 1706 - 1741 |
| 28. | Sri Abhinava Sacchidananda Bharati I | 1741 - 1767 |
| 29. | Sri Nrisimha Bharati VII | 1767 - 1770 |
| 30. | Sri Sacchidananda Bharati III | 1770 - 1814 |
| 31. | Sri Abhinava Sacchidananda Bharati II | 1814 - 1817 |
| 32. | Sri Nrisimha Bharati VIII | 1817 - 1879 |
| 33. | Sri Sacchidananda Shivabhinava Nrisimha Bharati | 1879 - 1912 |
| 34. | Sri Chandrasekhara Bharati III | 1912 - 1954 |
| 35. | Sri Abhinava Vidyatirtha | 1954 - 1989 |
| 36. | Sri Bharati Tirtha | 1989 - Present |
| | Url:www.sringeri.net | |

## || श्री सद्‌गुरु प्रसन्न ||

श्री सद्‌गुरु निरंजन महाराजांचे 14 वे पुण्यतिथी निमित्त वेदान्तशास्त्राची परिभाषा ' **पंचदशी** ' या अप्रतिम ग्रंथाचा **पहिला भाग** प्रकाशन करताना आनंद होत आहे. पंचदशीचीं एकंदर पंधरा प्रकरणें आहेत. पहिलीं सहा प्रकरणें श्री विद्यारण्यांची व पुढची नऊ प्रकरणें त्यांच्या भारतीतीर्थ नामक गुरुंची आहेत. विद्यारण्यांचे पूर्वाश्रमांत माधवाचार्य असे नांव होतें. कर्नाटकात पम्पा सरोवरासमीप पूर्वी किष्किंधा म्हणून जी वालीची प्रख्यात राजधानी होती, तीच या आचार्यांच्या काली विजयनगर या नांवानें वीरबुक्क राजाची प्रसिद्ध राजधानी झाली. हल्लीं (विजयनगर) हम्पी येथे विरुपाक्षाचे भव्य मंदिर असून त्याची ख्याति अजूनपर्यंत जशीच्या तशी आहे. राजा वीरबुक्क स्वतः जरी महाशूर होता, तरी त्याला माधवाचार्यांचे साह्य फार झाले. प्रस्तुत पुरुषासारखा अलौकिक मंत्री मिळाल्यामुळेंच त्यानें अनेक शत्रूंना पादाक्रांत करुन सोडिलें. या माधवाचार्यांच्या जननीचें नांव श्रीमती, पित्याचें नांव मायण व बंधूचीं नांवें सायण व सोमनाथ अशीं होतीं. यांची यजुर्वेदाची तैत्तिरीय शाखा असून बौधायन सूत्र व भारद्वाज गोत्र होतें. वीरबुक्काचा प्रधान या नात्यानें जरी त्यांनीं आपल्या पूर्व आयुष्याचा बराच भाग घालविला तरी, तें त्या वेळींही ग्रंथलेखनाचें काम करीत होते. ऋग्वेदादि तीन वेदांचीं भाष्यें त्यांनीं वीरबुक्काच्या हयातींत व त्यांच्या आज्ञेवरुन केलीं. पुढें राजाचें देहावसान झालें, तथापि त्याचा हरिहर नामक पुत्र राज्य सांभाळण्यास समर्थ होईतों माधवाचार्यांनीं त्यास सोडलें नाहीं, व त्या अवधींत त्यांनीं अथर्ववेदाचें भाष्य लिहिलें. पुढें जन्माचें सार्थक करण्याकरितां त्यांनीं गीतेचे प्रसिद्ध टीकाकार शंकरानन्द यांच्यापासून दीक्षा घेतली व चतुर्थाश्रम स्वीकारला. प्रस्तुत ग्रंथ चतुर्थाश्रम घेतल्यानंतरच लिहिलेला आहे. श्री भारतीतीर्थ हें त्यांचे पूर्वमीमांसेचे गुरु होत. या माधवाचार्यांनीं लिहिलले ग्रंथ 1 ऋग्वेदभाष्य, 2 यजुर्वेदभाष्य, 3 सामवेदभाष्य, 4 अथर्ववेदभाष्य, 5 चारीवेदांच्या ऐतरेय, तैत्तिरेय, ताण्ड्य, शतपथ, इत्यादि ब्राह्मणांचें भाष्य, 6 पराशरस्मृतिभाष्य, 7 जैमिनीयन्यायमालाविस्तार, 8 सर्वदर्शनसंग्रह, 9 अनुभूतिप्रकाश, 10 दशोपनिषद्दीपिका, 11 ब्रह्मगीता, 12 माधवीयवृत्ति (व्याकरण ), 13 जीवन्मुक्ति विवेक, 14 अपरोक्षानुभूतिटीका, 15 पंचदशी ( पहिली सहा प्रकरणें ), 16 श्रीमच्छंकरदिग्विजय इत्यादि.

चतुर्थाश्रम घेतल्यावर त्यांनीं अद्वैतमतास पुनरपि दृढ केलें. श्रीमच्छंकराचार्यांपासून शृंगेरी पीठाचे (सन 1380-1386) बारावे अधिपति होत.इ.स.1336 च्या हंपीच्या देवळातील शिलालेख व दानाच्या ताम्रपटावरुन या पुण्यवान् शरीराचा वास इहलोकीं अंदाजे नव्वद वर्षे झाला असे अनुमान होतें. या दिव्य पुरुषाची भाषा फार सोपी व प्रासादिक आहे. कलियुगांत एवढा विद्वान् पुरुष क्वचितच् आढळतो.या प्रासादिक वाणीचा सर्व वाचकांना लाभ व्हावा हि सद्गुरु चरणी प्रार्थना.

मार्गशीर्ष कृ।।.7 शके 1933, शनिवार दि. 17-12-2011

आपला विनम्र
विनयानंद 9423231625
स्थळः- श्री सद्गुरु निरंजन महाराज आश्रम मौजे वडगांव, जिल्हा कोल्हापूर फोन नं. 0230-2357118 मोबाईल 09420335748

**Trust Reg.no.E-2570/Kolhapur/28-11-2011**

**पंचदशी**
(भाग पहिला)
अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरण | श्लोक संख्या |
|---|---|---|
| 01 | प्रत्यक् तत्त्वविवेक | 065 |
| 02 | पञ्चमहाभूत विवेक | 109 |
| 03 | पञ्चकोश विवेक | 043 |
| 04 | द्वैत विवेक | 069 |
| 05 | महावाक्य विवेक | 008 |
| 06 | चित्र दीप | 290 |
| | एकुण श्लोक संख्या | 584 |

**अथ प्रथमोऽध्याय: ||**

**प्रत्यक् तत्त्व विवेक: |**

**ॐ नम: श्री शङ्करानन्दगुरुपादाम्बु जन्मने |**
**सविलासमहामोहग्राहग्रासैककर्मणे ||1-1||**

कार्यासहवर्तमान मूल अज्ञानरुप मोठ्या मकराचा नाश करणें हेंच ज्याचें मुख्य कर्म आहे अशा श्रीमच्छंकरानन्दगुरुंच्या पादकमलाला माझा नमस्कार असो.

**तत्पादाम्बुरुहद्वन्द्वसेवानिर्मलचेतसाम् |**
**सुखबोधाय तत्त्वस्य विवेको ऽयं विधीयते ||1-2||**

त्या गुरुंच्या पादकमलद्वयाची सेवा केल्यानें ज्यांचें चित्त निर्मल झालें आहे त्यांना अनायासानें बोध व्हावा म्हणून हा तत्त्वाचा विचार मी करितों.

**शब्दस्पर्शादयो वेद्या वैचित्र्याज्जागरे पृथक् |**
**ततो विभक्ता तत्संविदेकरुप्यान्न भिद्यते ||1-3||**

जाग्रदवस्थेमध्यें ज्ञात ( ज्ञानाला विषय ) होणारे ( शब्द, स्पर्श, रुप, रस व गंध हे ) विषय निरनिराळ्या स्वरुपाचे असल्यामुळें परस्पर भिन्न आहेत. पण त्यांच्याहून अगदीं ( स्वरुपत: ) पृथक् असणारें त्यांचें ज्ञान (जाणीव ) एक- ( ज्ञान- ) रुपानेंच असल्यामुळें परस्पर भिन्न नाहीं.

**तथा स्वप्ने ऽत्र वेद्यं तु न स्थिरं जागरे स्थिरम् |**
**तद्भेदो ऽतस्तयो: संविदेकरूपा न भिद्यते ||1-4||**

त्याचप्रमाणें स्वप्नामध्यें ( सर्व विषय परस्पर भिन्न व ज्ञान एक ). स्वप्नांत विषय स्थिर नसतो पण तोच जाग्रतींत स्थिर असतो; आणि त्यामुळेंच ह्या दोन अवस्था भिन्न झाल्या आहेत. ( परंतु ) त्यांतील एकरुपानें रहाणारें ज्ञान भिन्न नाहीं.

**सुप्तोत्थितस्य सौषुप्ततमोबोधो भवेत्स्मृति: |**
**सा चाऽवबुद्धविषयाऽवबुद्धं तत्तदा तम: ||1-5||**

निजून उठलेला पुरुष ' मला कांहीं समजलें नाहीं ' असा तमोविषयक जो आपला अनुभव सांगत असतो ती स्मृति होय. स्मृति तर ( सर्वदां ) अनुभविलेल्या विषयांचीच होते. म्हणून त्या काळीं तमाचा ( अज्ञानाचा ) अनुभव आला.

**स बोधो विषयाद्भिन्नो न बोधात्स्वप्नबोधवत् |**
**एवं स्थानत्रयेऽप्येका संवित्तद्वद्दिनान्तरे ||1-6||**

तो सुषुप्तीतील बोध स्वविषयाहून (अज्ञानाहून ) पृथक् आहे.
पण स्वप्नबोधाप्रमाणेंच बोधाहून पृथक् नाहीं. ह्याप्रमाणे एका दिवसांत होण्या-या तिन्ही अवस्थेंत जसे ज्ञान एकच असतें त्याप्रमाणेंच तें अन्य दिवशीहि एकच.

**मासाब्दयुगकल्पेषु गताऽगम्येष्वनेकधा ।**
**नोदेति नास्तमेत्येका संविदेषा स्वयंप्रभा ।।1-7।।**

हें ( साक्षि, कूटस्थ ) ज्ञान, अनेक प्रकारे होऊन गेलेले व होणारे जे महिने, वर्षे युगें व कल्प त्यांत कधी उत्पन्न होत नाहीं व कधी नष्टही होत नाहीं. तर ते सर्वदा एकाच रुपानें असतें व तें स्वयंप्रकाश आहे.

**इयमात्मा परानन्दः परप्रेमास्पदं यतः ।**
**मा न भूवं हि भूयासमिति प्रेमाऽऽत्मनीक्ष्यते ।।1-8।।**

ही संवित्च आत्मा होय. हा अत्यन्त प्रेमाचे स्थान असल्यामुळें श्रेष्ठ आनंद आहे. कारण मी नसावें असें (कधींही ) नाहीं तर
(मी सर्वदां ) असावें असे स्वतःविषयी (प्रत्येकाचें ) प्रेम दिसतें.

**तत्प्रेमात्मार्थमन्यत्र नैवमन्यार्थमात्मनि ।**
**अतस्तत्परमं तेन परमानन्दताऽऽत्मनः ।।1-9।।**

पुत्रादि अन्य विषयांच्या ठिकाणीं जें प्रेम असतें तें आत्म्याकरितां असतें. ( पण ) आत्म्याच्या ठिकाणीं तें अन्यांकरितां नसतें. म्हणून तें परम ( श्रेष्ठ, निरतिशय ) होय. आणि यावरुनच आत्म्याची परमानंदता सिद्ध होते.

**इत्थं सच्चित्परानन्द आत्मा युक्त्या तथाविधम् ।**
**परं ब्रह्म तयोश्चैक्यं श्रुत्यन्तेषूपदिश्यते ।।1-10।।**

ह्याप्रमाणें आत्मा सत्, चित् व आनंद आहे असें युक्तीनें सिद्ध झालें. परब्रह्महि तसेंच म्हणजे सच्चिदानंदरुप आहे. आणि त्या उभयतांचें ऐक्य वेदान्तामध्यें सांगितलें आहे.

**अभाने न परं प्रेम भाने न विषये स्पृहा।**
**अतो भानेऽप्यभाताऽसौ परमानन्दताऽऽत्मनः ।।1-11।।**

आत्म्याच्या परमानंदाचें भान जर नसतें तर त्याविषयीं परम प्रेम वाटलें नसतें व भान असतें तर विषयांविषयीं इच्छा झाली नसती. यास्तव भासत असूनहि ही आत्म्याची परमानंदता भासत नसल्यासारखीच आहे.

**अध्येतृवर्गमध्यस्थपुत्रअध्ययनशब्दवत् ।**
**भानेऽप्यभानं भानस्य प्रतिबन्धेन युज्यते ।।1-12।।**

वेदपाठकांच्या वर्गांतील अध्ययन करणा-या स्वपुत्राच्या शब्दाप्रमाणें भानाला प्रतिबंध झाला असतां त्याचें ( सामान्यतः ) भान असलें तरी ( विशेषतः ) अभान होऊं शकतें.

**प्रतिबन्धो ऽस्तिभातीतिव्यवहारार्हवस्तुनि ।**
**तन्निरस्य विरुद्धस्य तस्योत्पादनमुच्यते ।।1-13।।**

आहे, भासतें; अशा व्यवहारास योग्य असलेल्या वस्तू - विषयीं, अस्तित्वादि व्यवहाराचा निरास करुन त्याच्या विरुद्ध ( म्ह. नाहीं, भासत नाहीं असा ) व्यवहार होणें हाच प्रतिबंध होय; असें म्हणतात.

**तस्य हेतुः समानाभिहारः पुत्रध्वनिश्रुतौ।**
**इहाऽनादिरविद्यैव व्यामोहैकनिबन्धनम् ।।1-14।।**

पुत्रध्वनि ऐकूं न येण्यास सर्वांचें एकदम म्हणणें हें कारण; व आत्म्याच्या परमानंदाचें पूर्ण भान न होण्यास विपरीत भावनांचें मुख्य कारण जी अनादि अविद्या तेंच कारण आहे.

**चिदानन्दमयब्रह्मप्रतिबिम्बसमन्विता।**
**तमोरजःसत्त्वगुणा प्रकृतिर्द्विविधा च सा ।।1-15।।**

चिदानंदमय जें ब्रह्म त्याच्या प्रतिच्छायेनें युक्त व तम, रज व सत्त्व या गुणांची साम्यावस्था अशी जी माया तिला प्रकृति असें म्हणतात; व ती दोन प्रकारची आहे.

**सत्त्वशुद्ध्याविशुद्धिभ्यां मायाविद्ये च ते मते।**
**मायाबिम्बो वशी कृत्य तां स्यात्सर्वज्ञ ईश्वरः ।।1-16।।**

सत्त्वगुणाची शुद्धि व अशुद्धि यांच्या योगानें माया व अविद्या असे तिचे दोन भेद मानिले आहेत. मायेंत प्रतिबिंबित झालेला आत्मा ह्या मायेला आपल्या स्वाधीन ठेऊन सर्वज्ञ व ईश्वर होतो.

**अविद्यावशगस्त्वन्यस्तद्वैचित्र्यादनेकधा।**
**सा कारणशरीरं स्यात् प्राज्ञस्तत्राऽभिमानवान् ।।1-17।।**

पण अविद्येच्या अधीन झालेला चिदात्मा जीव होतो. अविद्या विचित्र ( नानारुपाची ) असल्यामुळें तोहि अनेक प्रकारचा होतो. ही अविद्याच

कारणशरीर होय; व या कारणशरीरावर अभिमान ठेवणारा प्राज्ञ होतो.

**तमःप्रधानप्रकृतेस्तद्भोगायेश्वराज्ञया।**
**वियत्पवनतेजोऽम्बुभुवो भूतानि जज्ञिरे ।।1-18।।**

त्या प्राज्ञांच्या भोगाकरितां जींत तमोगुण प्रधान आहे अशा प्रकृतीपासून ईश्वराच्या आज्ञेनें आकाश, वायु, तेज, उदक व पृथ्वी अशीं भूतें प्रकट झालीं.

**सत्त्वांशैः पञ्चभिस्तेषां क्रमाद्धीन्द्रियपञ्चकम् ।**
**श्रोत्रत्वगक्षिरसनघ्राणाख्यमुपजायते ।।1-19।।**

त्या आकाशादि पांच भूतांच्या सत्त्वांशांपासून क्रमानें श्रोत्र, त्वक्, नेत्र, रसना, व घ्राण या नांवांचीं पांच ज्ञानेंद्रियें उत्पन्न होतात.

**तैरन्तःकरणं सर्वैर्वृत्तिभेदेन तद्द्विधा।**
**मनो विमर्शरुपं स्याद्बुद्धिः स्यान्निश्चयात्मिका ।।1-20।।**

त्या भूतांच्या पांचहि सत्त्वांशांपासून अंतःकरण होतें. भिन्न वृत्तीमुळें तें दोन प्रकारचें झालें आहे. संशयात्मक जी वृत्ति तें मन होय. व निश्चयरुप अशी जी वृत्ति तिला बुद्धि म्हणतात.

**रजोंऽशैः पञ्चभिस्तेषां क्रमात्कर्मेन्द्रियाणि तु।**
**वाक्पाणिपादपायूपस्थाभिधानानि जज्ञिरे ।।1-21।।**

व ह्या भूतांच्या पांच रजोगुणांपासून क्रमानें वाणि, हस्त, पाद, पायु व उपस्थ या नांवांचीं पांच कर्मेंद्रियें झालीं.

**तैः सर्वैः सहितैः प्राणो वृत्तिभेदात्स पञ्चधा ।**
**प्राणोऽपानः समानश्चोदानव्यानौ च ते पुनः ।।1-22।।**

त्या सर्व भूतांच्या रजोंशसमूहापासून प्राण होतो. निरनिराळ्या वृत्तींमुळें त्याचे पांच प्रकार झाले आहेत. प्राण, अपान व समान आणि तसेंच उदान व व्यान हे ते पांच प्रकार होत.

**बुद्धिकर्मेन्द्रियप्राणपञ्चकैर्मनसा धिया।**
**शरीरं सप्तदशभिः सूक्ष्मं तल्लिङ्गमुच्यते।।1-23।।**

पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच प्राण, मन व बुद्धि असे सतरा पदार्थ मिळून सूक्ष्म शरीर होतें. त्यालाच लिंगशरीर असेंहि म्हणतात.

**प्राज्ञस्तत्राभिमानेन तैजसत्वं प्रपद्यते।**
**हिरण्यगर्भतामीशस्तयोर्व्यष्टिसमष्टिता ।।1-24।।**

त्या लिंग शरीरावर अभिमान ठेवल्यानें प्राज्ञ तैजस होतो; व ईश्वर हिरण्यगर्भ होतो. त्यांतील प्राज्ञ हा व्यष्टि व ईश्वर समष्टि आहे.

**समष्टिरीशः सर्वेषां स्वात्मतादात्म्यवेदनात्।**
**तदभावात्ततोऽन्ये तु कथ्यन्ते व्यष्टिसंज्ञया ।।1-25।।**

सर्व लिंगशरीरोपाधिक तैजस मीच आहें; ( मी व ते एकच ) असें मानीत असल्यामुळें ईश्वर समष्टि होतो; व त्याहून अन्य जे जीव ( तैजस ) त्यांना, ईश्वराप्रमाणें सर्व तादात्म्यज्ञान नसल्यामुळें व्यष्टि हें नांव देतात.

**तद्भोगाय पुनर्भोग्यभोगायतनजन्मने।**
**पञ्चीकरोति भगवान् प्रत्येकं वियदादिकम् ।।1-26।।**

भगवान् ( ईश्वर ) पुनः जीवांच्या भोगांकरितां अन्नादि भोग्य पदार्थ व स्थूल शरीररुप भोगसाधनें तयार व्हावीं म्हणून आकाशादि प्रत्येक भूताचें पंचीकरण करितो.

**द्विधा विधाय चैकैकं चतुर्धा प्रथमं पुनः।**
**स्वस्वेतरद्वितीयांशैर्योजनात्पञ्च पञ्च ते ।।1-27।।**

प्रत्येक भूताचे सारखे दोन भाग करुन पुनः त्यांतील प्रथम भागाचे चार चार भाग करुन निराळ्या ठेविलेल्या प्रत्येक अर्ध भागांत अन्य चार भाग मिळविले असतां तें प्रत्येक भूत विशेष प्रमाणानें मिश्र होऊन प्रत्येकांत पांचहि भूतांचे अंश येतात.

**तैरण्डस्तत्र भुवनं भोग्यभोगाश्रयोद्भवः।**
**हिरण्यगर्भः स्थूले ऽस्मिन् देहे वैश्वानरो भवेत् ।**
**तैजसा विश्वतां याता देवतिर्यङ्नरादयः।।1-28।।**

त्या पंचीकृत भूतांपासून ब्रह्माण्डाची उत्पत्ति होते. ब्रह्माण्डामध्यें चवदा भुवनें उत्पन्न होतात; व त्या भुवनांमध्यें भोग्य पदार्थ व शरीरें यांची उत्पत्ति होते. या स्थूल देहांत हिरण्यगर्भ वैश्वानर होतो. व तैजस विश्व होतात. त्यांचे देव, तिर्यक्, मनुष्य इत्यादि अनेक भेद आहेत.

**ते पराग्दर्शिनः प्रत्यक्तत्त्वबोधविवर्जिताः ।**
**कुर्वते कर्म भोगाय कर्म कर्तुं च भुञ्जते।।1-29।।**

ते सर्वहि विश्व बहिर्वृत्ति असतात. म्हणजे केवल शब्दादि बाह्य विषयांचाच

अनुभव घेतात. पण त्यामुळें ते आत्मतत्त्वज्ञानरहित होतात. ते सुखादि भोगांकरितां कर्म करतात व कर्म करण्याकरितां भोग भोगतात.

**नद्यां कीटा इवावर्तादावर्तान्तरमाशु ते।**
**व्रजन्तो जन्मनो जन्म लभन्ते नैव निर्वृतिम् ।।1-30।।**

नदीमध्यें भोंव-यांत सांपडलेले किडे जसे सपाट्यानें एका गरक्यांतून दुस-यांत दुस-यांतून तिस-यांत फिरत असतात; त्याप्रमाणें ते एका जन्मांतून दुस-या जन्मांत दुस-यांतून तिस-या असे सारखे फिरत असतात व त्यांना कधींच शांति मिळत नाहीं.

**सत्कर्मपरिपाकात्ते करुणानिधिनोद्धृताः।**
**प्राप्य तीरतरुच्छायां विश्राम्यन्ति यथासुखम् ।।1-31।।**

ज्याप्रमाणें किड्यांच्या कांहीं पूर्वपुण्यामुळें त्यांना कोणीं एखाद्या करुणानिधि पुरुषानें नदींतून वर काढून तीरावरील वृक्षाच्या छायेमध्यें नेऊन ठेविलें असतां, ते मोठ्या आनंदानें विश्रान्ति घेतात;

**उपदेशमवाप्यैवमाचार्यात्तत्त्वदर्शिनः।**
**पञ्चकोशविवेकेन लभन्ते निर्वृतिं पराम् ।।1-32।।**

त्याचप्रमाणें आत्मानुभवी आचार्यांपासून उपदेश घेऊन पांच कोशांचा विवेक केल्यानें जीवांना श्रेष्ठ सुख मिळतें.

**अन्नं प्राणो मनो बुद्धिरानन्दश्चेति पञ्च ते।**
**कोशास्तैरावृतः स्वात्मा विस्मृत्या संसृतिं व्रजेत् ।।1-33।।**

अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय असे ते पांच कोश आहेत. त्या कोशांनीं आच्छादित झालेला स्वात्मा स्वतःच्या स्वरुपाचें विस्मरण पडल्यामुळें संसारांत पडतो.

**स्यात्पञ्चीकृतभूतोत्थो देहः स्थूलो ऽन्न संज्ञकः।**
**लिङ्गे तु राजसैः प्राणैः प्राणः कर्मेन्द्रियैः सह ।।1-34।।**

पंचीकृत भूतांपासून उत्पन्न झालेल्या स्थूल देहाला अन्नमय कोश असें म्हणतात; व सूक्ष्म शरीरांतील कर्मेंद्रियांसह राजस प्राणांनी प्राणमय कोश होतो.

**सात्त्विकैर्धीन्द्रियैः साकं विमर्शात्मा मनोमयः।**
**तैरेव साकं विज्ञानमयो धीर्निश्चयात्मिका ।।1-35।।**

संशयात्मक मन सात्त्विक ज्ञानेंद्रियांसह मनोमय कोश होतें; व

निश्चयात्मक बुद्धि ज्ञानेंद्रियांसह विज्ञानमय कोश होते.

**कारणे सत्त्वमानन्दमयो मोदादिवृत्तिभिः।**
**तत्तत्कोशैस्तु तादात्म्यादात्मा तत्तन्मयो भवेत् ।।1-36।।**

कारण शरीरांत जें सत्त्व असतें त्याचा मोदादिवृत्तींसह आनंदमय कोश होतो.आत्मा त्या त्या स्थूलादिं कोशाशीं तद्रूप झाला असतां तत्तन्मय होतो.

**अन्वयव्यतिरेकाभ्यां पञ्चकोशविवेकतः।**
**स्वात्मानं तत उद्धृत्य परं ब्रह्म प्रपद्यते ।।1-37।।**

अन्वय व व्यतिरेक यांच्या योगानें पांचही कोशांचें पृथक्करण करुन प्रत्यगात्म्याला त्या कोशांतून बुद्धिद्वारा निश्चयपूर्वक ओळखिलें असतां साधक परब्रह्माला मिळतो.

**अभानेस्थूल देहस्य स्वप्ने यद्‌भानमात्मनः।**
**सोऽन्वयो व्यतिरेकस्तद्‌भानेऽन्यानवभासनम्।।1-38।।**

स्वप्नावस्थेंत स्थूलदेहाचें भान नसतांना आत्म्याचें जें भान असतें तो अन्वय व आत्म्याचें भान असून जें स्थूल देहाचें भान नसतें तो व्यतिरेक होय.

**लिङ्गभाने सुषुप्तौ स्यादात्मनो भानमन्वयः।**
**व्यतिरेकस्तु तद्‌भाने लिङ्गस्याभानमुच्यते ।।1-39।।**

सुषुप्तिनामक तिस-या अवस्थेंत सूक्ष्म शरीराचें भान नसून आत्म्याचें भान असणें याला अन्वय व आत्मभान असतांना सूक्ष्म शरीराचें भान नसणें याला व्यतिरेक म्हणतात.

**तद्विवेकाद्विविक्ताः स्युः कोशाः प्राणमनोधियः।**
**ते हि तत्र गुणावस्थाभेदमात्रात्पृथक्कृताः ।।1-40।।**

लिंग शरीराच्या विवेचनानें प्राणमय, मनोमय, व विज्ञानमय या नांवाचे तीन कोश पृथक् होतात. कारण ते कोश त्या एकाच शरीरांत केवल गुणांच्या भिन्न स्वरुपामुळें पृथक् मानले आहेत.

**सुषुप्त्यभाने भानं तु समाधावात्मनोऽन्वयः।**
**व्यतिरेकस्त्वात्मभाने सुषुप्त्यनवभासनम् ।।1-41।।**

तसेंच समाधीमध्यें सुषुप्तीचें भान नसतांना आत्म्याचेंच जें भान असतें तो त्याचा अन्वय व आत्म्याचें भान असतांना सुषुप्तीचें भान नसणें हाच

व्यतिरेक होय.

**यथा मुञ्जादिषीकैवमात्मा युक्त्या समुद्धृतः।**
**शरीर त्रितयाद्धीरैः परं ब्रह्मैव जायते ।।1-42।।**

ज्याप्रमाणें मुंजा नांवाच्या तृणांतून कोमल काडी मोठ्या युक्तीनें बाहेर काढतात, त्याप्रमाणें अधिकारी पुरुषानें मोठ्या युक्तीनें तीन शरीरांतून पृथक् केलेला आत्मा परब्रह्मच होतो.

**परापरात्मनोरेवं युक्त्या सम्भावितैकता।**
**तत्त्वमस्यादिवाक्यैः सा भागत्यागेन लक्ष्यते ।।1-43।।**

ह्याप्रमाणें पर व अपर आत्म्याचें ऐक्य युक्तिद्वाराहि संभवतें असें दाखविलें. व तेंच ( आतां ) ' तत्त्वमसि म्हणजे तें तूं आहेस ' इत्यादि वाक्यांनीं जहदजहल्लक्षणावृत्तीनें सिद्ध करितात.

**जगतो यदुपादानं मायामादाय तामसीम् ।**
**निमित्तं शुद्धसत्त्वां तामुच्यते ब्रह्म तद्गिरा ।।1-44।।**

जें ब्रह्म तमःप्रधान प्रकृतीला स्वतःची उपाधि करुन जगाचें उपादान कारण व शुद्धसत्त्व प्रकृतीला स्वतःची उपाधि करुन त्याचें निमित्त कारण होतें त्या ब्रह्माचा महावाक्यांत 'तत् ' शब्दानें उल्लेख केला आहे.

**यदा मलिनसत्त्वां तां कामकर्मादिदूषिताम् ।**
**आदत्ते तत्परं ब्रह्म त्वंपदेन तदोच्यते ।।1-45।।**

तेंच ब्रह्म ज्यावेळीं काम व कर्मे यांनीं दूषित झालेल्या त्या मलिनसत्त्वप्रधान प्रकृतीला आपली उपाधि करितें, तेव्हां त्याचा 'त्वं 'या पदानें निर्देश करितात.

**त्रितयीमपि तां मुक्त्वा परस्परविरोधिनीम् ।**
**अखण्डं सच्चिदानन्दं महावाक्येन लक्ष्यते ।।1-46।।**

तिन्ही प्रकारच्या परस्पर विरुद्ध अशा त्या प्रकृतीला टाकल्यानें खंडरहित व सच्चिदानंदरुप ब्रह्म महावाक्यानें बोधित होतें.

**सोऽयमित्यादिवाक्येषु विरोधात्तदिदन्तयोः।**
**त्यागेन भागयोरेक आश्रयो लक्ष्यते यथा ।।1-47।।**
**मायाविद्ये विहायैवमुपाधी परजीवयोः।**
**अखण्डं सच्चिदानन्दं परं ब्रह्मैव लक्ष्यते ।।1-48।।**

' तो हा ( देवदत्त )' इत्यादि वाक्यांत ' तो ' हा तदंश व ' हा ' हा इदमंश यांचा विरोध असल्यामुळें ह्या दोन्ही पदांतील विरुद्ध भाग

टाकिल्यानें त्यांचा आश्रय जो देवदत्त त्याचा जसा लक्षणावृत्तीनें बोध होतो, त्याचप्रमाणें ईश्वर व जीव यांच्या माया व अविद्या या उपाधींना टाकिलें असतां भेदरहित, सच्चिदानंद व श्रेष्ठ असें जें ब्रह्म त्याचा लक्षणेनें बोध होतो.

**सविकल्पस्य लक्ष्यत्वे लक्ष्यस्य स्यादवस्तुता।**
**निर्विकल्पस्य लक्ष्यत्वं न दृष्टं न च सम्भवि ॥1-49॥**

सविकल्प वस्तूचा वाक्यानें बोध होतो, असें मानल्यास लक्ष्य जें ब्रह्म त्याला अवस्तुत्व ( नामरुपयुक्त पदार्थांप्रमाणें मिथ्यात्व ) येतें. बरें निर्विकल्प वस्तूचा बोध होतो म्हणावें तर तसें कोठें आढळत नाहीं व तसें होणें संभवतहि नाहीं.

**विकल्पो निर्विकल्पस्य सविकल्पस्य वा भवेत् ।**
**आद्ये व्याहतिरन्यत्रानवस्थात्माश्रयादयः ॥1-50॥**

हा जो तूं विकल्प केलास तो निर्विकल्पाचा कीं सविकल्पाचा ( हें प्रथम ) सांग. निर्विकल्पाचा असें जर म्हणशील तर व्याघात हा दोष येतो. बरें सविकल्पाचा विकल्प म्हणशील तर अनवस्था, आत्माश्रय इत्यादि दोष येतात.

**इदं गुणक्रियाजातिद्रव्यसम्बन्धवस्तुषु ।**
**समं तेन स्वरुपस्य सर्वमेतदितीष्यताम् ॥1-51॥**

हें दूषण जात गुण, क्रिया, जाति, द्रव्य, व संबंध या वस्तूंचे ठिकाणीं सारखेंच आहे. यास्तव हें सर्वही गुणादि धर्मजात स्वात्म्याच्या सत्तेनेंच सत्तायुक्त होत असतें त्याहून पृथक्त्वानें तें कधींच राहूं शकत नाहीं असे समजावें.

**विकल्प तदभावाभ्यामसंस्पृष्टात्मवस्तुनि ।**
**विकल्पितत्वलक्ष्यत्वसम्बन्धाद्यास्तु कल्पिताः ॥1-52॥**

विकल्प व विकल्पाचा अभाव यांचा जेथें स्पर्शहि नाहीं अशा आत्मवस्तूचे ठिकाणीं विकल्पितत्व, लक्ष्यत्व, संबंधादि इत्यादि सर्वहि भाव कल्पिलेले आहेत.

**इत्थं वाक्यैस्तदर्थानुसन्धानं श्रवणं भवेत् ।**
**युक्त्या सम्भावितत्वानुसन्धानं मननं तु तत् ॥1-53॥**

ह्याप्रमाणें महावाक्यांच्या योगानें वाक्यार्थाचा निश्चय करणें हें श्रवण व

युक्तिप्रयुक्तीनें हा अर्थ संभवनीय आहे इत्यादि ठरविणें हें मनन होय.

**ताभ्यां निर्विचिकित्सेऽर्थे चेतसः स्थापितस्य यत् ।**
**एकतानत्वमेतद्धि निदिध्यासनमुच्यते ।।1-54।।**

श्रवण व मनन यांनीं निश्चित झालेल्या विषयाच्या ठिकाणीं स्थिर केलेल्या अंतःकरणाची जी एकाग्रता तिलाच निदिध्यासन असें म्हणतात.

**ध्यातृध्याने परित्यज्य क्रमाद्ध्येयैकगोचरम् ।**
**निवातदीपवच्चित्तं समाधिरभिधीयते ।।1-55।।**

जेव्हां चित्त ध्याता व ध्यान यांना क्रमानें सोडून वायुरहित प्रदेशांतील दीपाप्रमाणें केवल ध्येयरुप होऊन रहातें तेव्हां त्याला समाधि असें म्हणतात.

**वृत्तयस्तु तदानमिज्ञाता अप्यात्मगोचराः।**
**स्मरणादनुमीयन्ते व्युत्थितस्य समुत्थितात् ।।1-56।।**

केवळ आत्माच विषय आहे ज्यांचा अशा वृत्ति जरी समाधिकाळीं प्रत्ययाला येत नसल्या तरी समाधि सोडून व्यवहारांत आलेल्या पुरुषाला मी एवढा वेळ समाधींत होतों अशा प्रकारें होत असलेल्या स्मरणावरुन त्यांचें अनुमान करितां येतें.

**वृत्तीनामनुवृत्तिस्तु प्रयत्नात्प्रथमादपि ।**
**अदृष्टासकृदभ्याससंस्कारसचिवाद्भवेत् ।।1-57।।**

ध्येयविषयक वृत्तींची अनुवृत्ति तर समाधीच्या पूर्वी घडलेलें पुण्य व वारंवार केलेल्या अभ्यासाचा संस्कार यांच्या सहाय्यानें होते.

**यथा दीपो निवातस्थ इत्यादिभिरनेकधा ।**
**भगवानिममेवार्थमर्जुनाय न्यरुपयत् ।।1-58।।**

' यथा दीपो निवातस्थो. म्हणजे ज्याप्रमाणें वायुरहित प्रदेशांतील दीप ' इत्यादि श्लोकांनीं भगवानानीं हाच निर्विकल्प समाधिरुप उपाय अर्जुनाला अनेक प्रकारें सांगितला आहे.

**अनादाविह संसारे सञ्चिताः कर्म कोटयः ।**
**अनेन विलयं यान्ति शुद्धो धर्मो विवर्धते ।।1-59।।**

अनादि अशा ह्या संसारामध्यें संपादिलेलीं कोट्यवधि कर्मे ह्या समाधीच्या योगानें नष्ट होतात. व शुद्ध धर्माची वृद्धि होते.

**धर्ममेघमिमं प्राहुः समाधिं योगवित्तमाः ।**
**वर्षत्येष यतो धर्मामृतधाराः सहस्त्रशः ।।1-60।।**

ब्रह्माचा ज्यांना साक्षात्कार झाला आहे असे आत्मज्ञ ह्या निर्विकल्प समाधीला धर्ममेघ असें म्हणतात. कारण ही समाधि धर्मरुप अमृताच्या हजारों धारांचा वर्षाव करिते.

**अमुना वासनाजाले निःशेषं प्रविलापिते ।**
**समूलोन्मूलिते पुण्यपापाख्ये कर्मसञ्चये ।।1-61।।**

या समाधीच्या योगानें वासनासमूह निःशेष नष्ट झाला असतां पुण्य व पाप या नांवाचे कर्मसंचय सर्वथैव नष्ट होतात.

**वाक्यमप्रतिबद्धं सत्प्राक्परोक्षावभासिते ।**
**करामलकवद्बोधमपरोक्षं प्रसूयते ।।1-62।।**

वाक्याचा यथार्थ भाव समजल्यानें पूर्वी परोक्षतः ज्ञात झालेल्या तत्त्वाचें तळहातावरील आंवळ्या प्रमाणें साक्षात्काररुप ज्ञान होतें.

**परोक्षं ब्रह्मविज्ञानं शाब्दं देशिकपूर्वकम् ।**
**बुद्धिपूर्वकृतं पापं कृत्स्नं दहति वन्हिवत् ।।1-63।।**

गुरुंपासून प्राप्त झालेलें ' तें तूं आहेस ' इत्यादि वेदान्त वाक्यजन्य अप्रत्यक्ष ब्रह्मज्ञान, जाणून केलेल्या सर्व पापाला अग्नीप्रमाणें जाळून टाकितें.

**अपरोक्षात्माविज्ञानं शाब्दं देशिकपूर्वकम् ।**
**संसारकारणाज्ञानतमसश्चण्डभास्करः ।।1-64।।**

वेदान्तजन्य व गुरूपदिष्ट असें अपरोक्ष आत्मज्ञान संसाराचें कारण जें अज्ञानरुप तम त्याचा सूर्य आहे.

**इत्थं तत्त्वविवेकं विधाय विधिवन्मनः समाधाय ।**
**विगलितसंसृतिबन्धः प्राप्नोति परं पदं नरो न चिरात् ।।1-65।।**

पुरुषानें ह्याप्रमाणें तत्त्वविवेक करुन त्या तत्त्वाचे ठिकाणीं शास्त्रोक्तरीत्या मनाला स्थिर केलें असतां त्याच्या संसार बंधाचा सर्वथैव नाश होतो; व त्याला तत्काल परम पदाची प्राप्ति होते.

**इति प्रथमोऽध्यायः ।।1।।**

**पञ्चमहाभूतविवेकः ।**

**सदद्वैतं श्रुतं यत्तत्पञ्चभूतविवेकतः ।**
**बोद्धुं शक्यं ततो भूतपञ्चकं प्रविविच्यते ।।2-1।।**

जें सत् व अद्वैत तत्त्व छान्दोग्यांत श्रुत आहे; तें पंचभूतांच्या पृथक्करणानें जाणण्यास शक्य आहे. यास्तव पांच भूतांचा विवेक करितों.

**शब्दस्पर्शौ रुपरसौ गन्धो भूतगुणा इमे ।**
**एकद्वित्रिचतु:पञ्च गुणा व्योमादिषु क्रमात् ।।2-2।।**

शब्द, स्पर्श, रुप, रस व गंध असे हे पांच भूतांचे पांच गुण आहेत. आकाशादि भूतांत क्रमानें एक, दोन, तीन, चार, व पांच गुण राहतात.

**प्रतिध्वनिर्वियच्छब्दो वायौ बीसीतिशब्दनम् ।**
**अनुष्णाशीतसंस्पर्शो वन्हौ भुगुभुगुध्वनिः।।2-3।।**
**उष्णः स्पर्शः प्रभारुपं जले बुलुबुलुध्वनिः।**
**शीतः स्पर्शः शुक्लरुपं रसो माधुर्यमीरितम् ।।2-4।।**
**भूमौ कडकडाशब्दः काठिन्यं स्पर्श इष्यते।**
**नीलादिकं चित्ररुपं मधुराम्लादिको रसः।।2-5।।**
**सुरभीतरगन्धौ द्वौ गुणाः सम्यग्विवेचिताः।**

आकाशाचा प्रतिध्वनि हा शब्द होय. वायूंत बीसि असा शब्द व उष्णही नाहीं व शीतही नाहीं असा स्पर्श असे दोन; अग्नींत भुग् भुग् असा शब्द, उष्ण स्पर्श व त्याची प्रभा हें रुप असे तीन; उदकांत बुल् बुल् बुल् असा शब्द, थंड स्पर्श, पांढरें रुप व मधुरता हा रस असे चार व पृथ्वींत कडकड्, खडखड् असा शब्द, कठिणपणा हा स्पर्श, नीळें, पांढरें इत्यादि सहाप्रकारचें रुप, गोड, आंबट इत्यादि सहाप्रकारचा रस, सुवास व दुर्गंध हे दोन गंध, असे पांच गुण राहतात. हें त्या गुणांचें स्पष्टपणें विवेचन केलें.

**श्रोत्रं त्वक्चक्षुषी जिह्वा घ्राणं चेन्द्रियपञ्चकम् ।।2-6।।**

श्रोत्र, त्वक्, नेत्र, जिव्हा व घ्राण हें इंद्रियपंचक होय.

**कर्णादिगोलकस्थं तच्छब्दादिग्राहकं क्रमात् ।**
**सौक्ष्म्यात्कार्यानुमेयं तत्प्रायो धावेद्बहिर्मुखम् ।।2-7।।**

तें इंद्रियपंचक कर्णादि गोलकांत राहतें व क्रमानें शब्दादि विषयांचें ग्रहण

करितें. तें फार सूक्ष्म असल्यामुळें केवळ कार्यावरुनच त्याचें ज्ञान होतें. तें बहुतकरुन बहिर्मुख धांवत असतें.

**कदाचित्पिहिते कर्णे श्रूयते शब्द आन्तरः।**
**प्राणवायौ जाठराग्नौ जलपाने ऽन्न भक्षणे ।।2-8।।**
**व्यज्यन्ते ह्यान्तराः स्पर्शा मीलने चान्तरं तमः।**
**उद्गारे रसगन्धौ चेत्यक्षाणामान्तरग्रहः।।2-9।।**

एखादे वेळीं कान झांकले असतां प्राणवायु व जठराग्नि यांत असणारा देहांतील शब्द ऐकूं येतो. उदकपान व अन्नभक्षण केलें असतां आंतील स्पर्श समजतो. नेत्र मिटले असतां आंतील अंधकार प्रत्ययाला येतो. ढेंकरेनें आंतील रस व वास समजतात. सारांश, ह्याप्रमाणें इंद्रियें आंतील विषयांचाही अनुभव घेतात.

**पञ्चोक्त्यादानगमनविसर्गानन्दकाः क्रियाः।**
**कृषिवाणिज्यसेवाद्याः पञ्चस्वन्तर्भवन्ति हि ।।2-10।।**

बोलणें, ग्रहण करणें, जाणें, पुरीषाचा विसर्ग करणें व स्पर्श सुख घेणें ह्या पांच क्रिया सर्वप्रसिद्ध आहेत. व कृषि ( शेतकी ), व्यापार, सेवा इत्यादि अन्य क्रियाही या पांचांत अंतर्भूत होतात.

**वाक्पाणिपादपायूपस्थैरक्षैस्तत्क्रियाजनिः।**
**मुखादिगोलकेष्वास्ते तत्कर्मेन्द्रियपञ्चकम् ।।2-11।।**

वाक्, हस्त, पाद, गुद व शिश्न ह्या पांच इंद्रियांनीं त्या क्रिया होतात व तें कर्मेंद्रियपंचक मुखादि गोलकामध्ये राहतें.

**मनो दशेन्द्रियाध्यक्षं हृत्पद्मगोलके स्थितम्।**
**तच्चान्तःकरणं बाह्येष्वस्वातन्त्र्याद्विनेन्द्रियैः।।2-12।।**

मन हा दहाही इंद्रियांचा अध्यक्ष आहे. तें हृदयकमलांत असतें व इंद्रियांच्या सहाय्यावांचून बाह्य विषयांविषयीं तें स्वतंत्र नसल्यामुळें त्याला अंतरिंद्रिय असें म्हणतात.

**अक्षेष्वर्थार्पितेष्वेतद्गुणदोषविचारकम्।**
**सत्त्वं रजस्तमश्चास्य गुणा विक्रियते हि तैः।।2-13।।**

इंद्रियें विषयांमध्यें गढून गेलीं असतां हें त्यांच्या गुणदोषांचा विचार करितें. ह्याचे सत्त्व, रज व तम असे तीन गुण आहेत. कारण हें त्या गुणांच्या योगानें विकार पावतें.

**वैराग्यं क्षान्तिरौदार्यमित्याद्याः सत्त्वसम्भवाः।**
**कामक्रोधौ लोभयत्नावित्याद्या रजसोत्थिताः।**
**आलस्यभ्रान्तितन्द्राद्या विकारास्तमसोत्थिताः।।2-14।।**

विरक्ति, क्षमा, उदारता इत्यादि विकार सत्त्वापासून; काम, क्रोध, लोभ, यत्न इत्यादि रजोगुणापासून व आळस, भ्रान्ति, ग्लानि इत्यादि वृत्ति तमोगुणापासून झाल्या आहेत.

**सात्विकैः पुण्यनिष्पत्तिः पापोपत्तिश्च राजसैः।**
**तामसैर्नोभयं किन्तु वृथायुःक्षपणं भवेत्।।2-15।।**

सात्त्विक विकारांच्या योगानें पुण्यसंचय व राजस विकारांच्या योगानें पापाची वृद्धि होते. तामस विकारांनीं तर ह्यांतील कांहींच न होतां व्यर्थ आयुष्याचा क्षय मात्र होतो.

**अत्राहं प्रत्ययी कर्तेत्येवं लोक व्यवस्थितिः।।2-16।।**

या वृत्तींत ' मी ' असें म्हणणारी वृत्तीच कर्ता होय; व लोकांत असाच व्यवहार आहे.

**स्पष्टशब्दादियुक्तेषु भौतिकत्वमतिस्फुटम्।**
**अक्षादावपितच्छास्त्रयुक्तिभ्यामवधार्यताम् ।।2-17।।**

स्पष्ट अशा शब्दादि विषयांनीं युक्त असलेल्या पदार्थांतील भौतिकत्व अगदीं स्पष्ट आहे. पण तें इंद्रियादिकांच्या ठिकाणीं ही आहे असा शास्त्र व युक्ति यांच्या योगानें निश्चय करावा.

**एकादशेन्द्रियैर्युक्त्या शास्त्रेणाप्यवगम्यते।**
**यावत्किंचिद्भवेदेतदिदं शब्दोदितं जगत् ।।2-18।।**

मनासह अकरा इंद्रियांनीं, अनुमानानें व शास्त्रानेंही जेवढ्याचें म्हणून ज्ञान होतें तें सर्व जग हा इदं शब्दाचा अर्थ आहे.

**इदं सर्वं पुरा सृष्टेरेकमेवद्वितीयकम्।**
**सदेवासीन्नामरुपे नास्तामित्यारुणेर्वचः।।2-19।।**

सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी हें सर्व एकच व अद्वितीय होतें. त्या कालीं नामरुप नव्हतें. असें छान्दोग्यांत आरुणीचें वचन आहे.

**वृक्षस्य स्वगतो भेदः पत्रपुष्पफलादिभिः।**
**वृक्षान्तरात्सजातीयो विजातीयः शिलादितः।।2-20।।**

वृक्षाचा पानें, फुलें व फळें यांच्या योगानें स्वगत भेद होतो. अन्य जातींच्या

वृक्षांमुळें सजातीय भेद होतो व शिला, माती इत्यादि पदार्थांच्या योगानें विजातीय भेद होतो.

**तथा सद्वस्तुनो भेदत्रयं प्राप्तं निवार्यते।**
**ऐक्यावधारणद्वैतप्रतिषेधैस्त्रिभिः क्रमात्।।2-21।।**

त्याचप्रमाणें सद्वस्तूच्या ठिकाणीं प्राप्त होणारे हे तीन भेद ऐक्य, निश्चय व द्वैताचा निषेध हे तीन अर्थ सुचविणा-या तीन शब्दांनीं क्रमानें घालविले आहेत.

**सतो नावयवाः शंक्यास्तदंशस्यानिरुपणात्।**
**नामरुपे न तस्यांशौ तयोरद्याप्यनुद्भवात्।।2-22।।**

सद्वस्तूच्या अंशाचें निरुपण करितां येत नसल्यामुळें त्याच्या अंशाविषयीं कल्पनाही करितां येत नाहीं; व प्रलयकालीं नामरुपांची उत्पत्तीच न झाल्यामुळें नाम व रुप हे त्याचे अंश होत नाहींत.

**नामरुपोद्भवस्यैव सृष्टित्वात्सृष्टितः पुरा।**
**न तयोरुद्भवस्तस्मान्निरंशं सद्यथा वियत् ।।2-23।।**

नांव व रुप यांची उत्पत्ति म्हणजेच सृष्टि उत्पत्ति होय. सुष्ट्युत्पत्तीच्या पूर्वी नामरुपांचा उद्भव होत नाहीं.
तस्मात् आकाशाप्रमाणें सत् निरंश आहे.

**सदन्तरं सजातीयं न वैलक्षण्यवर्जनात्।**
**नामरुपोपाधिभेदं विना नैव सतो भिदा ।।2-24।।**

सद्वस्तूच्या ठिकाणीं विलक्षणता नसल्यामुळें सत् हून पृथक् असें त्याच्या जातीचें कांहींएक नाहीं. ( कारण ) नाम व रुप या उपाधींच्या भेदावांचून सद्वस्तूचा भेद कधींच होत नाहीं.

**विजातीयमसत्तत्तु न खल्वस्तीति गम्यते।**
**नास्यातः प्रतियोगित्वं विजातीयाद्भिदा कुतः।।2-25।।**

सत्चें विजातीय जें असत् तें तर असतें असें कधींच वाटत नाहीं. म्हणून हें असत् सत्चें प्रतियोगीही होत नाहीं. मग विजातीयामुळें सत्चा भेद कोठून होणार ?

**एकमेवाद्वितीयं सत्सिद्धमत्र तु केचन।**
**विव्हला असदेवेदं पुरासीदित्यवर्णयन् ।।2-26।।**

ह्याप्रमाणें सत् स्वगत, सजातीय व विजातीय या त्रिविध भेदरहित आहे असें

सिद्ध झालें. पण असें असतांही कांहीं कांहीं तार्किकांनीं विव्हल होऊन हें पूर्वी असत्च होतें असें वर्णन केलें आहे.

**मग्नस्याब्धौ यथाऽक्षाणि विव्हलानि तथाऽस्य धीः।**
**अखण्डैकरसं श्रुत्वा निःप्रचारा बिभेत्यतः ।।2-27।।**

समुद्रांत बुडणा-या प्राण्याचीं इंद्रियें जशीं विव्हल होतात, त्याप्रमाणें ह्या माध्यमिकांची बुद्धि ब्रह्म अखंड व एकरस आहे असें ऐकून स्तब्ध होते व तिला या वस्तूची मोठी भीति वाटते.

**गौडाचार्या निर्विकल्पे समाधावन्ययोगिनाम्।**
**साकारब्रह्मनिष्ठानामत्यन्तं भयमूचिरे ।।2-28।।**

गौडपादाचार्यांनीं ह्या निर्विकल्पसमाधीविषयीं, साकार ब्रह्माच्या ठिकाणीं निष्ठा ठेऊन राहणा-या दुस-या उपासकांना मोठें भय वाटतें असें सांगितलें आहे.

**अस्पर्शयोगो नामैष दुर्दर्शः सर्वयोगिभिः।**
**योगिनो बिभ्यति ह्यस्मादभये भयदर्शिनः।।2-29।।**

जी अस्पर्शयोग नांवाची समाधि ती सर्वही साकार मूर्तीचें ध्यान करणा-या योग्यांना दुष्प्राप्यच आहे. कारण भयरहित अशा ठिकाणीं भय मानणा-या त्यांना ह्या समाधीचें भय वाटतें.

**भगवत्पूज्यपादाश्च शुष्कतर्कपटूनमून्।**
**आहुर्माध्यमिकान् भ्रान्तानचिन्त्येऽस्मिनसदात्मनि ।।2-30।।**

श्रीमत् आचार्यही या अचिन्त्य व सद्रूप आत्म्याविषयीं भ्रान्त झालेल्या ह्या शुष्क तर्कचतुरांना माध्यमिक असें म्हणतात.

**अनादृत्य श्रुतिं मौर्ख्यादिमे बौद्धास्तमस्विनः।**
**आपेदिरे निरामत्वमनुमानैकचक्षुषः।।2-31।।**

अज्ञानि बौद्ध केवल मूर्खपणानें श्रुतीचा अनादर करुन मुख्यतः अनुमानप्रमाणवादी होतात. व त्यामुळें त्यांना हें जग आत्मरहित ( शून्य ) दिसतें.

**शून्यमासीदिति ब्रूषे सद्योगं वा सदात्मताम्।**
**शून्यस्य न तु तद्युक्तमुभयं व्याहतत्त्वतः।।2-32।।**

अरे माध्यमिका; ' शून्य होतें. ' ह्या वाक्यानें शून्याचा सत्तारुप जातीशीं संबंध सांगतोस कीं त्याचें सत्तारुपत्व सांगतोस ? पण बाबारे व्याघात हा दोष येत असल्यामुळें शून्याच्या ठिकाणीं हे दोन्ही पक्ष संभवत नाहींत.

**न युक्तस्तमसा सूर्यो नापि चासौ तमोमयः।**
**सच्छून्ययोर्विरोधित्वाच्छून्यमासीत्कथं वद ।।2-33।।**

सूर्य अंधकारानें युक्त होत नाहीं. तसाच हा तमोरुपही नसतो. मग सत् व शून्य यांचाही सूर्य व अंधकाराप्रमाणेंच
विरोध असल्यामुळें ' शून्य होतें ' असें कसें म्हणतोस ? बोल.

**वियदादेर्नामरुपे मायया सुविकल्पिते।**
**शून्यस्य नामरुपे च तथा चेज्जीव्यतां चिरम् ।।2-34।।**

आम्ही जशी आकाशादिकांचीं नामरुपें मायेनें कल्पित मानतों तशींच जर तुझ्या शून्याचीं नामादिक असतील तर तें तुझें शून्य उदंड आयुष्याचें होवो.

**सतोऽपि नामरुपे द्वे कल्पिते चेत्तदा वद।**
**कुत्रेति निरधिष्ठानो न भ्रमः क्वचिदीक्ष्यते ।।2-35।।**

आमच्या सद्वस्तूचेंही नांव व रुप हीं दोन्ही कल्पित आहेत असेंच जर तूंही म्हणत असशील तर तीं कशाच्या आधारावर कल्पित आहेत तेवढें सांग म्हणजे झालें. कारण कल्पना हीं निराधार कधींच संभवत नाहीं.

**सदासीदिति शब्दार्थभेदे वैगुण्यमापतेत्।**
**अभेदे पुनरुक्तिः स्यान्मैवं लोके तथेक्षणात् ।।2-36।।**

प्रश्न- सत् होतें ह्या दोन शब्दांचा निरनिराळा अर्थ आहे कीं एकच ? निरनिराळा अर्थ असेल तर अद्वैताची हानी होते. व एकच अर्थ असेल तर पुनरुक्ति हा दोष येतो. उत्तर - व्यवहारांत सर्वत्र अशीं वाक्यें बोलत असल्यामुळें असें भलतेंच म्हणूं नकोस.

**कर्तव्यं कुरुते वाक्यं ब्रूते धार्यस्य धारणम्।**
**इत्यादिवासनाविष्टं प्रत्यासीत्सदितीरणम् ।।2-37।।**

कर्तव्य करितो, वाक्य बोलतो, धरण्यास योग्य अशा वस्तूचें धरणें, इत्यादि वाक्यांचा ज्याला संस्कार झाला आहे त्या श्वेतकेतूला उद्देशून ' सत् आसीत् ' असें म्हटलें आहे.

**कालाभावे पुरेत्युक्तिः कालवासनया युतम् ।**

**शिष्यं प्रत्येव तेनात्र द्वितीयं न हि शंक्यते ।।2-38।।**

प्रलयावस्थेंत काल नसतांहीं ' सृष्ट्युत्पत्तीपूर्वी ' असें जें म्हटलें आहे तें कालाच्या वासनेनें युक्त असलेल्या शिष्याला उद्देशून आहे. म्हणून त्यावेळीं द्वैता ( च्या अस्तित्वा ) विषयीं शंका घेतां येत नाहीं.

**चोद्यं वा परिहारो वा क्रियतां द्वैतभाषया।**
**अद्वैतभाषया चोद्यं नास्ति नापि तदुत्तरम् ।।2-39।।**

अद्वैत सिद्धान्ताविषयीं शंका घेणें व तिचें समाधान करणें हीं दोन्हीं द्वैत भाषेंनें करावीं. कारण अद्वैत भाषेनें प्रश्न करितां येत नाहीं व तसेंच उत्तरही देतां येत नाहीं.

**तदा स्तिमितगम्भीरं न तेजो न तमस्ततम्।**
**अनाख्यमनभिव्यक्तं सत्किञ्चिदवशिष्यते ।।2-40।।**

प्रलयकालीं निश्चल व गंभीर, प्रकाशही नव्हे व अंधकारही नव्हे. पण सर्वव्यापी, बोलतां न येण्यासारखें, व अगदीं अस्पष्ट असे कांहीं सत्तारुप अवशिष्ट राहतें.

**ननु भूम्यादिकं मा भूत्परमाण्वन्तनाशतः।**
**कथं ते वियतोऽसत्वं बुद्धिमारोहतीति चेत् ।।2-41।।**

भूमि, उदक, तेज व वायु या चार द्रव्यांचा परमाणूपर्यंत नाश होत असल्यामुळें तीं मिथ्या असोत. पण आकाश मिथ्या आहे असें तुमच्या बुद्धीवर आरुढ होतें असें जर म्हणशील तर ( ऐक ).

**अत्यन्तं निर्जगद्व्योम यथा ते बुद्धिमाश्रितम्।**
**तथैव सन्निराकाशं कुतो नाश्रयते मतिम् ।।2-42।।**

सर्व जगाचा नाश झाल्यावर राहणा-या आकाशाचें तुझी बुद्धि जसें ग्रहण करिते, तसेंच आकाशरहित सत् वस्तूचें ती कां बरें ग्रहण करीत नाहीं ?

**निर्जगद्व्योम दृष्टं चेत्प्रकाशतमसी विना।**
**क्व दृष्टं किं च ते पक्षे न प्रत्यक्षं वियत्खलु ।।2-43।।**

जगद्रहित आकाश भासतें असें जर म्हणशील तर ते प्रकाश व अंधकार यांवांचून कोठें दिसतें ? कोठेंच नाहीं ? मग तुमच्या मतें आकाशाचें प्रत्यक्ष ज्ञान होत नाहीं कीं काय ?

**सद्वस्तु शुद्धं त्वस्माभिर्निश्चतैरनुभूयते।**
**तूष्णीं स्थितौ न शून्यत्वं शून्यबुद्धेश्च वर्जनात् ।।2-44।।**

स्वस्थ ( सर्व अंतर्बहिरिंद्रियांचा व्यापार बंद करुन ) बसलें असतां आम्हां अनुभवी पुरुषांना अद्वितीय सद्वस्तूचा अनुभव येतो. त्या अवस्थेंत शून्याचा बुद्धीला भास होत नसल्यामुळें शून्यत्वाचा अनुभव कधींच येत नाहीं.

**सद्बुद्धिरपि चेन्नास्ति माऽस्त्वस्य स्वप्रभत्वतः।**
**निर्मनस्कत्वसाक्षित्वात्सन्मात्रं सुगमं नृणाम् ।।2-45।।**

तुष्णीं स्थितींत सद्बुद्धीसुद्धां नसते, असें जर म्हणशील तर ती नसेना. हें सत् स्वयंप्रकाश असल्यामुळें त्याला अंतःकरण लीन झाल्याचेंही ज्ञान होतें. त्यामुळें केवल सद्वस्तु सर्व साधकांना सुलभ आहे.

**मनोजृम्भणराहित्ये यथा साक्षी निराकुलः।**
**मायाजृम्भणतः पूर्वं सत्तथैव निराकुलम् ।।2-46।।**

मन वृत्तिशून्य असतांना साक्षी चैतन्य जसें शांत असतें तसेंच मायेचा उदय होण्यापूर्वीं सत् स्वस्थ असतें.

**निस्तत्त्वाकार्यगम्याऽस्य शक्तिर्मायाग्निशक्तिवत्।**
**न हि शक्तिः क्वचित्कैश्चिद्बुद्ध्यते कार्यतः पुरा ।।2-47।।**

अग्नीच्या शक्तीप्रमाणें ह्या सद्रूप आत्म्याची तत्त्वशून्य व कार्यावरुनच जाणतां येणारी अशी जी शक्ति तीच माया होय. कार्याच्या पूर्वीं कोणालाही कधीं शक्तीचें ज्ञान होत नाहीं.

**न सद्वस्तु सतः शक्तिर्न हि वन्हेः स्वशक्तिता।**
**सद्विलक्षणतायां तु शक्तेः किं तत्त्वमुच्यताम् ।।2-48।।**

सत्‌ची शक्ति सद्रूपच असणार नाहीं. कारण अग्निच अग्निची शक्ति नव्हे. मग सत्‌ची शक्ति सतपेक्षां विलक्षण जर आहे, तर तिचें तत्त्व काय तें सांग पाहूं.

**शून्यत्वमिति चेच्छून्यं मायाकार्यमितीरितम्।**
**न शून्यं नापि सद्यादृक्तादृक्तत्त्वमिहेष्यताम् ।।2-49।।**

शून्य हेंच मायेचें तत्त्व असें जर म्हणशील तर शून्य मायेचें कार्य आहे असें पूर्वी ( शून्यं चेत् जीव्यतां चिरं या वाक्यांत ) सांगितलेंच आहे. यास्तव शून्यही नव्हे व सत्‌ही नव्हे अशा प्रकारचें मायेचें कांहीं स्वरुप मानावें.

**नासदासीन्नो सदासीत्तदानीं किन्त्वभूत्तमः।**
**सद्योगात्तमसः सत्त्वं न स्वतस्तन्निषेधनात् ।।2-50।।**

प्रलयकालीं असत् ( शून्य ) नव्हतें व सत् ( विद्यमान असेंही कांहीं ) नव्हतें. तर तम होतें. त्याचें सद्वस्तूच्या आश्रयानेंच सत्त्व असतें. व श्रुतिस्मृतींत निषेध केला असल्यामुळें त्याचें स्वाभाविक सत्त्व नसतें,

**अत एव द्वितीयत्वं शून्यवन्न हि गण्यते।**
**न लोके चैत्रतच्छक्तयोर्जीवितं लिख्यते पृथक् ।।2-51।।**

म्हणूनच आम्ही त्या शक्तीची शून्याप्रमाणें निराळी गणना करीत नाहीं. लोकांत सुद्धां चैत्र नांवाचा मनुष्य व त्याची शक्ति या उभयतांना निरनिराळें वेतन लिहीत नाहींत.

**शक्त्याधिक्ये जीवितं चेद्वर्धते तत्र वृद्धिकृत्।**
**न शक्तिः किन्तु तत्कार्यं युद्धकृष्यादिकं तथा ।।2-52।।**

शक्ति अधिक असली म्हणजे वेतन वाढतें असें जर समजत असशील तर तें व्यर्थ आहे. कारण वेतनाची वृद्धि शक्ति करीत नसते तर युद्ध, शेतकी इत्यादि तिचीं कार्यें त्याची वृद्धि करितात.

**सर्वथा शक्ति मात्रस्य न पृथग्गणना क्वचित्।**
**शक्तिकार्यं तु नैवास्ति द्वितीयं शंक्यते कथम् ।।2-53।।**

सारांश कोणत्याही प्रकारें केवल शक्तीची पृथक् गणना कोठेंही करीत नाहींत. ( प्रलयकालीं ) शक्तीचें कार्यही नसतें मग द्वितीयत्वाची शंका कशी येणार ?

**न कृत्स्नब्रह्मवृत्तिः सा शक्तिः किन्त्वेकदेशभाक्।**
**घटशक्तिर्यथा भूमौ स्निग्धमृद्येव वर्तते ।।2-54।।**

ती शक्ति सर्व ब्रह्मवृत्ति नाहीं तर भूमींत ओल्या मातीच्या ठिकाणींच जशी घटशक्ति असते. तशी ती ब्रह्माच्या कांहीं भागांत राहते.

**पादोऽस्य सर्वा भूतानि त्रिपादस्ति स्वयंप्रभः।**
**इत्येकदेशवृत्तित्वं मायाया वदति श्रुतिः ।।2-55।।**

हीं सर्व भूतें त्याचा एक पाद असून तो स्वयंभू परमात्मा तीन पादानें अवशिष्ट आहे ( त्याचे तीन पाद शुद्धावस्थेंत आहेत ) असें ह्या मायेचें परमात्म्याच्या एका भागावर राहणें श्रुति सांगते.

**विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्।**
**इति कृष्णो ऽर्जुनायाह जगतस्त्वेकदेशताम् ।।2-56।।**

मी हें सर्व जग एका अंशानें व्यापून राहिलों आहें असें भगवान् कृष्णानेंही जगाचें एकदेशत्व अर्जुनाला सांगितलें आहे.

**स भूमिं विश्वतो वृत्वा ह्यत्यतिष्ठद्दशाङ्गुलम्।**
**विकारावर्ति चात्रास्ति श्रुतिसूत्रकृतोर्वचः।। 2-57।।**

ह्या भूमीला ( सृष्टीला ) सर्वतः व्यापून तो ईश्वर दशांगुलें अवशिष्टही राहिला आहे. तसेंच विकारामध्यें न राहणारें असें आत्म्याचें नित्य रुपही आहे. अशा अर्थाची श्रुति व वेदान्तसूत्रकार जे व्यास त्यांचें वचन आहे.

**निरंशेऽप्यंशमारोप्य कृत्स्नेंऽशे वेति पृच्छतः।**
**तद्भाषयोत्तरं ब्रूते श्रुतिः श्रोतृहितैषिणी ।।2-58।।**

अंशरहित ब्रह्माच्या ठिकाणीं अंशांचा आरोप करुन हें द्वैत सर्व ब्रह्माच्या आश्रयानें राहतें कीं त्याच्या कांहीं भागाच्या आश्रयानें ? असें विचारणा-या शिष्याला किंवा वाद्याला उद्देशून श्रोत्याचें हित इच्छिणारी श्रुति त्याच्या भाषेनेंच उत्तर देत आहे.

**सत्तत्त्वमाश्रिता शक्तिः कल्पयेत्सति विक्रियाः।**
**वर्णा भित्तिगता भित्तौ चित्रं नानाविधं यथा ।।2-59।।**

ज्याप्रमाणें भिंतीवरील रंग भितींवर नानाप्रकारच्या चित्रांची कल्पना करवितात त्याप्रमाणें सत्तत्त्वाचा आश्रय करुन राहणारी ही शक्ति सत्वस्तूवर नानाप्रकारचे पदार्थ ( विषय ) भासविते.

**आद्यो विकार आकाशः सोऽवकाशस्वरुपवान्।**
**आकाशोऽस्तीति सत्तत्त्वमाकाशेऽप्यनुगच्छति ।।2-60।।**

प्रथम विकार आकाश होय व अवकाश हेंच त्याचें स्वरुप आहे. ' आकाश आहे ' असा शब्दप्रयोग होत असल्यामुळें आकाशांत सत्तत्त्वाची अनुवृत्ति होते.

**एकस्वभावं सत्तत्त्वमाकाशो द्विस्वभावकः ।**
**नावकाशः सति व्योम्नि स चैषोऽपि द्वयं स्थितम् ।।2-61।।**

सत्तत्त्वाचा सत्तारुप एकच स्वभाव आहे पण आकाशाचे दोन स्वभाव आहेत. कारण सद्वस्तूमध्यें अवकाश नसतो पण आकाशांत सत्स्वभाव व अवकाश असे दोन्ही असतात.

**यद्वा प्रतिध्वनोर्व्योम्नो गुणो नासौ सतीक्ष्यते ।**
**व्योम्नि द्वौ सद्ध्वनी तेन सदेकं द्विगुणं वियत् ।।2-62।।**

किंवा प्रतिध्वनि हा आकाशाचा गुण आहे. हा सद्वस्तूंत प्रतीत होत

नाहीं. पण आकाशांत सत्ता व शब्द असे दोन गुण असतात. त्यामुळें सत् एकगुणी व आकाश द्विगुणी ही गोष्ट सिद्ध झाली.

**या शक्तिः कल्पयेद्व्योम सा सद्व्योम्नोरभिन्नताम्।**
**आपाद्य धर्मधर्मित्वं व्यत्ययेनावकल्पयेत् ।।2-63।।**

जी माया सद्वस्तूच्या ठिकाणीं आकाशाची कल्पना करविते ती प्रथमतः सत् व आकाश याचें तादात्म्य करुन नंतर विपरीतपणानें त्यांच्या धर्मधर्मिपणाची कल्पना करविते.

**सतो व्योमत्वमापन्नं व्योम्नः सत्तां तु लौकिकाः।**
**तार्किकाश्चावगच्छन्ति मायाया उचितं हि तत् ।।2-64।।**

मायेच्या योगानें सद्वस्तूलाच जरी आकाशत्व आलें आहे तरी लौकिक व तार्किक आकाशाची सत्ता असें समजतात पण मायेमुळें असें होणें साहजिक आहे.

**यद्यथा वर्तते तस्य तथात्वं भाति मानतः।**
**अन्यथात्वं भ्रमेणेतिन्यायोऽयं सार्वलौकिकः।। 2-65।।**

जें जसें असतें तें तसेंच भासणें हें प्रमाणभूत होय. पण त्याचें जें विपरीत भासणें तें भ्रामकच. खरें नव्हे, असा सर्वलोकप्रसिद्ध न्याय आहे.

**एवं श्रुतिविचारात्प्राग्यथा यद्वस्तु भासते।**
**विचारेण विपर्येति ततस्तच्चिन्त्यतां वियत् ।।2-66।।**

ह्याप्रमाणें श्रुतिविचाराच्या पूर्वी जी वस्तु जशी भासत असते ( ती विचारानंतर तशीच भासत नाहीं. तर ) तिच्यांत विचारानें विपर्यास पडतो. यास्तव त्या आकाशाविषयीं विचार करावा.

**भिन्ने वियत्सती शब्दभेदाद्बुद्धेश्च भेदतः।**
**वाय्वादिष्वनुवृत्तं सन्नतु व्योमेति भेदधीः।। 2-67।।**

शब्दांच्या भेदामुळें व बुद्धीच्या भेदामुळें आकाश व सत् हीं भिन्न आहेत असें ठरतें. कारण वायु, तेज इत्यादि पुढील कार्यांत सत् अनुवृत्त होतें पण व्योम अनुवृत्त होत नाहीं. ह्याप्रमाणें भेदबुद्धि उत्पन्न होते.

**सद्वस्त्वधिकवृत्तित्वाद्धर्मि व्योम्नस्तु धर्मता।**
**धिया सतः पृथक्कारे ब्रूहि व्योम किमात्मकम् ।।2-68।।**

अधिक जागीं राहणारी सद्वस्तु धर्मी होय; व त्यामुळें कमी भागांत राहणा-या आकाशाला धर्मता प्राप्त झाली. आतां विवेकानें आकाशाहून सत् निराळें केलें असतां आकाशाचें स्वरुप काय राहिलें सांग पाहूं ?

**अवकाशात्मकं तच्चेदसत्तदिति चिन्त्यताम्।**
**भिन्नं सतोऽसच्च नेति वक्षि चेद्व्याहतिस्तव ।।2-69।।**

तें अवकाशरुप असें जर म्हणशील तर तें असत् आहे असें समज. सत्हून भिन्न खरें पण असत् नव्हे असें जर म्हणशील तर तुझ्या म्हणण्यावर व्याघात हा दोष येईल.

**भातीतिचेद्भातु नाम भूषणं मायिकस्य तत्।**
**यदासद्भासमानं तन्मिथ्या स्वप्नगजादिवत् ।।2-70।।**

आकाश भासतें असें जर म्हणाल तर भासेना; कारण भासणें हें मायेचें भूषणच आहे. जें असत् असून भासणारें तें स्वप्नांतील हत्ती, घोडे इत्यादिकांप्रमाणें खोटेंच होय.

**जातिव्यक्ति देहिदेहौ गुणद्रव्ये यथा पृथक्।**
**वियत्सतोस्तथैवास्तु पार्थक्यं कोऽत्रविस्मयः ।।2-71।।**

जाति व व्यक्ति, आत्मा व देह गुण व द्रव्य हीं जशीं पृथक् तसाच आकाश व सत् यांचा पृथक्पणा असूं दे. यांत एवढें आश्चर्य तें काय आहे !

**बुद्धोऽपि भेदो नो चित्ते निरुढीं याति चेत्तदा।**
**अनैकाग्र्यात्संशयाद्वा रुढ्यभावोऽस्य ते वद ।।2-72।।**

भेद जरी असावासा वाटतो तरी तो चित्तावर आरुढ होत नाहीं असें जर म्हणणें असेल तर तो तुझ्या बुद्धीवर आरुढ न होण्याला चित्ताच्या एकाग्रतेचा अभाव हें कारण आहे, कीं तुला अजून कांहीं संशय आहे ? सांग.

**अप्रमत्तो भव ध्यानादाद्येऽन्यस्मिन्विवेचनम्।**
**कुरु प्रमाणयुक्तिभ्यां ततो रुढतमो भवेत् ।।2-73।।**

प्रथम कारण असेल तर ध्यानाच्या योगानें चित्त सावधान कर. बरें द्वितीय कारण असेल तर श्रुतिप्रमाण व तदनुकूल युक्ति यांच्या योगानें सत् व वियत् यांचें विवेचन कर. म्हणजे त्यांचा भेद बुद्धीवर आरुढ होईल.

**ध्यानान्मानाद्युक्तितोऽपि रुढे भेदे वियत्सतोः।**
**न कदाचिद्वियत्सत्यं सद्वस्तु च्छिद्रवन्न च ।।2-74।।**

ध्यानानें, प्रमाणानें व युक्तीनेंही ' आकाश व सत् यांचा भेद आहे ' असें एकदां बुद्ध्यारुढ झालें कीं मग आकाश सत्य कधींही होणार नाहीं व सद्वस्तु अवकाशयुक्त कधींही होणार नाहीं.

**ज्ञस्य भाति सदा व्योम निस्तत्त्वोल्लेखपूर्वकम्।**
**सद्वस्त्वपि विभात्यस्य निश्छिद्रत्वपुरःसरम् ।।2-75।।**

ज्ञानी पुरुषाला आकाश हें सर्वदां केवल निस्तत्त्वरुप भासतें तशीच त्याला सद्वस्तु सुद्धां अवकाशशून्य अशीच भासते.

**वासनायां प्रवृद्धायां वियत्सत्यत्ववादिनम्।**
**सन्मात्राबोधयुक्तं च दृष्ट्वा विस्मयते बुधः।। 2-76।।**

ही वासना एकदां वृद्धिंगत झाली कीं ज्ञानी पुरुष आकाश सत्य आहे असें म्हणणा-या व केवल सद्वस्तूविषयीं अज्ञानी राहणा-या पुरुषास पाहून मोठें आश्चर्य मानितो.

**एवमाकाश मिथ्यात्वे सत्सत्यत्वे च वासिते।**
**न्यायेनानेन वाय्वादेः सद्वस्तु प्रविविच्यताम् ।।2-77।।**

ह्याप्रमाणें आकाशाचें मिथ्यात्व व सत्चें सत्यत्व याविषयीं दृढ भावना झाली असतां ह्याच न्यायानें वायु, तेज इत्यादि इतर पदार्थांपासूनही सद्वस्तूचें पृथक्करण करावें.

**सद्वस्तुन्येकदेशस्था माया तत्रैक देशगम्।**
**वियत्तत्राप्येकदेशगतो वायुः प्रकल्पितः।। 2-78।।**

सद्वस्तूवर त्याच्याच एका भागांत राहणारी माया कल्पिली. नंतर त्याच सद्वस्तूच्या भागाचा आश्रय करुन राहणा-या मायेच्या कांहीं भागांत आकाशाची कल्पना केली. आणि आतां सत् व माया यांच्या आश्रयानें कल्पिलेल्या आकाशाच्या कांहीं भागावर वायूची कल्पना केली आहे.

**शोषस्पर्शौ गतिर्वेगो वायुधर्मा इमे मताः।**
**त्रयः स्वभावाः सन्मायाव्योम्नां ये तेऽपि वायुगाः।। 2-79।।**

सुकविणें, स्पर्श, गति व वेग हे वायूचे धर्म होत असें पंडितांना अभिमत आहे. व सत्, माया, व आकाश यांचे जे तीन गुण तेही वायूमध्यें आहेत.

**वायुरस्तीति सद्भावः सतो वायौ पृथक्कृते।**
**निस्तत्त्वरुपता मायास्वभावो व्योमगो ध्वनिः।। 2-80।।**

वायु आहे असा हा वायूंत सत्चा स्वभाव आहे. वायूचें सत्हून पृथक्करण केलें असतां त्याचें जें निस्तत्त्वरुप राहतें तोच मायेचा स्वभाव होय व त्याचप्रमाणें आकाशस्थ ध्वनि हा गुण वायूंत आहे.

( तात्पर्य ) वायुरुपी कार्यांत त्याच्या तीन कारणाचे तीन स्वभाव आले

आहेत ही गोष्ट सिद्ध झाली.

**सतोऽनुवृत्तिः सर्वत्र व्योम्नो नेति पुरेरितम्।**
**व्योम्नानुवृत्तिरधुना कथं न व्याहतं वचः|| 2-81||**

सत्‌ची सर्वत्र अनुवृत्ति होते व व्योमाची होत नाहीं असें पूर्वी सांगितलेंत व आतां व्योमाची वायूंत अनुवृत्ति सांगतां तेव्हां तुमचें म्हणणें व्याहत ( परस्पर विरुद्ध असल्यामुळें अप्रमाण ) कसें नव्हें ?

**छिद्रानुवृत्तिर्नेतीति पूर्वोक्तिरधुना त्वियम्।**
**शब्दानुवृत्तिरेवोक्ता वचसो व्याहतिः कुतः|| 2-82||**

वाय्वादि उत्तर कार्यांत आकाशाच्या अवकाशाची अनुवृत्ति होत नाहीं असें सांगितलें आहे. आणि आतां ही शब्दाची अनुवृत्ति मात्र सांगितली आहे. तेव्हां आतां वाचनाची व्याहति कोठून होणार ?
( तात्पर्य दोन्ही ठिकाणचे प्रसंग निरनिराळे असल्यामुळें व वस्तुतः विरुद्ध गोष्टच कोठें सांगितलेली नसल्यामुळें शंकित दोष येत नाहीं)

**ननु सद्वस्तुपार्थक्यादसत्त्वं चेत्तदा कथम्।**
**अव्यक्तमायावैषम्यादामायामयतापि नो||2-83||**

सद्वस्तूहून पृथक् असल्यामुळेंच जर वायूचें असत्त्व सिद्ध होत असेल तर मग अव्यक्त जी माया तिच्याशीं वैषम्य पावणा-या वायूच्या अमायामयतेची सुद्धां कां सिद्धि होऊं नये ?

**निस्तत्त्वरुपतैवात्र मायात्वस्य प्रयोजिका।**
**सा शक्तिकार्ययोस्तुल्या व्यक्ताव्यक्तत्वभेदिनोः|| 2-84||**

या ठिकाणीं निस्तत्त्वरुपत्व हेंच मायात्व सिद्ध करणारें आहे व तें अव्यक्त व व्यक्त या भेदांनीं युक्त असणा-या माया व मायाकार्यांत सारखेंच आहे.

**सदसत्त्वविवेकस्य प्रस्तुतत्वात्स चिन्त्यताम्।**
**असतोऽवान्तरो भेद आस्तां तच्चिन्तयात्र किम् ||2-85||**

सत्त्व व असत्त्व यांच्या विवेकाला आरंभ केलेला असल्यामुळें त्याचाच विचार करुं या. असत्‌चा अवान्तर भेद राहूं दे. कारण त्याच्या विचाराचा प्रकृत विषयाला कांहीं उपयोग होणार नाहीं.

**सद्वस्तु ब्रह्म शिष्टोंऽशो वायुर्मिथ्या यथा वियत्।**
**वासयित्वा चिरं वायोर्मिथ्यात्वं मरुतं त्यजेत् ||2-86||**

वायूंत असणारा जो सत्‌चा अंश तें ब्रह्म होय. आणि तदितर अवशिष्ट

राहिलेला जो भाग तो निस्तत्वरुप असल्यामुळें आकाशाप्रमाणेंच मिथ्या. ह्याप्रमाणें वायूच्या मिथ्यात्वाविषयीं मनाची दृढ समजूत करुन घेऊन वायूला टाकावें.

( त्याविषयीं परमार्थ भावना सोडावी. )

**चिन्तयेद्वह्निमप्येवं मरुतो न्यूनवर्तिनम्।**
**ब्रह्माण्डावरणेष्वषा न्यूनाधिकविचारणा ।।2-87।।**

वायूच्या कांहीं भागांत राहणा-या अग्नीविषयींही असाच विचार करावा. ही न्यूनाधिक विचारणा ह्या ब्रह्माण्ड गोलकामध्यें सर्व ठिकाणीं अशीच आहे.

**वायोर्दशांशतो न्यूनो वह्निर्वायौ प्रकल्पितः।**
**पुरोणोक्तं तारतम्यं दशांशैर्भूतपञ्चके ।।2-88।।**

अग्नि हा वायूमध्यें वायूहून दहा अंशांनीं न्यून असा कल्पिलेला आहे. पांचही भूतांविषयींचें हें दशांशकृत तारतम्य पुराणांत सांगितलें आहे.

**वह्निरुष्णः प्रकाशात्मा पूर्वानुगतिरत्र च।**
**अस्ति वह्निः स निस्तत्त्वः शब्दवान् स्पर्शवानपि ।।2-89।।**

अग्नि उष्ण व प्रकाशात्मा आहे. व ह्यांत कारणगुणांचीही अनुवृत्ति होते. कशी ती पहा- वह्नि आहे ( सद्रूप ) तो निस्तत्त्व ( मायारुप ) शब्दवान् ( आकाशगुण ) व स्पर्शवान् सुद्धां आहे.

**सन्मायाव्योमवाय्वंशैर्युक्तस्याग्नेर्निजो गुणः।**
**रुपं तत्र सतः सर्वमन्यद्बुद्ध्या विविच्यताम् ।।2-90।।**

सत्, माया, आकाश व वायु यांच्या अंशांनीं युक्त असलेल्या अग्नीचा स्वतःचा गुण रुप हा आहे. त्यांतूनही सत्हून भिन्न असलेल्या सर्वांचें विवेक बुद्धीनें पृथक्करण करावें.

**सतो विवेचिते वन्हौ मिथ्यात्वे सति वासिते।**
**आपो दशांशतो न्यूनाः कल्पिता इति चिन्तयेत् ।।2-91।।**

ह्याप्रमाणें सत्हून वन्हीचें पृथक्करण केलें असतां व त्याच्या मिथ्यात्वाविषयीं पूर्ण निश्चय झाला असतां त्याच्या ठिकाणीं दशांशांनीं न्यून असें उदक कल्पिलें आहे अशी भावना करावी.

**सन्त्यापोऽमूः शून्यतत्त्वाः सशब्दस्पर्शसंयुताः।**
**रुपवत्योऽन्यधर्मानुवृत्या स्वीयो रसो गुणः।। 2-92।।**

उदकाच्या कारणधर्मामुळें उदक आहे, तें शून्यरुप, शब्द व स्पर्शयुक्त व रुपवान् आहे, असा व्यवहार होतो व त्याचा स्वतः गुण रस हा आहे ( सारांश पूर्वी प्रमाणेंच यांतही गुण आले आहेत व रस हा त्याचा स्वभावभूत गुण आहे ).

**सतो विवेचितास्वप्सु तन्मिथ्यात्वे च वासिते।**
**भूमिर्दशांशतो न्यूना कल्पिताऽप्स्विति चिन्तयेत् ।।2-93।।**

सत्‌हून उदक पृथक् आहे. असा निश्चय होऊन त्याच्याविषयीं दृढ मति झाली असतां. उदकांमध्यें त्याहून दशांश न्यून अशा भूमीची कल्पना केली आहे अशी भावना करावी.

**अस्ति भूस्तत्त्वशून्यास्यां शब्द स्पर्शौ सरुपकौ।**
**रसश्च परतो गन्धो नैजः सत्ता विविच्यताम् ।।2-94।।**

भूमि आहे, ती तत्त्वशून्य आहे. तिच्यांत रुपासह शब्द व स्पर्श व रस परतः गुण येतात. पण गंध हा स्वरुपभूत गुण आहे. त्या सर्वांपासून सत्तेचें पृथक्करण करावें.

**पृथक्कृतायां सत्तायां भूमिर्मिथ्याऽवशिष्यते।**
**भूमेर्दशांशतो न्यूनं ब्रह्माण्डं भूमिमध्यगम् ।।2-95।।**

ह्याप्रमाणें भूमीच्या सर्व धर्मापासून सत्ता पृथक् केली असतां मिथ्या भूमि मात्र अवशिष्ट रहाते. ह्या भूमीच्या मध्यभागीं भूमीहून दशांशांनीं न्यून असें ब्रह्माण्ड आहे.

**ब्रह्माण्डमध्ये तिष्ठन्ति भुवनानि चतुर्दश।**
**भुवनेषु वसन्तेषु प्राणिदेहा यथायथम् ।।2-96।।**

ब्रह्माण्डामध्यें भूः, भुवः, इत्यादि सप्त उर्ध्व लोक व तल अतल इत्यादि सप्त अधो लोक राहतात. ह्या चवदा लोकांमध्यें असंख्य प्राण्यांचे देह शास्त्रव्यवस्थेप्रमाणें राहतात.

**ब्रह्माण्डलोकदेहेषु सद्वस्तुनि पृथक्कृते।**
**असन्तोऽण्डदयो भान्तु तद्भानेऽपीह का क्षतिः ।।2-97।।**

ब्रह्माण्ड, सर्व लोक व चतुर्विध देह यांतून त्रिकालाबाधित सद्वस्तु पृथक् केली असतां नंतर असद्रूप जे ब्रह्माण्डादि पदार्थ ते खुशाल भासोत. ते भासले तरी त्यापासून कांहींएक हानि होत नाहीं.

**भूतभौतिकमायानामसमत्वेऽत्यन्तवासिते ।**

**सद्वस्त्वद्वैतमित्येषा धीर्विपर्येति न क्वचित् ||2-98||**

भूत, भौतिक व माया यांचें असत्त्व एकदां निश्चित होऊन तें अत्यंत दृढ झालें कीं मग सद्वस्तु अखण्ड व त्रिविध भेदशून्य आहे ही समजूत कधींही बदलत नाहीं. ( म्हणजेच सद्वस्तूच्या अखण्डत्वाविषयीं वगैरे कधींही संशय उत्पन्न होत नाहीं )

**सदद्वैतात्पृथग्भूते द्वैते भूम्यादिरुपिणि।**
**तत्तदर्थक्रिया लोके यथा दृष्टा तथैव सा ||2-99||**

भूमि, आप इत्यादिरुप द्वैत सद्रूप अद्वैताहून पृथक् आहे असें एकदां समजल्यानंतर व्यवहारांत त्यांच्या योगानें होणारा व्यापार पूर्वी जसा होत होता तसाच तो पुढेंही होईल.

**सांख्यकाणादबौद्धाद्यैर्जगद्भेदो यथा यथा।**
**उत्प्रेक्ष्यतेऽनेकयुक्त्या भवत्वेष तथा तथा||2-100||**

अनेक युक्ति योजून सांख्यशास्त्रकार, वैशेषिक शास्त्रकार नास्तिक बुद्ध इत्यादि वादी जगाचा भेद जसा जसा कल्पितात तसा तसाच तो असूंदे.

**अवज्ञातं सदद्वैतं निःशंकैरन्यवादिभिः।**
**एवं का क्षतिरस्माकं तद्द्वैतमवजानताम् ||2-101||**

त्या निःशंक अशा दुस-या वाद्यांनी अद्वैत सद्वस्तूची जर अवज्ञा केलेली आहे तर मग त्यांच्या द्वैताची अवज्ञा करणा-या आम्हांला तरी काय भीति आहे ?

**द्वैतावज्ञा सुस्थिता चेदद्वैते धीः स्थिरा भवेत्।**
**स्थैर्ये तस्याःपुमानेष जीवन्मुक्त इतीर्यते ||2-102||**

जर द्वैताविषयीं अवज्ञा दृढ झाली तरच अद्वैतांत बुद्धि स्थिर होईल. आणि अद्वैताविषयीं बुद्धि स्थिर झाली कीं, त्या पुरुषाला जीवन्मुक्त असें म्हणतात.

**एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति।**
**स्थित्वाऽस्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ||2-103||**

भगवान् म्हणतात- हे अर्जुना, ही अद्वैत ब्रह्मात्मैक्यसंबंधि स्थिति आहे. ही स्थिति ज्याला प्राप्त झाली आहे असा कोणीही प्राणी तुझ्या सारखा मोहित होत नाहीं. प्राण्याला अन्त्यकाळीं जरी ही स्थिति प्राप्त झाली तरी त्याला ब्रह्मनिर्वाण मिळतें.

**सदद्वैतेऽनृतद्वैते यदन्योऽन्यैक्यवीक्षणम्।**
**तस्यान्तकालस्तद्भेदबुद्धिरेव न चेतरः।। 2-104।।**

सत्य असें अद्वैत व मिथ्याभूत द्वैत यांविषयीं जी परस्पर ऐक्यदृष्टि तिचा अंतकाल म्हणजे त्यांच्या विषयींची भेदबुद्धिच होय. अन्य कांहीं एक नव्हे.

**यद्वाऽन्त कालः प्राणस्य वियोगोऽस्तु प्रसिद्धितः।**
**तस्मिन् कालेऽपि न भ्रान्तेर्गतायाः पुनरागमः।। 2-105।।**

किंवा लोकप्रसिद्धीप्रमाणें प्राणाचा वियोग हाच अंतकाल असो. त्याकालीं सुद्धां एकदां गेलेली भ्रान्ति पुनः येणार नाहीं.

**नीरोग उपविष्टो वा रुग्णो वा विलुठन्भुवि।**
**मूर्च्छितो वा त्यजत्वेष प्राणान् भ्रान्तिर्न सर्वथा ।।2-106।।**

हा साधक निरोगी असतांना, बसलेला असतांना, रोगी असतांना, क्लेशांनीं जमिनीवर गडबड लोळत असतांना, किंवा मुर्च्छित असतांना सुद्धां जरी मृत झाला तरी त्याला पुनः द्वैतविषयक भ्रांति कधींही होत नाहीं.

**दिने दिने स्वप्न सुप्त्योरधीते विस्मृतेऽप्ययम्।**
**परेद्युर्नानधीतः स्यात्तद्वद्विद्या न नश्यति ।।2-107।।**

प्रतिदिनीं स्वप्न व निद्रावस्थेंत जेव्हां प्राणी असतो तेव्हां तो अध्ययन केलेलें जरी सर्व विसरतो तरी दुस-या दिवशीं जसा तो अनधीत ( अध्ययन न केलेला असा ) होत नाहीं, त्याचप्रमाणें मृत होण्यापूर्वी प्राप्त होणा-या मूर्च्छेत विसरलेली विद्या नष्ट होत नाहीं.

**प्रमाणोत्पादिता विद्या प्रमाणं प्रबलं विना।**
**न नश्यति न वेदान्तात्प्रबलं मानमीक्ष्यते ।।2-108।।**

प्रमाणानें उत्पन्न झालेलें ज्ञान पूर्व प्रमाणाहून प्रबल प्रमाणावांचून नष्ट होत नाहीं. शिवाय वेदान्ताहून प्रबल प्रमाण तर कांहींच दिसत नाहीं.

**तस्माद्वेदान्त संसिद्धं सदद्वैतं न बाध्यते।**
**अन्तकालेऽप्यतो भूतविवेकान्निर्वृतिः स्थिता।।2-109।।**

यास्तव वेदान्तद्वारा पूर्णपणें सिद्ध झालेलें अद्वैतरुपसत् अंतकालीं सुद्धां बाधित होत नाहीं. तस्मात् भूतविवेक केल्यानें मोक्षप्राप्ति होते ( हें सिद्ध झालें. )

**इति द्वितीयोऽध्यायः ।।2।।**

---

**अथ तृतीयोऽध्यायः।**

**पञ्चकोशविवेकः।**

**गुहाहितं ब्रह्म यत्तत् पञ्चकोशविवेकतः।**
**बोद्धुं शक्यं ततः कोशपञ्चकं प्रविविच्यते ।।3-1।।**

जें गुहेंत राहिलेलें ब्रह्म तें पांच कोशांच्या विवेकानें जाणणें शक्य आहे. यास्तव पंचकोशाचें स्पष्टपणें विवेचन करितों.

**देहादभ्यन्तरः प्राणः प्राणादभ्यन्तरं मनः।**
**ततः कर्ता ततो भोक्ता गुहा सेयं परम्परा ।।3-2।।**

प्राण हा देहाच्या आंत आहे. मन प्राणाच्याही आंत आहे. मनानंतर कर्ता व कर्त्यानंतर भोक्ता अशी जी परंपरा तीच गुहा होय.

**पितृ भुक्तान्नजाद्वीर्याज्जातोऽन्नेनैव वर्धते।**
**देहः सोऽन्नमयो नात्मा प्राक्चोर्ध्वं तदभावतः ।।3-3।।**

जो पित्यानें भक्षण केलेल्या अन्नापासून उत्पन्न झालेल्या वीर्यापासून उत्पन्न होतो व जो अन्नानेंच वाढतो तो अन्नमय देह आत्मा नव्हे. कारण उत्पत्तीपूर्वीं व नाशानंतर त्याचा अभाव असतो.

**पूर्वं जन्मन्यसन्नेतज्जन्म सम्पादयेत्कथम्।**
**भाविजन्मन्यसन्कर्म न भुञ्जीतेह संचितम् ।।3-4।।**

स्थूल देहरुप आत्मा पूर्वजन्मीं नव्हता ( असें जर मानलें तर ) मग त्याला हा जन्म कसा प्राप्त झाला ? तसेंच, उत्तर जन्मांतही तो नसणारच ! अर्थात् ह्या जन्मीं केलेल्या कर्माचेंही त्याला फल मिळणें नाहीं ?

**पूर्णो देहे बलं यच्छन्नाक्षाणां यः प्रवर्तकः।**
**वायुः प्राणमयो नासावात्मा चैतन्यवर्जनात् ।।3-5।।**

जो देहाला सामर्थ्य देणारा, देहांत भरुन राहणारा व इंद्रियांचा प्रवर्तक तो हा प्राणमय वायु चैतन्यरहित असल्यामुळें आत्मा नव्हे.

**अहन्तां ममतां देहे गेहादौ च करोति यः।**
**कामाद्यवस्थया भ्रान्तो नासावात्मा मनोमयः।। 3-6।।**

जो देहावर अहंता व गृहादिकांचे ठिकाणीं ममता ठेवितो तो हा कामादि अवस्थांनीं भ्रमिष्ट झालेला मनोमय कोश आत्मा नव्हे.

**लीना सुप्तौ वपुर्बोधे व्याप्नुयादानखाग्रगा।**

**चिच्छायोपेतधीर्नात्मा विज्ञानमयशब्दभाक् ।।3-7।।**

जी चैतन्याभासयुक्त बुद्धि निद्रावस्थेंत लीन होऊन जाग्रत्कालीं पायांच्या नखांपासून मस्तकापर्यंत राहून शरीर व्यापिते ती विज्ञानमय शब्दाला पात्र होणारी ( बुद्धि ) आत्मा नव्हे.

**कर्तृत्वकरणत्वाभ्यां विक्रियेतान्तरिन्द्रियम्।**
**विज्ञानमनसी अन्तर्बहिश्चैते परस्परम् ।।3-8।।**

हें अंतःकरण कर्तृरुपानें व साधनरुपानें विकार पावतें. ह्यांनाच विज्ञान व मन असें म्हणतात. व हीं परस्पर आंत व बाहेर अशीं राहतात.

**काचिदन्तर्मुखा वृत्तिरानन्दप्रतिबिम्बभाक्।**
**पुण्यभोगे भोगशान्तौ निद्रारुपेण लीयते ।।3-9।।**

पुण्यफलभोगकालीं एक अंतःकरणवृत्ति अंतर्मुख होऊन आनंदाच्या प्रतिबिंबाला पात्र होते. व तीच भोग संपला असतां निद्रारुपानें लीन होते.

**कादाचित्कत्वतोऽनात्मा स्यादानन्दमयोऽप्यम्।**
**बिम्बभूतो य आनन्द आत्माऽसौ सर्वदा स्थितेः ।।3-10।।**

केव्हां केव्हां प्रतीत होत असल्यामुळें हा आनंदमय सुद्धां आत्मा नव्हे, तर बिंबभूत असा जो आनंद तो नित्य असल्यामुळें आत्मा होय.

**ननु देहमुपक्रम्य निद्रानन्दान्तवस्तुषु।**
**मा भूदात्मत्वमन्यस्तु न कश्चिदनुभूयते ।।3-11।।**

देहापासून कारणशरीररुप आनंदमयापर्यंत जे कोश आहेत त्यांतील एकालाही आत्मता नसो. पण त्यांहून अन्य तर कोणी आत्मा प्रतीत होत नाहीं.

**बाढं निद्रादयः सर्वेऽनुभूयन्ते न चेतरः।**
**तथाप्येतेऽनुभूयन्ते येन तं को निवारयेत् ।।3-12।।**

खरें आहे. आनंदमयादि सर्व कोशांची प्रतीति येते व त्यांच्याहून इतर कोणी प्रतीत होत नाहीं हें खरें. पण हे आनंदमयादि कोश ज्याच्यामुळें अनुभवाला येतात त्याचें कोण निवारण करणार बाबा ?

**स्वयमेवानुभूतित्वाद्विद्यते नानुभाव्यता।**
**ज्ञातृ ज्ञानान्तराभावादज्ञेयो न त्वसत्तया ।।3-13।।**

ह्या आत्म्यालाच अनुभूतीता असल्यामुळें हा अनुभाव्य होत नाहीं. दुसरा

ज्ञाता व दुसरें ज्ञान नसल्यामुळेंच हा अज्ञेय आहे. तो मुळींच नसल्यामुळें अज्ञेय आहे असें नव्हे.

**माधुर्यादिस्वभावानामन्यत्र स्वगुणार्पिणाम्।**
**स्वस्मिंस्तदर्पणापेक्षा नो न चास्त्यन्यदर्पकम् ।।3-14।।**

अन्य पदार्थांना स्वतःचा गुण अर्पण करणा-या मधुरता इत्यादि स्वभावाच्या शर्करादि पदार्थांना स्वतःमध्यें तोच स्वभाव अर्पण करणारा कोणी लागत नाहीं. शिवाय त्यांना अन्य कोणी माधुर्य देणारा नसतो.

**अर्पकान्तरराहित्येऽप्यस्त्येषां तत्स्वभावता।**
**मा भूत्तथानुभाव्यत्वं बोधात्मा तु न हीयते ।।3-15।।**

मधुरता इत्यादि गुण देणारा अन्य पदार्थ जरी नसला तरी शर्करादिकांचा जसा तो स्वभावच असतो त्याप्रमाणें ह्या आत्म्याला अनुभाव्यता जरी नसली तरी त्याच्या अनुभवरुपतेची हानि होत नाहीं.

**स्वयं ज्योतिर्भवत्येष पुरोऽस्माद्भासतेऽखिलात्।**
**तमेव भान्तमन्वेति तद्भासा भास्यते जगत् ।।3-16।।**

हा पुरुष स्वयमप्रकाश आहे. सृष्टींतील ह्या सर्व पदार्थांच्या अगोदर हा भासतो. तो भासल्यानंतर त्याच्या भासानें सूर्यादि गोल भासतात. व त्याच्या प्रकाशानेंच हें सर्व जग भासतें.

**येनेदं जानते सर्वं तत्केनान्येन जानताम्।**
**विज्ञातारं केन विंद्याच्छक्तं वेद्ये तु साधनम् ।।3-17।।**

ज्याच्या योगानें हें सर्व समजतें तें अन्य कोणत्या जड पदार्थानें समजणार आहे ? जो विज्ञाता त्याला वेद्यरुप अशा कोणत्या पदार्थानें जाणावें. कारण ( इंद्रियरुप ) साधन ज्ञानाला विषय होणा-या पदार्थाचें ज्ञान करुन देण्यास समर्थ होत असतें.

**स वेत्ति वेद्यं तत्सर्वं नान्यस्तस्यास्ति वेदितः।**
**विदिताविदिताभ्यां तत्पृथग्बोधस्वरुपकम् ।।3-18।।**

तो आत्मा हें सर्व वेद्य ( ज्ञानविषय जग ) जाणतो. पण त्याला जाणणारा दुसरा कोणी नाहीं. तें बोधस्वरुप, ज्ञात व अज्ञात यांहून विलक्षणच आहे.

**बोधेऽप्यनुभवो यस्य न कथंचन जायते।**
**तं कथं बोधयेच्छास्त्रं लोष्टं नरसमाकृतिम् ।।3-19।।**

ज्याला घटादि पदार्थांचें ज्ञान होत असूनही ह्या बोधाचा साक्षात्कार कसाच

होत नाहीं त्या मनुष्यरुपी दगडाला शास्त्र कसें समजिवणार?

**जिह्वा मेऽस्ति न वेत्युक्तिर्लज्जायै केवलं यथा।**
**न बुध्यते मया बोधो बोद्धव्य इति तादृशी ||3-20||**

मला जिव्हा आहे कीं नाहीं असा ( स्वमुखानें ) प्रश्न करणें जसें केवळ लज्जास्पद तसेंच मी बोधाला जाणत नाहीं. मला तो यापुढें समजून घ्यावयाचा आहे असें म्हणणेंही लज्जास्पदच होय.

**यस्मिन्यस्मिन्नस्ति लोके बोधस्तत्तदुपेक्षणे।**
**यद्बोधमात्रं तद्ब्रह्मेत्येवंधीर्ब्रह्मनिश्चयः|| 3-21||**

व्यवहारांत आपणाला जें जें घटपटादिविषयक ज्ञान असतें तें तें टाकिलें असतां जें बोधमात्र रुप रहातें तेंच ब्रह्म अशा प्रकारची जी बुद्धि तोच ब्रह्मनिश्चय होय.

**पञ्चकोशपरित्यागे साक्षिबोधावशेषतः।**
**स्वस्वरुपं स एव स्याच्छून्यत्वं तस्य दुर्घटम् ||3-22||**

पांचही कोश निस्तत्त्वरुप आहेत; असें समजून त्यांना टाकिलें असतां साक्षिरुप बोध अवशिष्ट रहातो. तोच स्वस्वरुप होय. तो शून्य आहे असें म्हणणें तर दुर्घट आहे. ( हें पूर्वींच सांगितलें आहे.)

**अस्ति तावत्स्वयं नाम विवादाविषयत्वतः।**
**स्वस्मिन्नपि विवादश्चेत्प्रतिवाद्यत्र को भवेत् ||3-23||**

स्वतःविषयीं कधींच वाद नसल्यामुळें स्वयं म्हणून कोणी आहेच. आतां स्वतःविषयींच जर विवाद असेल तर विवादांतील प्रतिवादी कोण आहे ?

**स्वासत्त्वं तु न कस्मैचिद्रोचते विभ्रमं विना।**
**अत एव श्रुतिर्बाधं ब्रूते चासत्त्ववादिनः ||3-24||**

भ्रमावांचून स्वतःचें नास्तित्व कोणालाही आवडत नाहीं. एवढ्याकरितांच श्रुति शून्यवाद्याला मोठा प्रत्यवाय सांगते.

**असद्ब्रह्मेति चेद्वेद स्वयमेव भवेदसत्।**
**अतोऽस्य मा भूद्वेद्यत्वं स्वसत्त्वं त्वभ्युपेयताम् ||3-25||**

ब्रह्म असत् ( अविद्यान ) आहे असें जर जाणलें तर स्वतःच असत् होतो. म्हणून ह्याला वेद्यत्व नसेना कां ! पण स्वसत्त्व तर आहेच असें समजावें.

**कीदृक्तर्हीति चेत्पृच्छेदीदृक्ता नास्ति तत्र हि।**
**यदनीदृगतादृक्च तत्स्वरुपं विनिश्चिनु ||3-26||**

' तर मग त्याच्या स्वरुपाचा प्रकार तरी काय आहे ' असें जर विचारशील तर आत्म्यामध्यें अमुक असा प्रकार नाहींच. जें अशा प्रकारचें नव्हे व तशा प्रकारचेंही नव्हे तें स्वरुप असा निश्चय कर.

**अक्षाणां विषयस्त्वीदृक् परोक्षस्तादृगुच्यते ।**
**विषयी नाक्षविषयः स्वत्वान्नास्य परोक्षता ।।3-27।।**

जो पदार्थ इंद्रियांना विषय होतो त्याला ईदृक् ( अशाप्रकारचा ) व जो इंद्रियांना गोचर होत नाहीं त्याला तादृक् ( तशाप्रकारचा ) असें म्हणतात. पण हा विषयी ( विषयांचा भोक्ता ) इंद्रियविषय नाहीं; व ह्याला स्वत्व असल्यामुळें हा परोक्षही नाहीं.

**अवेद्योऽप्यपरोक्षोऽतः स्वप्रकाशो भवत्ययम्।**
**सत्यं ज्ञानमनन्तं चेत्यस्तीह ब्रह्मलक्षणम् ।।3-28।।**

हा आत्मा अज्ञेय असला तरी प्रत्यक्ष ( साक्षात, स्वसंवेद्य ) आहे. म्हणून तो स्वप्रकाश होय. ह्याचे ठिकाणीं सत्य, ज्ञान व अनंत असें श्रुत्युक्त ( श्रुतीनें सांगितलेलें ) ब्रह्माचें लक्षण आहे.

**सत्यत्वं बाधराहित्यं जगद्बाधैकसाक्षिणः।**
**बाधः किं साक्षिको ब्रूहि न त्वसाक्षिक इष्यते ।।3-29।।**

सत्यत्व म्हणजे बाधशून्यता. जगाच्या बाधाचा जो मुख्य साक्षी त्याचा जर बाध होत असेल, तर त्याचा साक्षी कोण तें सांग पाहूं. बाध तर साक्षिरहित होणें इष्ट नाहीं.

**अपनीतेषु मूर्तेषु ह्यमूर्तं शिष्यते वियत्।**
**शक्येषु बाधितेष्वन्ते शिष्यते यत्तदेव तत् ।।3-30।।**

ह्या सर्वही साकार पदार्थांचा ( विचारानें ) नाश केल्यावर सुद्धां निराकार आकाश जसें अवशिष्ट रहातें तसें अनात्मभूत अशा सर्व पदार्थांचा बाध केला असतां शेवटीं जें अवशिष्ट रहातें तेंच आत्मतत्त्व होय.

**सर्वं बाधे न किंचिच्चेद्यन्न किंचित्तदेव तत्।**
**भाषा एवात्र भिद्यन्ते निर्बाधं तावदस्ति हि ।।3-31।।**

सर्वाचा बाध केल्यावर कांहीं राहत नाहीं असें जर म्हणशील तर तुझ्या दृष्टीनें जें कांहीं नाहीं तेंच तें तत्त्व होय.

ह्याठिकाणीं शब्दांचा मात्र भेद आहे. बाकी बाधरहित तत्त्व आहेच.

**अत एव श्रुतिर्बाध्यं बाधित्वा शेषयत्यदः ।**

**स एष नेति नेत्यात्मेत्यतद्व्यावृत्तिरुपतः ||3-32||**

या करितांच श्रुतीसुद्धां ' तो हा आत्मा मूर्त नव्हे व अमूर्तही नव्हे तर जें जें दृश्य त्या त्याहून तो भिन्न आहे ' अशा रीतीनें अनात्मभूत पदार्थाच्या व्यावृत्तिद्वारा ( यच्चयावत् बाध्याचा बाध करुन ह्याचा बोध करविते ) अवशिष्ट राखिते.

**इदं रुपं तु यद्यावत्तत्त्यक्तुं शक्यतेऽखिलम्।**
**अशक्यो ह्यनिदंरुपः स आत्मा बाधवर्जितः ||3-33||**

जेवढें म्हणून प्रत्यक्ष भासतें तें सर्व टाकितां येतें. पण जें इंद्रियगम्य नसतें त्याचा त्याग करितां येत नाहीं. जो बाधरहित तोच आत्मा होय.

**सिद्धं ब्रह्मणि सत्यत्वं ज्ञानत्वं तु पुरेरितम्।**
**स्वयमेवानुभूतित्वादित्यादि वचनैः स्फुटम् ||3-34||**

ह्याप्रमाणें ब्रह्माच्या ठिकाणचें सत्यत्व सिद्ध झालें. ज्ञानत्व तर पूर्वी ' स्वतः ह्यालाच अनूभूतित्व असल्यामुळें ' इत्यादि वचनांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे.

**न व्यापित्वाद्देशतोऽन्तो नित्यत्वान्नापि कालतः।**
**न वस्तुतोऽपि सार्वात्म्यादानन्त्यं ब्रह्मणि त्रिधा ||3-35||**

ब्रह्म व्यापि असल्यामुळें त्याचा देशतः अंत होत नाहीं. तें नित्य असल्यामुळें त्याचा कालाच्या योगानेंही अंत होत नाहीं. व तें सर्वान्तर्यामि असल्यामुळें त्याचा वस्तुतःही अंत होत नाहीं. यास्तव ब्रह्माच्या ठिकाणीं तीन प्रकारचें आनन्त्य सिद्ध झालें.

**देशकालान्यवस्तूनां कल्पितत्वाच्च मायया।**
**न देशादिकृतोऽन्तोऽस्ति ब्रह्मानन्त्यं स्फुटं ततः ||3-36||**

देश, काल व अन्य पदार्थ हे मायेनें कल्पित असल्यामुळें ब्रह्माचा त्यांच्यामुळें अंत होत नाहीं. तस्मात् ब्रह्माचें आनंत्य स्पष्टच आहे.

**सत्यं ज्ञानमनन्तं यद्ब्रह्म तद्वस्तु तस्य तत्।**
**ईश्वरत्वं च जीवत्वमुपाधिद्वयकल्पितम् ||3-37||**

जें सत्य, ज्ञान व अनन्त ब्रह्म तें मात्र पारमार्थिक होय. त्याचें जें ईश्वरत्व व जीवत्व तें दोन उपाधींनीं कल्पित आहे.

**शक्तिरस्त्यैश्वरी काचित्सर्ववस्तुनियामिका।**
**आनन्दमयमारभ्य गूढा सर्वेषु वस्तुषु ||3-38||**

ईश्वरोपाधिभूत अशी कोणी एक सर्व पदार्थांचें नियमन करणारी शक्ति आहे. ती आनंदमय कोशापासून सर्व वस्तूंत गुप्तपणें राहते.

**वस्तुधर्मा नियम्येरञ्शक्त्या नैव यदा तदा।**
**अन्योन्यधर्मसांकर्याद्विप्लवेत जगत्खलु ।।3-39।।**

जर ह्या शक्तीनें वस्तूंचे धर्म नियमित न केले तर पदार्थांच्या धर्मांचा परस्पर संकर होऊन जगाचा खरोखर नाश होईल.

**चिच्छायावेशतः शक्तिश्चेतनेव विभाति सा।**
**तच्छक्त्युपाधि संयोगाद्ब्रह्मैवेश्वरतां व्रजेत् ।।3-40।।**

चैतन्याच्या आभासाचा त्या शक्तींत प्रवेश झाल्यामुळें ती सचेतन असल्यासारखी वाटते. व उपाधिरुप अशा त्या शक्तीशीं संयुक्त झाल्यामुळें ब्रह्मालाच ईश्वरता येते.

**कोशोपाधिविवक्षायां याति ब्रह्मैव जीवताम्।**
**पिता पितामहश्चैकः पुत्रपौत्रौ यथा प्रति ।।3-41।।**

अन्नादि कोशांकडे दृष्टी देऊन विचार करुं लागलें असतां ब्रह्मच जीव होतें. म्हणजे जसा एकच पुरुष पुत्र व नातु यांचा पिता व आजा होतो तसाच हा प्रकार आहे.

**पुत्रादेरविवक्षायां न पिता न पितामहः।**
**तद्वन्नेशो नापि जीवः शक्तिकोशाविवक्षणे ।।3-42।।**

ज्याप्रमाणें पुत्रादिकांचा विचार कर्तव्य नसतां पिता व आजाही नसतो त्याचप्रमाणें मायाशक्ति व अनादि कोश यांचा विचार कर्तव्य नसला कीं मग ईश्वर नाहीं व जीवही नाहीं.

**य एवं ब्रह्म वेदैष ब्रह्मैव भवति स्वयम्।**
**ब्रह्मणो नास्ति जन्मातः पुनरेष न जायते ।।3-43।।**

ह्याप्रमाणें जो ब्रह्म जाणतो तो स्वतः ब्रह्मच होतो. ब्रह्माला जन्म नसतो; त्यामुळें हाही पुनः जन्माला येत नाहीं.

**इति तृतीयोऽध्यायः ।।3।।**

---

**अथ चतुर्थोऽध्यायः।**

**द्वैतविवेकः।**

**ईश्वरेणापि जीवेन सृष्टं द्वैतं विविच्यते।**
**विवेके सति जीवेन हेयो बन्धः स्फुटीभवेत् ।।4-1।।**

ईश्वरानें व जीवानेंही उत्पन्न केलेल्या द्वैताचें विवेचन करितों. या द्वैताचा विवेक झाला कीं, जीवाला टाकण्यास योग्य असा बंध स्पष्ट होईल.

**मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम्।**
**स मायी सृजतीत्याहुः श्वेताश्वतरशाखिनः ।।4-2।।**

मायेला प्रकृति व मायावानाला परमेश्वर समजावें. तो मायावी ईश्वर सृष्टि करितो असें श्वेताश्वतर नामक यजुः-
शाखेंत सांगितलें आहे.

**आत्मा वा इदमग्रेऽभूत्स ईक्षत सृजा इति।**
**संकल्पेनासृजल्लोकान्स एतानिति बह्वृचाः ।।4-3।।**

सृष्टीच्या पूर्वी हें जग आत्माच होतें. ' मी आतां सृष्टि करावी ' अशी त्याला इच्छा झाली. त्यानें हे सर्व लोक संकल्पानें निर्माण केले, असें ऋग्वेदाचें अध्ययन करणारे म्हणतात.

**खं वाय्वाग्नि जलोर्व्योषध्यन्नदेहाः क्रमादमी।**
**संभूता ब्रह्मणस्तस्मादेतस्मादात्मनोऽखिलाः ।।4-4।।**

हे सर्व आकाश, वायु, तेज, उदक, पृथ्वी, ओषधी, अन्न, देह इत्यादि पदार्थ क्रमानें ब्रह्मापासून उत्पन्न झाले.
( तें ब्रह्म कसें आहे ? असें कोणी म्हणतील, म्हणून श्रुति तीन विशेषणें योजिते ) सत्य, ज्ञान व अनंत या स्वरुपाच्या व सर्व प्राण्यांच्या हृदयांत आत्मरुपानें साक्षात् प्रतीत होणा-या ब्रह्मापासून हें सर्व उत्पन्न झालें.

**बहु स्यामहमेवातः प्रजायेयेति कामतः।**
**तपस्तप्त्वाऽसृजत्सर्वं जगदित्याह तित्तिरिः ।।4-5।।**

त्याअर्थी ' मींच प्राण्यांकरितां अनेक व्हावें अशा इच्छेनें तप करुन त्यानें सर्व जगत् निर्माण केलें ' असें तित्तिरिश्रुतिही सांगते.

**इदमग्रे सदेवासीद्बहुत्वाय तदैक्षत।**
**तेजोऽबन्नाण्डजादीनि ससर्जेति च सामगाः ।।4-6।।**

हें सर्व पूर्वी सतच होतें. त्यानें पुष्कळ व्हावें असा विचार केला; आणि

तेज, उदक, अन्न व अंडजादि देह उत्पन्न
केले, असें सामवेदी म्हणतात.

**विस्फुलिङ्गा यथा वह्नेर्जायन्ते ऽक्षरतस्तथा।**
**विविधाश्चिज्जडा भावा इत्याथर्वणिक श्रुतिः ।।4-7।।**

ज्याप्रमाणें अग्नीपासून ठिणग्या उत्पन्न होतात त्याचप्रमाणें अक्षरसंज्ञक परमेश्वरापासून नानाप्रकारचे जड व सजीव पदार्थ उत्पन्न होतात; असें अथर्ववेदीय श्रुति सांगते.

**जगदव्याकृतं पूर्वमासीद्व्याक्रियताधुना।**
**दृश्याभ्यां नामरुपाभ्यां विराडादिषु ते स्फुटे।।4-8।।**
**विराण्मनुर्नरो गावः खराश्वाजावयस्तथा।**
**पिपीलिकावधि द्वन्द्वमिति वाजसनेयिनः ।।4-9।।**

पूर्वी हें जग अव्यक्त ( अस्पष्ट ) होतें. तें ईश्वरानें आतां अनुभवास योग्य अशा नामरुपांनीं व्यक्त केलें. तीं नामें व रुपें ( आकार इत्यादि ) विराटादि प्राण्यांमध्यें स्पष्टपणें प्रतीत होतात. ( कशीं म्हणशील तर ऐक ) विराट्, मनु, मनुष्यें, गाई, गर्दभ, अश्व, बकरीं, मेंढ्या तसेच मुंगीपर्यंत सर्व लहानथोर प्राणी त्यानें उत्पन्न केले असें वाजसनेयी शाखाध्यायी सांगतात.

**कृत्वा रुपान्तरं जैवं देहे प्राविशदीश्वरः।**
**इति ताः श्रुतयः प्राहुर्जीवत्वं प्राणधारणात् ।।4-10।।**

जीवसंबंधीं असें निराळें रुप करुन ईश्वर देहांत प्रविष्ट झाला, असे त्या श्रुति सांगतात. प्राणादिकांच्या धारणामुळें त्या ब्रह्माकडे जीवत्व आलें आहे.

**चैतन्यं यदधिष्ठानं लिङ्गदेहश्च यः पुनः।**
**चिच्छाया लिङ्गदेहस्था तत्संघो जीव उच्यते ।।4-11।।**

जें अधिष्ठान चैतन्य, तसेंच जो लिंगदेह आणि जी लिंग देहस्थ चैतन्याची छाया यांच्या समुदायाला जीव असें म्हणतात.

**माहेश्वरी तु माया या तस्या निर्माणशक्तिवत्।**
**विद्यते मोहशक्तिश्च तं जीवं मोहयत्यसौ ।।4-12।।**

जी ईश्वराची महा माया तिची निर्माण करण्याच्या शक्तीप्रमाणेंच मोहशक्तीही आहे. ती त्या जीवाला मोहित करिते.

**मोहादनीशतां प्राप्य मग्नो वपुषि शोचति।**

**ईशसृष्टमिदं द्वैतं सर्वमुक्तं समासतः ||4-13||**

मोहामुळें हा परतंत्र होऊन शरीरांत निमग्न होत्साता शोक करितो. असो ह्याप्रमाणें हें ईश्वरनिर्मित सर्व द्वैत संक्षेपतः सांगितलें.

**सप्तान्न ब्राह्मणे द्वैतं जीवसृष्टं प्रपञ्चितम्।**
**अन्नानि सप्तज्ञानेन कर्मणाऽजनयत्पिता ||4-14||**

सर्व लोकांचा पालक जो समष्टि जीव त्यानें ज्ञान व प्रयत्न यांच्या योगानें सात प्रकारचें अन्न निर्माण केलें; असें सप्तान्न ब्राह्मणामध्यें जीवनिर्मित द्वैताचें सविस्तर वर्णन केलें आहे.

**मर्त्यानामेकं देवान्ने द्वे पश्वन्नं चतुर्थकम्।**
**अन्यत्त्रितयमात्मार्थमन्नानां विनियोजनम् ||4-15||**

मरण धर्मवान् प्राण्यांकरितां एक, देवांकरितां दोन, पशूंकरितां चवथें व स्वतःकरितां राहिलेलीं तीन. अशा प्रकारें त्या अन्नांचा श्रुतीनेंच विनियोग केलेला आहे.

**ब्रीह्यादिकं दर्शपूर्णमासौ क्षीरं तथा मनः।**
**वाक्प्राणश्चेति सप्तत्वमन्नानामवगम्यताम् ||4-16||**

तांदूळ इत्यादि धान्य, दर्श व पूर्णमास, दुध व तसेंच मन, वाणी व प्राण अशीं तीं सात अन्नें होत असें जाणावें.

**ईशेन यद्यप्येतानि निर्मितानि स्वरुपतः।**
**तथापि ज्ञानकर्मभ्याम् जीवोऽकार्षीत्तदन्नताम् ||4-17||**

जरी ईश्वरानें स्वरुपतः (पदार्थरुपानें ) हीं निर्मिलीं आहेत तरी जीवानें ज्ञान व कर्म यांच्या योगानें त्यांना आपलें अन्न केलें आहे.

**ईशकार्यं जीवभोग्यं जगद्द्वाभ्यां समन्वितम्।**
**पितृजन्या भर्तृभोग्या यथा योषित्तथेष्यताम् ||4-18||**

ज्याप्रमाणें स्त्री ही पित्यापासून होते व भर्ता तिचा भोग घेतो त्याप्रमाणें जग हें ईशाचें कृत्य व जीवाचें भोग्य असें दोनप्रकारचें आहे असें जाणावें.

**मायावृत्त्यात्मको हीशसंकल्पः साधनं जनौ।**
**मनोवृत्त्यात्मको जीवसंकल्पो भोगसाधनम् ||4-19||**

मायेची जी वृत्ति तद्रूप ईश्वरसंकल्प सृष्टीचें साधन होय. तसेंच मनोवृत्तिरुप जो जीवाचा संकल्प तें भोगाचें साधन आहे.

**ईशनिर्मितमण्यादौ वस्तुन्येकविधे स्थिते।**

**भोक्तृधीवृत्तिनानात्वात्तद्भोगो बहुधेष्यते ।।4-20।।**

ईश्वरानें निर्माण केलेले जे मणी इत्यादि पदार्थ ते एका रुपानेंच असतांना, भोक्त्यांची नाना प्रकारची वृत्ति असल्यामुळें, त्यांचा भोग नाना प्रकारें होतो असें आम्हांला इष्ट आहे.

**हृष्यत्येको मणिं लब्ध्वा क्रुध्यत्यन्यो ह्यलाभतः।**
**पश्यत्येव विरक्तोऽत्र न हृष्यति न कुप्यति ।।4-21।।**

एक जीव मणि मिळाल्यामुळें आनंदित होतो, दुसरा त्याची प्राप्ति न झाल्यामुळें रागावतो. व त्या मण्याविषयीं इच्छा न करणारा त्याला जरी पहातो तरी आनंदित होत नाहीं व रागावतही नाहीं.

**प्रियोऽप्रिय उपेक्ष्यश्चेत्याकारा मणिगास्त्रयः।**
**सृष्टा जीवैरीशसृष्टं साधारणं त्रिषु ।।4-22।।**

प्रिय, अप्रिय व उपेक्ष्य असे मण्याच्या ठिकाणचे तीन आकार जीवांनीं निर्माण केले. पण ह्या तिन्ही ठिकाणीं जें साधारण रुप असतें तें ईश्वरनिर्मित होय.

**भार्या स्नुषा ननान्दा च याता मातेत्यनेकधा।**
**प्रतियोगिधिया योषिद्भिद्यते न स्वरुपतः ।।4-23।।**

स्त्री, सून, नणन्द, जाऊ, आई इत्यादि प्रकारें स्त्री निरनिराळ्या दृष्टीनें अनेकशः भेद पावते. पण स्वरुपतः
भेद पावत नाहीं.

**ननु ज्ञानानि भिद्यन्तामाकारस्तु न भिद्यते।**
**योषिद्वपुष्यतिशयो न दृष्टो जीवनिर्मितः ।।4-24।।**

अहो ज्ञानांत जरी भेद पडला तरी आकारांत फरक पडत नाहीं. कारण स्त्रीच्या शरीरांत जीवानें फरक केल्याचें कधींच दिसत नाहीं.

**मैवं मांसमयी योषित्काचिदन्या मनोमयी।**
**मांसमय्या अभेदेऽपि भिद्यते हि मनोमयी ।।4-25।।**

असें म्हणूं नको. कारण एक मांसाची स्त्री व दुसरी एक कल्पनेची. मांसाची स्त्री जरी सर्वत्र एक रुपानें असते तरी मनोमय स्त्रीमध्यें भेद पडतोच.

**भ्रान्तिस्वप्नमनोराज्यस्मृतिष्वस्तु मनोमयम्।**
**जाग्रन्मानेन मेयस्य न मनोमयतेति चेत् ।।4-26।।**

भ्रमावस्था, स्वप्न, मनोराज्य व स्मरण या चार ठिकाणीं पदार्थ मनोमय भासूं दे; पण जाग्रतींतील प्रत्यक्ष प्रमाणानें ज्ञात होणा-या पदार्थाला मनोमयता नसते. असें जर म्हणशील तर-

**बाढं माने तु मेयेन योगात्स्याद्विषयाकृतिः।**
**भाष्यवार्तिककाराभ्यामयमर्थ उदीरितः ।।4-27।।**

खरें आहे. पण जाग्रतींत जें अंतःकरण विषयाकृति होत असतें तें त्याचा विषयाशीं संयोग झाल्यामुळें होतें. भाष्यकार व वार्तिककार यांनींही हेंच सांगितले आहे.

**मूषासिक्तं यथा ताम्रं तन्निभं जायते तथा।**
**रुपादीन् व्याप्नुवच्चित्तं तन्निभं दृश्यते ध्रुवम् ।।4-28।।**

ज्याप्रमाणें मुशींत ओतलेला तांब्याचा रस मुशीसारखा होऊन बाहेर पडतो, त्याप्रमाणें रुप, रस इत्यादि विषयांना व्यापणारें चित्त निःसंशय त्यांच्या सारखें भासतें.

**व्यञ्जको वा यथाऽऽलोको व्यङ्गयस्याकारतामियात्।**
**सर्वार्थव्यञ्जकत्वाद्धीरर्थाकारा प्रदृश्यते ।।4-29।।**

किंवा ज्याप्रमाणें प्रकाशक उजेड प्रकाश्य पदार्थाच्या आकारासारखा होतो, त्याप्रमाणें बुद्धि, तिच्यांत सर्व पदार्थांना प्रकाशित करण्याचें सामर्थ्य असल्यामुळें, विषयरुप भासते.

**मातुर्मानाभिनिष्पत्तिर्निष्पन्नं मेयमेति तत्।**
**मेयाभिसंगतं तच्च मेयाभत्वं प्रपद्यते ।।4-30।।**

प्रमात्यापासून अंतःकरणाची वृत्ति उत्पन्न होते. तें उत्पन्न झालेलें अंतःकरणवृत्तिरुप मान विषयरुप होतें. व तें (मान ) मेयाशीं संबद्ध झालें कीं मेयासारखें होतें.

**सत्येवं विषयौ द्वौ स्तो घटौ मृण्मयधीमयौ।**
**मृण्मयो मानमेयः स्यात्साक्षिभास्यस्तु धीमयः ।।4-31।।**

असें झालें असतां विषय दोन होतात. अर्थात् एक मृण्मय व दुसरा धीमय असें दोन घट झाले. मण्मय घट मानाला गोचर होणारा असतो पण धीमय घट साक्षीगोचर आहे.

**अन्वयव्यतिरेकाभ्यां धीमयो जीवबन्धकृत्।**
**सत्यस्मिन् सुखदुःखे स्तस्तस्मिन्नसति न द्वयम् ।।4-32।।**

अन्वयव्यतिरेकन्यायानें बुद्धिमय पदार्थ जीवाला बद्ध करणारा आहे. ( असें निश्चित होतें. ) कारण हा असला तर सुखःदुख होतें. पण हा नसला म्हणजे दोन्ही होत नाहींत.

**असत्यपि च बाह्यार्थे स्वप्नादौ बध्यते नरः।**
**समाधिसुप्तिमूर्च्छासु सत्यप्यस्मिन्न बध्यते ।।4-33।।**

बाह्य पदार्थ नसतांना सुद्धां स्वप्नादि अवस्थेमध्यें प्राणी बद्ध होतो; पण तेंच तो असतांनाही समाधि, सुप्ति ( गाढ निद्रा ) व मूर्च्छा या अवस्थेंत प्राणी बद्ध होत नाहीं.

**दूरदेशं गते पुत्रे जीवत्येवात्र तत्पिता।**
**विप्रलम्भकवाक्येन मृतं मत्वा प्ररोदिति ।।4-34।।**

पूत्र दूरदेशीं गेला असून तो तेथें जीवंत असला तरी येथें त्याचा पिता कोणा धूर्ताच्या वाक्यानें तो मेला असें समजून मोठ्यानें आक्रोश करितो.

**मृतेऽपि तस्मिन्वार्तायामश्रुतायां न रोदिति।**
**अतः सर्वस्य जीवस्य बन्धकृन्मानसं जगत् ।।4-35।।**

तो पुत्र खरोखर मृत झाला असतांही याला वार्ता न समजल्यास हा रडत नाहीं. तस्मात् सर्व प्राण्यांना हें मनोमय जगत् बंध उत्पन्न करितें.

**विज्ञानवादो बाह्यार्थवैयर्थ्यात्स्यादिहेति चेत्।**
**न हृद्याकारमाधातुं बाह्यस्यापेक्षितत्वतः।। 4-36।।**

बाह्य पदार्थांना व्यर्थत्व आल्यामुळें या ठिकाणीं विज्ञानवाद प्राप्त होतो असें जर म्हणाल; तर अंतःकरण साकार होण्यास बाह्य पदार्थांची अपेक्षा असल्यामुळें असें नाहीं.

**वैयर्थ्यमस्तु वा बाह्यं न वारयितुमीश्महे।**
**प्रयोजनमपेक्षन्ते न मानानीति हि स्थितिः ।।4-37।।**

किंवा बाह्य द्वैत व्यर्थ कां असेना ! आम्ही त्याचें निवारण करण्यास समर्थ नाहीं. प्रमाणें फलाची अपेक्षा करीत नसतात अशी खरी स्थिति आहे.

**बन्धश्चेन्मानसद्वैतं तद्धीरोधेन शाम्यति।**
**अभ्यसेद्योगमेवातो ब्रह्मज्ञानेन किं वद ।।4-38।।**

मानसद्वैत हाच जर बंध असेल तर तें द्वैत, बुद्धीचा निरोध केला असतां शांत होईल. यास्तव योगाचाच अभ्यास करावा (हें बरें ) तेव्हां आतां ब्रह्मज्ञान कशाला पाहिजे सांगा.

**तात्कालिकद्वैतशान्तावप्यागामिजनिक्षयः।**
**ब्रह्मज्ञानं विना न स्यादिति वेदान्तडिण्डिमः ।।4-39।।**
योगाभ्यासामुळें त्या कालापुरतें जरी द्वैताची शान्ति होत असली, तरी ब्रह्मज्ञानावांचून उत्तर जन्माचा क्षय होत नाहीं असा वेदान्ताचा घोष आहे. ( असे वेदान्त कंठरवानें सांगत आहे. )

**अनिवृत्तेऽपीशसृष्टे द्वैते तस्य मृषात्मताम्।**
**बुध्वा ब्रह्माद्वयं बोद्धुं शक्यं वस्त्वैक्यवादिनः ।।4-40।।**
ईशनिर्मित द्वैताची निवृत्ति जरी न झाली तरी वस्तु एक आहे जसा वाद करणा-याला तें खोटें आहे असें जाणल्यानेंही अद्वितीय ब्रह्माचें ज्ञान होणें शक्य आहे.

**प्रलये तन्निवृत्तौ तु गुरुशास्त्राद्यभावतः।**
**विरोधिद्वैताभावेऽपि न शक्यं बोद्धुमद्वयम् ।।4-41।।**
प्रलयावस्थेमध्यें त्याची निवृत्ति झाली असतां विरोधि द्वैताचा जरी नाश होत असला तरी गुरु, शास्त्र इत्यादि साधनांचा अभाव असल्यामुळें अद्वितीय ब्रह्माचें ज्ञान होऊं शकत नाहीं.

**अबाधकं साधकं च द्वैतमीश्वरनिर्मितम्।**
**अपनेतुमशक्यं चेत्यास्तां तद्द्विष्यते कुतः ।।4-42।।**
हें ईशनिर्मित द्वैत अद्वैतज्ञानाला बाध न करणारें असें असून शिवाय त्याची सिद्धि करुन देणारें आहे. तसेंच त्याचा नाश करण्याचेही आमचें सामर्थ्य नाहीं. तेव्हां तें असेना ! त्याचा द्वेष करण्यांत काय अर्थ आहे ?

**जीवद्वैतं तु शास्त्रीयमशास्त्रीयमिति द्विधा।**
**उपाददीता शास्त्रीयमातत्त्वस्यावबोधनात् ।।4-43।।**
जीवद्वैत तर शास्त्रीय व अशास्त्रीय असें दोन प्रकारचें आहे. व तत्त्वाचा साक्षात्कार होईपर्यंत शास्त्रीय द्वैताचा अंगीकार करावा.

**आत्मब्रह्मविचाराख्यं शास्त्रीयं मानसं जगत्।**
**बुद्धे तत्त्वे तच्च हेयमिति श्रुत्यनुशासनम् ।।4-44।।**
' आत्मरुप ब्रह्माचा विचार ' या नांवाचें जें जीवकृत जगत् तें शास्त्रीय मनोमय जगत् होय. पण तत्त्वाचा साक्षात्कार झाला असतां त्याचा त्याग करावा, असा श्रुतीचा उपदेश आहे.

**शास्त्राण्यधीत्य मेधावी अभ्यस्य च पुनः पुनः।**

**परमं ब्रह्म विज्ञाय उल्कावत्तान्यथोत्सृजेत् ||4-45||**

बुद्धिवानानें शास्त्रांचें अध्ययन करुन; व पुनः पुनः त्यांची आवृत्ति करुन परब्रह्माचा साक्षात्कार झाला असतां त्यानंतर चुडीप्रमाणें त्याचा त्याग करावा.

**ग्रन्थमभ्यस्य मेधावी ज्ञानविज्ञानतत्परः।**
**पलालमिव धान्यार्थी त्यजेद्ग्रन्थमशेषतः ||4-46||**

शहाण्या पुरुषानें परोक्ष व प्रत्यक्ष ज्ञानाविषयीं तत्पर होऊन ग्रंथाचा अभ्यास करावा. व नंतर धान्याची इच्छा करणारा जसें तुष टाकून देतो त्याप्रमाणें त्यानें ग्रंथाचा निःशेष त्याग करावा.

**तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मणः।**
**नानुध्यायाद्बहूञ्शब्दान् वाचो विग्लापनं हि तत् ||4-47||**

धीर ब्राह्मणानें त्या अद्वितीय आत्म्याचा साक्षात्कार करुन घेतल्यानंतर तद्विषयकच अनुसंधान ठेवावें. मग आणखीं अधिक शब्दांचें चिंतन ( किंवा उच्चारण ) करुं नये. कारण तें वाणीला ग्लानि उत्पन्न करीत असतें.

**तमेवैकं विजानीथ ह्यन्या वाचो विमुञ्चथ।**
**यच्छेद्वाङ्मनसी प्राज्ञ इत्याद्याः श्रुतयः स्फुटाः ||4-48||**

त्याच एका नित्य शुद्धबुद्धस्वभावाच्या आत्म्याला जाणा व अन्य सर्व वाणी सोडा. तसेंच मुमुक्षूनें वाणीचें मनांत नियमन करावें. इत्यादि अनेक श्रुति हीच गोष्ट अगदीं स्पष्टपणें सांगत आहेत.

**अशास्त्रीयमपि द्वैतं तीव्रं मन्दमिति द्विधा।**
**कामक्रोधादिकं तीव्रं मनोराज्यं तथेतरत् ||4-49||**

अशास्त्रीय द्वैत सुद्धां तीव्र व मंद असें दोन प्रकारचें आहे. कामक्रोधादिक हें तीव्र असून मनोराज्य हें मन्द अशास्त्रीय द्वैत आहे.

**उभयं तत्त्वबोधात् प्राङ्निवार्यं बोधसिद्धये।**
**शमः समाहितत्वं च साधनेषु श्रुतं यतः ||4-50||**

ज्याअर्थी शम व समाधान यांचा साधनांमध्यें निर्देश केलेला आहे, त्याअर्थी आत्मसाक्षात्कार व्हावा म्हणून तत्त्वबोधाची सिद्धि होईतों त्या दोन्ही प्रकारच्या अशास्त्रीय द्वैताचें निवारण करावें.

**बोधादूर्ध्वं च तद्धेयं जीवन्मुक्तिप्रसिद्धये।**
**कामादिक्लेशबन्धेन युक्तस्य न हि मुक्तता ||4-51||**

बोधानंतर त्याच्या जीवन्मुक्तीची सिद्धि होण्याकरितां तें द्वैत टाकावें. कारण कामादि क्लेशरुप बंधानें युक्त असणा-याला कधींच मुक्तता प्राप्त होणें नाहीं.

**जीवन्मुक्तिरियं मा भुज्जन्माभावे त्वहं कृती।**
**तर्हि जन्मापि तेऽस्त्वेव स्वर्गमात्रात्कृती भवान् ।।4-52।।**

ही जीवन्मुक्ति न कां मिळेना ! मी तर पुनः जन्माला न आल्यानेंच कृतकृत्य होईन ( असें जर म्हणशील ) तर जन्म सुद्धां तुला असेना ( त्यांत तुझें काय मोठें बिघडलें ? ) कारण केवल स्वर्गप्राप्तीनेंही तूं कृतकृत्य होशील ! !

**क्षयातिशय दोषेण स्वर्गो हेयो यदा तदा ।**
**स्वयं दोषतमात्माऽयं कामादिः किं न हीयते ।।4-53।।**

स्वर्ग हा क्षयरुपी भयंकर दोषानें युक्त असल्यामुळें त्याज्य आहे असें जर म्हणशील तर मूर्तिमंत दोषांचा राजा असा जो हा कामादि ( अनर्थ समूह ) तो त्याज्य ठरत नाहीं कां ?

**तत्त्वं बुद्ध्वाऽपि कामादीन्निःशेषं न जहासि चेत् ।**
**यथेष्टाचरणं ते स्यात्कर्मशास्त्रातिलङ्घिनः ।।4-54।।**

तत्त्वज्ञान झाल्यावर सुद्धां जर तूं कामादि दुष्ट विकारांना निःशेष न टाकलेंस तर विधिनिषेधरुप शास्त्राचें उल्लंघन करणा-या तुझें मनसोक्त आचरण होऊं लागेल.

**बुद्धाद्वैतस्वतत्त्वस्य यथेष्टाचरणं यदि।**
**शूनां तत्त्वदृशां चैव को भेदोऽशुचिभक्षणे ।।4-55।।**

अद्वैत आत्मस्वरुपाचा ज्याला साक्षात्कार झाला आहे त्याचें जर यथेच्छ आचरण होऊं लागलें तर कुत्रीं व तत्त्वज्ञानी यांच्यामध्यें अमंगल पदार्थ भक्षण करण्याविषयीं तरी भेद कोठून राहणार ?

**बोधात्पुरा मनोदोषमात्रात्क्लिश्णास्यथाधुना।**
**अशेषलोकनिन्दा चेत्यहो ते बोधवैभवम् ।।4-56।।**

ज्ञानापूर्वी कामादि मनोदोषांमुळें क्लेश भोगीत होतास आणि आतां तर तुझी सर्व लोकांत निन्दा होणार ! वाः, काय तुझें बोधवैभव पण ?

**विड्वराहादितुल्यत्वं मा कांक्षीस्तत्त्वविद्भवान्।**
**सर्वधीदोषसंत्यागाल्लोकैः पूज्यस्वदेववत् ।।4-57।।**

आपण तत्त्ववेत्ते आहां ! ! यास्तव बाबारे, चिखलांत लोळणा-या

डुकरासारखा होण्याची इच्छां करुं नकोस; तर सर्वही बुद्धि दोषांना झुगारुन दे व त्यामुळें लोकांना देवाप्रमाणें पूज्य हो.

**काम्यादिदोषदृष्ट्याद्याः कामादित्यागहेतवः।**
**प्रसिद्धो मोक्षशास्त्रेषु तानन्विष्य सुखी भव ।।4-58।।**

पुष्पमाला, चंदन इत्यादि काम्य पदार्थांचे ठिकाणीं दोषदृष्टि ठेवणें इत्यादिच त्यांच्या त्यागाला कारण होत असतात व हे ते त्याग हेतु मोक्षशास्त्रांत प्रसिद्ध आहेत. यास्तव त्यांचा आश्रय करुन सुखी हो.

**त्यज्यतामेष कामादिर्मनोराज्ये तु का क्षतिः।**
**अशेषदोषबीजत्वात्क्षतर्भगवतेरिता ।।4-59।।**

प्रश्न- हा कामादि वृत्तिसमूह टाकूं. पण केवल मनोराज्य करण्यास काय प्रत्यवाय आहे ? उत्तर - हें मनोराज्य सर्व दोषांचें कारण असल्यामुळें स्वतः भगवानांनींच याविषयीं प्रत्यवाय सांगितला आहे.

**ध्यायतो विषयान्पुंसः सङ्‌गस्तेषूपजायते ।**
**सङ्‌गात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ।।4-60।।**

विषयांचें चिंतन करणा-या पुरुषाला त्यांच्याविषयीं आसक्ति उत्पन्न होते; विषयासक्तीनें तृष्णा प्रबल होते व तृष्णेपासूनच क्रोधाचा अविर्भाव होतो.

**शक्यं जेतुं मनोराज्यं निर्विकल्पसमाधितः।**
**सुसम्पादः क्रमात्सोऽपि सविकल्पसमाधिना ।।4-61।।**

हें मनोराज्य निर्विकल्प समाधीच्या योगानें जिंकतां येतें. व ह्या निर्विकल्प समाधीचें सुद्धां सविकल्पसमाधीच्या योगानें क्रमाक्रमानें संपादन करितां येतें.

**बुद्धतत्त्वेन धीदोषशून्येनैकान्तवासिना।**
**दीर्घं प्रणवमुच्चार्य मनोराज्यं विजीयते ।।4-62।।**

ज्याला तत्त्वाचें ज्ञान झालें आहे, ज्याचे बुद्धिदोष सर्वथैव नष्ट झाले आहेत व सर्वदां एकान्तांत राहण्याची ज्याला संवय झाली आहे असा पुरुष प्रणवाचा दीर्घ उच्चार करुन मनोराज्याला जिंकितो.

**जिते तस्मिन्वृत्तिशून्यं मनस्तिष्ठति मूकवत्।**
**एतत्पदं वसिष्ठेन रामाय बहुधेरितम् ।।4-63।।**

त्या मनाचा जय झाला असतां तें मुक्याप्रमाणें व्यवहारशून्य होऊन राहतें. श्रीवसिष्ठांनीं हेंच स्थान रामाला पुष्कळ प्रकारें सांगितलें आहे.

**दृश्यं नास्तीति बोधेन मनसो दृश्यमार्जनम्।**
**सम्पन्नं चेत्तदुत्पन्ना परा निर्वाणनिर्वृतिः।। 4-64।।**

' दृश्य नाहीं ' अशा ज्ञानानें मनापासून दृश्याच्या आरोपाचें निरसन केलें कीं तात्काल ब्रह्मात्मैक्यरुप श्रेष्ठ व स्वप्रकाश आनंद व्यक्त होतो.

**विचारितमलं शास्त्रं चिरमुद्ग्राहितं मिथः।**
**संत्यक्तवासनान्मौनादृते नास्त्युत्तमं पदम् ।।4-65।।**

जरी शास्त्राचा पूर्ण विचार केला किंवा सहाध्यायांमध्यें पुष्कळकालपर्यंत त्याची चर्चा केली तरी वासनाशून्य अशा मौनावांचून उत्तम पद नाहीं.

**विक्षिप्यते कदाचिद्धीः कर्मणा भोगदायिना।**
**पुनः समाहिता सा स्यात्तदैवाभ्यासपाटवात् ।।4-66।।**

भोग भोगावयास लावणा-या प्रारब्धामुळें एखादेवेळीं चित्त विक्षिप्त होतें खरें; पण दीर्घकाल अभ्यास झालेला असल्यामुळें पुनः तें तात्काल शांत होतें.

**विक्षेपो यस्य नास्त्यस्य ब्रह्मवित्त्वं न मन्यते।**
**ब्रह्मैवायमिति प्राहुर्मुनयः पारदर्शिनः ।।4-67।।**

' ज्याच्या मनाला विक्षेप होत नाहीं, तो ब्रह्मवेत्ता आहे ' असें म्हटलेलेंही पण्डितांना मान्य होत नाहीं. तर तो ब्रह्मच आहे असें सूक्ष्मदर्शी मुनि सांगतात.

**दर्शनादर्शने हित्वा स्वयं केवलरुपतः।**
**यस्तिष्ठति स तु ब्रह्मन् ब्रह्म न ब्रह्मवित्स्वयम् ।।4-68।।**

अरे ब्राह्मणा, ज्ञान व अज्ञान हीं दोन्हीं टाकून जो कोणी परम पुरुष स्वतः केवलरुपानें राहतो तो स्वतः ब्रह्मच होय. ब्रह्मवित् नव्हे.

**जीवन्मुक्तेः परा काष्ठा जीवद्वैतविवर्जनात्।**
**लभ्यतेऽसावोऽतोऽत्रेदमीशद्वैताद्विवेचितम् ।।4-69।।**

ही जीवन्मुक्तीची मुख्य भूमि जीवकृत प्रपंचाचा त्याग केल्यानें प्राप्त होते. यास्तव या ठिकाणीं हें द्वैत ईशकृत द्वैताहून भिन्न करुन दाखविलें.

**इति चतुर्थोऽध्यायः ।।4।।**

---

**अथ पञ्चमोऽध्यायः।**

**महा वाक्य विवेकः।**

**येनेक्षते शृणोतीदं जिघ्रति व्याकरोति च।**
**स्वाद्वस्वादू विजानाति तत्प्रज्ञामुदीरितम् ।।5-1।।**

प्राणी ज्याच्या योगानें हें पहातो, ज्याच्या योगानें ऐकतो, ज्याच्या योगानें वास घेतो व बोलतो आणि ज्याच्या योगानें मिष्ट व अमिष्ट जाणतो तें प्रज्ञान असें सांगितलें आहे.

**चतुर्मुखेन्द्रदेवेषु मनुष्याश्वागवादिषु।**
**चैतन्यमेकं ब्रह्मातः प्रज्ञानं ब्रह्म मय्यपि ।।5-2।।**

ब्रह्मदेवादि देव व मनुष्य, घोडे, गायी इत्यादि इतर प्राणी यांच्या ठिकाणीं जें एक चैतन्य आहे तेंच ब्रह्म होय. आणि ज्याअर्थी प्रज्ञान हें ब्रह्म आहे त्याअर्थी तें माझ्या ठिकाणींही आहे.

**परिपूर्णः परात्मास्मिन्देहे विद्याधिकारिणि।**
**बुद्धेः साक्षितया स्थित्वा स्फुरन्नहमितीर्यते ।।5-3।।**

सर्वत्र ओतप्रोत भरुन राहणारा परमात्मा ह्या विद्येला अधिकारी असलेल्या देहांत बुद्धीचा साक्षि या नात्यानें राहून प्रतीत होऊं लागला असतां त्याला ' अहं ' ( मी ) असें म्हणतात.

**स्वतः पूर्णः परमात्माऽत्र ब्रह्मशब्देन वर्णितः।**
**अस्मीत्यैक्यपरामर्शस्तेन ब्रह्म भवाम्यहम् ।।5-4।।**

ह्या वाक्यांत स्वतः परिपूर्ण जो परमात्मा त्याचेंच ब्रह्मशब्दानें वर्णन केलें आहे. अस्मि म्हणजे आहें. या पदानें त्यांच्या ऐक्याचा अंगीकार केला आहे. यास्तव ' मी ब्रह्म होतों ( आहें ). '

**एकमेवाद्वितीयं सन्नामरुपविवर्जितम्।**
**सृष्टेः पुराऽधुनाप्यस्य तादृक्त्वं तदितीर्यते ।।5-5।।**

सृष्टीच्या पूर्वीं नामरुपरहित, एकच व द्वितीयशून्य सत् असतें असें सांगितलें; ह्याकाळीं सुद्धां तें तसेंच आहे असें तत् या पदानें सांगतात.

**श्रोतुर्देहेन्द्रियातीतं वस्त्वत्र त्वंपदेरितम्।**
**एकता ग्राह्यतेऽसीति तदैक्यमनुभूयताम् ।।5-6।।**

या ठिकाणीं श्रवण करणा-याच्या देहेंद्रियांहून निराळी जी वस्तु तोच त्वंपदाचा लक्ष्यार्थ आहे. ' आहेस ' या पदानें श्रुति त्यांच्या ऐक्याचें ग्रहण

करविते. यास्तव त्यांच्या ऐक्याचा अनुभव घ्यावा.

**स्वप्रकाशापरोक्षत्वमयमित्युक्तितो मतम्।**
**अहङ्कारादिदेहान्तात्प्रत्यगात्मेति गीयते ।।5-7।।**

'हा' या शब्दानें श्रुतीनें तो स्वप्रकाश असल्यामुळें त्याची प्रत्यक्षता मानिली आहे. व अहंकारापासून देहापर्यंत असणा-या पदार्थांचा जो आधारभूत साक्षी त्याला तिनें आत्मा असें म्हटलें आहे.

**दृश्यमानस्य सर्वस्य जगतस्तत्त्वमीर्यते।**
**ब्रह्मशब्देन तत्ब्रह्म स्वप्रकाशात्मरुपकम् ।।5-8।।**

भासणा-या ह्या सर्व जगाचें जें तत्त्व त्याचा ब्रह्म शब्दानें निर्देश करितात. असें तें ब्रह्म स्वप्रकाश जो आत्मा तद्रूपच आहे.

**इति पञ्चमोऽध्यायः ।।5।।**

---

## अथ षष्ठोऽध्यायः।

## चित्र दीपः।

**यथा चित्रपटे दृष्टमवस्थानां चतुष्टयम्।**
**परमात्मनि विज्ञेयं तथाऽवस्था चतुष्टयम् ।।6-1।।**

ज्याप्रमाणें चित्राच्या पटामध्यें चार अवस्था दिसतात. त्याचप्रमाणें परमात्म्याचे ठिकाणीं चार अवस्था आहेत; असें समजावें.

**यथा धौतौ घट्टितश्च लाञ्छितो रञ्जितः पटः।**
**चिदन्तर्यामी सूत्रात्मा विराट् चात्मा तथेर्यते ।।6-2।।**

ज्याप्रमाणें चित्राच्या वस्त्राला धुणें, खळ सारवणें, आंखणें व रंग भरणें अशा चार अवस्था येतात त्याचप्रमाणें परमात्म्याला , चित्, अंतर्यामी, सूत्रात्मा व विराट् अशा चार अवस्था अनुभवाव्या लागतात.

**स्वतः शुभ्रोऽत्र धौतः स्याद्धघट्टितोऽन्नविलेपनात्।**
**मष्याकारैर्लाञ्छितः स्याद्रञ्जितो वर्णपूरणात् ।।6-3।।**

पटाच्या चार अवस्थेंतील त्याचें स्वतः जें शुभ्र स्वरुप तीच धौतावस्था व चित्र काढण्यापूर्वी त्याची छिद्रे बुझावीत म्हणून जी खळ लावतात ती घट्टित अवस्था होय. शाईने चित्राच्या आकाराप्रमाणें त्याला आंखणे ही लांछित अवस्था व त्यांत योग्य रितीनें रंग भरणें त्याची चवथी रञ्जित

अवस्था होय.

**श्वेतः चित् अन्तर्यामी तु मायावी सूक्ष्म सृष्टितः।**
**सूत्रात्मा स्थूल सृष्ट्या इव विराट् इति उच्यते परः।। 6-4 ।।**

त्या परमात्म्यालाच स्वतः चित्, मायेच्या संसर्गानें अंतर्यामी, सूक्ष्मसृष्टीमुळें सूत्रात्मा व त्याचप्रमाणें स्थूल सृष्टीच्या योगानें विराट् असें म्हणतात.

**ब्रह्माद्याः स्तम्बपर्यन्ताः प्राणिनोऽत्र जडा अपि।**
**उत्तमाधमभावेन वर्तन्ते पटचित्रवत् ।।6-5।।**

ह्या परमात्म्याच्या आधारावरच पटावरील चित्राप्रमाणें ब्रह्मदेवापासून स्तंबापर्यंत प्राणी व जड पदार्थसुद्धां उत्तम व अधम भावानें राहतात.

**चित्रार्पितमनुष्याणां वस्त्राभासाः पृथक् पृथक्।**
**चित्राधारेण वस्त्रेण सदृशा इव कल्पिताः ।।6-6।।**
**पृथक् पृथक् चिदाभासाश्चैतनाध्यस्तदेहिनाम्।**
**कल्प्यन्ते जीवनामानो बहुधा संसरन्त्यमी ।।6-7।।**

ज्याप्रमाणें चित्रांतील मनुष्यांच्या वस्त्राभासांची कल्पना होते व ते चित्राला आधार होणा-या वस्त्राच्या जातीचेच असतात. त्याप्रमाणें चैतन्यरुप परमात्म्यावर आरोपित होणा-या शरीरी आत्म्याला अनुलक्षून जीव नामक चिदाभासांची कल्पना होते. व हे नानाप्रकारें जन्ममरणफे-यांत पडतात.

**वस्त्राभासस्थितान् वर्णान् यद्वदाधारवस्त्रगान्।**
**वदन्त्यज्ञास्तथा जीवसंसारं चिद्गतं विदुः ।।6-8।।**

ज्याप्रमाणें अज्ञ पुरुष भासणाया वस्त्रांत असलेले रंग आधारभूत वस्त्राचेच आहेत असें सांगतात त्याप्रमाणें ते हा जीवाचा संसार आत्म्याचा आहे असें जाणतात.

**चित्रस्थपर्वतादीनां वस्त्राभासो न लिख्यते।**
**सृष्टिस्थमृत्तिकादीनां चिदाभासस्तथा न हि ।।6-9।।**

ज्याप्रमाणें चित्रांतील पर्वतादि पदार्थांच्या ठिकाणीं वस्त्राचा भास होत नाहीं. त्याचप्रमाणें सृष्टींतील मृत्तिका इत्यादि जड पदार्थांचे ठिकाणीं चैतन्याभासाचा स्पष्ट प्रत्यय येत नाहीं.

**संसारः परमार्थोऽयं संलग्नः स्वात्मवस्तुनि।**
**इति भ्रान्तिरविद्या स्याद्विद्ययैषा निवर्तते ।।6-10।।**

हा संसार खरा आहे व तो चैतन्यरुप आत्म्याशीं संबद्ध आहे अशी जी भ्रान्ति तीच अविद्या होय. ही अविद्या आत्मज्ञानानें निवृत्त होते.

**आत्माभासस्य जीवस्य संसारो नात्मवस्तुनः।**
**इति बोधो भवेद्विद्या लभ्यतेऽसौ विचारणात् ।।6-11।।**

आत्म्यासारखा भासणारा मात्र पण खरोखरी आत्मा नव्हे असा जो आत्मभास व तद्रूप जो जीव त्याचा संसार आहे. आत्मवस्तूचा नव्हे. अशा प्रकारचा जो बोध ती विद्या होय. ही विचारानें प्राप्त होते.

**सदा विचारयेत्तस्मात् जगज्जीवपरात्मनः।**
**जीवभावजगद्भावबाधे स्वात्मैव शिष्यते ।।6-12।।**

तस्मात् जगत्, जीव व परमात्मा यांचा सर्वदां विचार करावा; जीवभाव व जगद्भाव यांचा बोध झाला कीं केवल आत्मा मात्र अवशिष्ट राहतो.

**नाप्रतीतिस्तयोर्बाधः किन्तु मिथ्यात्वनिश्चयः।**
**नोचेत्सुषुप्तिमूर्च्छादौ मुच्येतायत्नतो जनः ।।6-13।।**

जगत् व जीवभाव यांची प्रतीति न येणें हा बाध नव्हे तर ते खोटे आहेत असा निश्चय होणें हा बाध होय. कारण
असें जर नसतें तर लोक निद्रा, मूर्च्छा इत्यादि अवस्थेमध्यें आपोआप मुक्त झाले असते.

**परमात्मावशेषोऽपि तत्सत्यत्वविनिश्चयः।**
**न जगद्विस्मृतिर्नोचेज्जीवन्मुक्तिर्न सम्भवेत् ।।6-14।।**

तो सत्य आहे असा दृढ निश्चय म्हणजेच परमात्म्याचा अवशेष होय, जगाचें विस्मरण हा आत्मावशेष नव्हे. कारण असें जर न मानलें तर जीवन्मुक्ति संभवणार नाहीं.

**परोक्षा चापरोक्षेति विद्या द्वेधा विचारजा।**
**तत्रापरोक्षविद्याप्तौ विचारोऽयं समाप्यते ।।6-15।।**

परोक्ष व अपरोक्ष अशी विचारापासून उत्पन्न होणारी विद्या दोन प्रकारची आहे. त्यांतील अपरोक्ष विद्येची प्राप्ति झाली कीं हा विचार संपतो.

**अस्ति ब्रह्मेति चेद्वेद परोक्षज्ञानमेव तत्।**
**अहं ब्रह्मेति चेद्वेद साक्षात्कारः स उच्यते ।।6-16।।**

ब्रह्म आहे असें जाणलें कीं, तेंच परोक्षज्ञान होतें व मी ब्रह्म आहें असें

जाणलें कीं, तोच साक्षात्कार असें पंडित सांगतात.

**तत्साक्षात्कारसिद्ध्यर्थमात्मतत्त्वं विविच्यते।**
**येनायं सर्वसंसारात् सद्य एव विमुच्यते ।।6-17।।**

ज्याच्या योगानें हा सर्व संसारापासून तत्क्षणींच मुक्त होईल, अशा प्रकारचा साक्षात्कार होण्याकरितां आत्मस्वरुपाचें विवेचन करितों.

**कूटस्थो ब्रह्म जीवेशावित्येवं चिच्चतुर्विधा।**
**घटाकाशमहाकाशौ जलाकाशाभ्रखे यथा ।।6-18।।**

ज्याप्रमाणें घटाकाश, महाकाश, जलाकाश, व अभ्राकाश त्याचप्रमाणें कूटस्थ, ब्रह्म, जीव व ईश्वर अशी ही चिति चार प्रकारची आहे.

**घटावच्छिन्नखे नीरं यत्तत्र प्रतिबिम्बितः।**
**साभ्रनक्षत्र आकाशो जलाकाश उदीर्यते ।।6-19।।**

घटानें परिच्छिन्न अशा आकाशामध्यें जें उदक असतें त्यामध्यें प्रतिबिंबित होणारें जें मेघ, नक्षत्रें इत्यादिकांसह आकाश तें जलाकाश होय असें सांगितलेलें आहे.

**महाकाशस्य मध्ये यन्मेघमण्डलमीक्ष्यते।**
**प्रतिबिम्बतया तत्र मेघाकाशो जले स्थितः ।।6-20।।**

वर महाकाशांत पाहिलें असतां जें मेघमंडल दिसतें त्यांतील जलांत प्रतिबिंबित होऊन राहिलेलें जें आकाश तें अभ्राकाश होय.

**मेघांशरुपमुदकं तुषाराकारसंस्थितम्।**
**तत्र खप्रतिबिम्बोऽयं नीरत्वादनुमीयते ।।6-21।।**

मेघांचें अंशरुप उदक मेघांत तुषारांच्या आकारानें राहतें. तेंहि उदकच असल्यामुळें त्या ठिकाणीं हें आकाशप्रतिबिंब आहेच असें अनुमान करितां येतें.

**अधिष्ठानतया देहद्वयावच्छिन्नचेतनः।**
**कूटवन्निर्विकारेण स्थितः कूटस्थ उच्यते ।।6-22।।**

जो दोन्ही देहांना आधार होऊन राहिल्यामुळें त्यांनीं परिमित झालेला आत्मा कूटाप्रमाणें निर्विकार असतो, त्याला कूटस्थ असें म्हणतात.

**कूटस्थे कल्पिता बुद्धिस्तत्र चित्प्रतिबिम्बकः।**
**प्राणानां धारणाज्जीवः संसारेण स युज्यते ।।6-23।।**

ह्या कूटस्थाचे ठिकाणीं बुद्धि कल्पिलेली आहे. त्या बुद्धी मध्यें जो चैतन्याचा

भास प्रतीत होतो तोच सर्व इंद्रियांचें
धारण करीत असल्यामुळें जीव होय. हाच संसारानें युक्त होतो.

**जलव्योम्ना घटाकाशो यथा सर्वस्तिरोहितः।**
**तथा जीवेन कूटस्थः सोऽन्योन्याध्यास उच्यते ||6-24||**

ज्याप्रमाणें जलाकाशामुळें सर्व घटाकाश लोपून जातें, त्याप्रमाणेंच जीवानें कूटस्थाला लोपविलें आहे. यालाच अन्योन्याध्यास ( परस्पर आरोप ) असें म्हणतात.

**अयं जीवो न कूटस्थं विविनक्ति कदाचन।**
**अनादिरविवेकोऽयं मूलाविद्येति गम्यताम् ||6-25||**

हा जीव कूटस्थाला कधींच पृथक् भासवीत नाहीं. जी मूळ अविद्या तोच हा अनादि अविवेक आहे असें जाणावें.

**विक्षेपावृतिरुपाभ्यां द्विधाऽविद्या व्यवस्थिता।**
**न भाति नास्ति कूटस्थ इत्यापादनमावृतिः ||6-26||**

विक्षेप व आवरण ह्या रुपानें अविद्या दोन प्रकारची झाली आहे. कूटस्थ नाहीं, तो भासत नाहीं, अशा प्रकारची जी समजूत तेंच आवरण होय.

**अज्ञानी विदुषा पृष्टः कूटस्थं न प्रबुध्यते।**
**न भाति नास्ति कूटस्थ इति बुद्ध्वा वदत्यपि ||6-27||**

एखाद्या विद्वानानें ( तूं कूटस्थाला जाणतोस का ? असा प्रश्न केला असतां ( 'नाहीं ' असें म्हणणारा ) अज्ञानी कूटस्थाला जाणत नाहीं. व कूटस्थ नाहीं, भासत नाहीं असें जाणून बोलतो सुद्धां.

**स्वप्रकाशे कुतोऽविद्या तां विना कथमावृतिः।**
**इत्यादितर्कजालानि स्वानुभूतिर्ग्रसत्यसौ ||6-28||**

हा प्रत्येक प्राण्याचा अनुभव ' स्वप्रकाश आत्म्याच्या ठिकाणीं अविद्या कोठून आली ? तिच्यावांचून आवरण तरी कसें झालें ' इत्यादि प्रकारच्या तर्कसमूहांना गिळून टाकितो.

**स्वानुभूताववविश्वासे तर्कस्याप्यनवस्थितेः।**
**कथं वा तार्किकंमन्यस्तत्त्वनिश्चयमाप्नुयात् ||6-29||**

स्वतःच्या अनुभवाविषयींच जर अविश्वास झाला तर, तर्कसुद्धां अप्रतिष्ठित असल्यामुळें, मी तार्किक आहें असा अभिमान बाळगणा-याचा तत्त्वाविषयीं निश्चय कसा होणार ?

**बुद्ध्यारोहाय तर्कश्चेदपेक्षत तथा सति।**
**स्वानुभूत्यनुसारेण तर्क्यतां मा कुतर्क्यताम् ।।6-30।।**

तत्त्व बुद्ध्यारुढ व्हावें एवढ्याकरितांच तर्क जर हवा असेल तर स्वतःच्या अनुभवानुरुप तो खुशाल करावा. पण कुतर्क करुं नये.

**स्वानुभूतिरविद्यायामावृतौ च प्रदर्शिता।**
**अतः कूटस्थचैतन्यमविरोधीति तर्क्यताम् ।।6-31।।**

अविद्येविषयीं व आवरणाविषयीं स्वानुभव कसा येतो हें पूर्वीं दाखविलेंच आहे. यास्तव कूटस्थचैतन्याशीं ज्याचा विरोध येणार नाहीं, असा तर्क करावा.

**तच्चेद्विरोधि केनेयमावृतिर्ह्यनुभूयताम्।**
**विवेकस्तु विरोध्यस्यास्तत्त्वज्ञानिनि दृश्यताम् ।।6-32।।**

तें चैतन्य जर अविद्येच्या विरोधि असतें तर या आवरणाचा अनुभव कोणाच्या योगानें आला असता ? यास्तव विवेक हा अविद्येच्या विरुद्ध आहे; व तो तत्त्वज्ञानी पुरुषामध्यें दिसतो.

**अविद्यावृतकूटस्थे देहद्वययुता चितिः।**
**शुक्तौ रुप्यवदध्यस्ता विक्षेपाध्यास एव हि ।।6-33।।**

अविद्येनें आच्छादित झालेल्या शुक्तीच्या ठिकाणीं जसा रौप्याचा आरोप होतो, त्याचप्रमाणें कूटस्थाचे ठिकाणीं दोन देहांनीं युक्त असलेल्या चैतन्याभासाचा आरोप होतो. हाच शास्त्रप्रसिद्ध विक्षेपाध्यास होय.

**इदमंशश्च सत्यत्वं शुक्तिगं रुप्य ईक्ष्यते।**
**स्वयंत्वं वस्तुता चैवं विक्षेपे वीक्ष्यतेऽन्यगम् ।।6-34।।**

ज्याप्रमाणें शुक्तिस्थ सत्यत्व व ' हें ' हा अंश हीं रुप्यामध्ये दिसतात त्याचप्रमाणें कूटस्थांतील स्वतःपणा व सत्य हीं विक्षेपामध्यें दिसतात.

**नीलपृष्ठत्रिकोणत्वं यथा शुक्तौ तिरोहितम्।**
**असङ्गानन्दताद्येवं कूटस्थेऽपि तिरोहितम् ।।6-35।।**

ज्याप्रमाणें निळी पाठ व त्रिकोणी आकार हे शुक्तीमध्यें गुप्त होतात त्याचप्रमाणें असंगत्व, आनंदत्व इत्यादि भाव कूटस्थामध्येंही गुप्त होत असतात.

**आरोपितस्य दृष्टान्ते रुप्यं नाम यथा तथा।**
**कूटस्थाध्यस्तविक्षेपनामाहमिति निश्चयः ।।6-36।।**

ज्याप्रमाणें दृष्टान्तांत आरोपित पदार्थाचें ' रुपें ' असें नांव असतें तसेंच कूटस्थाच्या ठिकाणीं आरोपित केलेल्या विक्षेपाचें नांव ' मी ' असें आहे.

**इदमंशं स्वतः पश्यन् रुप्यमित्यभिमन्यते।**
**तथा स्वं च स्वतः पश्यन्नहमित्यभिमन्यते।।6-37।।**

ज्याप्रमाणें स्वतः ' हें ' हा अंश पाहणारा रुपें आहे असें निश्चयानें समजतो, त्याचप्रमाणें स्वतःच स्वतःला पाहणारा ' मी ' असें मानतो.

**इदंत्वरुप्यते भिन्ने स्वत्वाहंते तथेष्यताम्।**
**सामान्यं च विशेषश्च ह्युभयत्रापि गम्यते ।।6-38।।**

ज्याप्रमाणें हें ही प्रत्यक्षता व रुप्यता हे भाव भिन्न त्याचप्रमाणें स्वत्व व अहंता हे भिन्न आहेत असें जाणावें. कारण सामान्य व विशेष हे दोन्ही ठिकाणीं भासतात.

**देवदत्तः स्वयं गच्छेत्त्वं वीक्षस्व स्वयं तथा।**
**अहं स्वयं न शक्नोमीत्येवं लोके प्रयुज्यते ।।6-39।।**

देवदत्तानें स्वतः जावें; तसेंच, तूं स्वतः पहा; स्वतः माझ्या हातून हें होणार नाहीं; अशा प्रकारें लोकांमध्यें 'स्वतः ' या शब्दाचा प्रयोग करितात.

**इदं रुप्यमिदं वस्त्रमिति यद्वदिदं तथा।**
**असौ त्वमहमित्येषु स्वयमित्यभिमन्यते ।।6-40।।**

हें रुपें, हें वस्त्र इत्यादि सर्व पदार्थांच्या ठिकाणीं जसा ' इदं ' शब्दाचा प्रयोग होत असतो, त्याचप्रमाणें हा, तूं, मी, इत्यादि सर्व ठिकाणींहि ' स्वतः ' या शब्दाचा संसर्ग होतो.

**अहंत्वाद्भिद्यतां स्वत्वं कूटस्थे तेन किं तव।**
**स्वयंशब्दार्थ एवैष कूटस्थ इति मे भवेत् ।।6-41।।**

अहंतेहून स्वत्व भिन्न असेना ! त्यानें कूटस्थाविषयीं तुला कोणता लाभ झाला ? अरे जो स्वयंशब्दाचा अर्थ तोच कूटस्थ हें माझें म्हणणें सिद्ध झालें.

**अन्यत्ववारकं स्वत्वमिति चेदन्यवारणम्।**
**कूटस्थस्यात्मतां वक्तुरिष्टमेव हितद्भवेत् ।।6-42।।**

स्वत्व अन्यभावाचें निवारण करितें असें जर म्हणाल तर तें कूटस्थच आत्मा आहे असें परमसत्य सांगणा-याला इष्टच आहे.

**स्वयमात्मेति पर्यायौ तेन लोके तयोः सह।**
**प्रयोगो नास्त्यतः स्वत्वमात्मत्वं चान्यवारकम् ।।6-43।।**

स्वयं व आत्मा हे पर्याय शब्द आहेत. यामुळें व्यवहारांत त्यांचा एकाचकालीं प्रयोग होत नाहीं. म्हणून स्वत्व व आत्मत्व हीं दोन्हीं अन्याचें निवारण करणारीं आहेत.

**घटः स्वयं जानातीत्येवं स्वत्वं घटादिषु।**
**अचेतनेषु दृष्टं चेत् दृश्यतामात्मसत्त्वतः ।।6-44।।**

घट स्वतः जाणत नाहीं अशाप्रकारें घटादि अचेतन पदार्थांचे ठिकाणीं स्वत्व दिसतें असें जर म्हणशील तर त्यांच्या ठिकाणींसुद्धां आत्म्याची सत्ता असल्यामुळें तें ( दिसतें तर ) दिसूं दे.

**चेतनाचेतनभिदा कूटस्थात्माकृता न हि।**
**किन्तु बुद्धिकृता भासकृतैवेत्यवगम्यताम् ।।6-45।।**

सृष्टींत चेतन व अचेतन असा जो भेद आहे तो कूटस्थ आत्म्यामुळें झालेला नाहीं; तर बुद्धिकृत जो चिदाभास त्याच्यामुळें झालेला आहे, असें समजावें.

**यथा चेतन आभासः कूटस्थे भ्रान्तिकल्पितः।**
**अचेतनो घटादिश्च तथा तत्रैव कल्पितः ।।6-46।।**

ज्याप्रमाणें चैतन्याभास कूटस्थावर भ्रान्तिमुळें कल्पिलेला आहे, त्याचप्रमाणें अचेतन घटादि पदार्थहि कूटस्थावर ( भ्रान्तिमुळेंच ) कल्पिलेले आहेत.

**तत्तेदंते अपि स्वत्वमिव त्वमहमादिषु।**
**सर्वत्रानुगते तेन तयोरप्यात्मतेति चेत् ।।6-47।।**

स्वत्वाप्रमाणेंच तूं मी इत्यादि सर्व ठिकाणीं तत्ता व इदंता सुद्धां असतात, तेव्हां त्यांनासुद्धां आत्मता आली, असें जर म्हणाल,-

**ते आत्मत्वेऽप्यनुगते तत्तेदंते ततस्तयोः।**
**आत्मत्वं नैव सम्भाव्यं सम्यक्त्वादेर्यथातथा ।।6-48।।**

ही तत्ता व इदंता आत्मत्वामध्येंहि अनुवृत्त होते. यास्तव ज्याप्रमाणें चांगलेपणा इत्यादिकांना त्याचप्रमाणें त्यांनाहि आत्मत्व संभवनीय नाहींच.

**तत्तेदंते स्वतान्यत्वे त्वंताहंते परस्परम्।**
**प्रतिद्वन्द्वितया लोके प्रसिद्धे नास्ति संशयः ।।6-49।।**

तत्ता व इदंता, स्वता व अन्यता, त्वंता व अहंता इत्यादि भाव परस्पर विरुद्ध म्हणून लोकांत प्रसिद्ध आहेत; यांत कांहीं संशय नाहीं.

**अन्यतायाः प्रतिद्वन्द्वी स्वयं कूटस्थ इष्यताम्।**

**त्वंतायाः प्रतियोग्येषोऽहमित्यात्मनि कल्पितः ।।6-50।।**

अन्यतेचा स्वयं कूटस्थ हा विरोधी आहे असें समजावें. व हा आत्म्याच्या ठिकाणीं कल्पिलेला अहंत्वंतेचा विरोधी आहे असें जाणावें.

**अहंतास्वत्वयोर्भेदे रुप्यतेदंतयोरिव।**
**स्पष्टेऽपि मोहमापन्ना एकत्वं प्रतिपेदिरे ।।6-51।।**

रुपें व इदंता यांच्याप्रमाणें अहंता व स्वता यांचा भेद स्पष्ट असतांनासुद्धां मूढ झालेले जीव यांचें एकत्व मानूं लागले.

**तादात्म्याध्यास एवात्र पूर्वोक्ताविद्यया कृतः।**
**अविद्यायां निवृत्तायां तत्कार्यं विनिवर्तते ।।6-52।।**

याच ग्रंथांत पूर्वीं सांगितलेल्या अविद्येमुळें झालेला हा तादात्म्याध्यास होय व अविद्येची निवृत्ति झाली असतां तिच्या कार्याचीहि निवृत्ति होते.

**अविद्यावृत्तितादात्म्ये विद्ययैव विनश्यतः।**
**विक्षेपस्य स्वरुपं तु प्रारब्धक्षयमीक्षते ।।6-53।।**

अज्ञानाचें आवरण व तादात्म्यरुप ग्रंथी यांचा विद्येच्या योगानें नाश होतो. पण विक्षेपाचें स्वरुप प्रारब्धक्षय होण्याची वाट पहातें.

**उपादाने विनष्टेऽपि क्षणं कार्यं प्रतीक्षते।**
**इत्याहुस्तार्किकास्तद्वदस्माकं किन्न संभवेत् ।।6-54।।**

उपादान कारणाचा नाश झाल्यावरसुद्धां कार्य एक क्षण अस्तित्वांत असतें असें तार्किक म्हणतात. मग तसेंच तें आमच्या पक्षांतहि कां संभवूं नये.

**तन्तूनां दिनसंख्यानां तैस्तादृक् क्षण ईरितः।**
**भ्रमस्यासंख्यकल्पस्य योग्यः क्षण इहेष्यताम् ।।6-55।।**

त्यांनीं दिवसांनीं गणना करितां येण्यासारख्या तंतूंचा तसला क्षण सांगितला पण या ठिकाणीं असंख्य कल्पांच्या भ्रमाला योग्य असाच क्षण आम्हांला मानला पाहिजे.

**विना क्षोदक्षमं मानं तैर्वृथा परिकल्प्यते।**
**श्रुतियुक्त्यनुभूतिभ्यो वदतां किन्नु दुःशकम् ।।6-56।।**

ते तार्किक विचाराला योग्य अशा प्रमाणावांचून व्यर्थ कल्पना करितात. पण श्रुति, युक्ति व अनुभव यांच्या आश्रयानें बोलणा-यांच्या पक्षीं काय अशक्य असणार आहे ?

**आस्तां दुस्तार्किकैः साकं विवादः प्रकृतं ब्रुवे।**

**स्वाहमोः सिद्धमेकत्वं कूटस्थपरिणामिनोः ||6-57||**

कुतर्कवाद्यांशीं वाद करणें आतां पुरे. प्रकृत विषय सांगतों. कूटस्थ व परिणामी असे जे स्व आणि अहं त्यांचें ऐक्य सिद्ध झालें.

**भ्राम्यन्ते पण्डितंमन्याः सर्वे लौकिकतैर्थिकाः।**
**अनादृत्य श्रुतिं मौर्ख्यात्केवलां युक्तामाश्रिताः ||6-58||**

सर्वहि लौकिक व गुरुपासून ज्ञान प्राप्त करुन घेतलेले पंडितंमन्य भ्रमिष्ट होतात, आणि मूर्खपणानें श्रुतीचा अनादर करुन केवल युक्तीचा आश्रय करितात.

**पूर्वापरपरामर्शविकलास्तत्रकेचन।**
**वाक्याभासान्स्वस्वपक्षे योजयन्त्यप्यलज्जया ||6-59||**

त्यांतील कांहीं पूर्वोत्तर संबंधाविषयीं व्याकुल होऊन निर्लज्जपणानें मुख्य वाक्यांसारखीं दिसणारीं गौणवाक्येंसुद्धां आपापल्यापक्षीं योजितात.

**कूटस्थादिशरीरान्तसंघातस्यात्मतां जगुः।**
**लोकायताः पामराश्च प्रत्यक्षाभासमाश्रिताः ||6-60||**

प्रत्यक्षाच्या आभासाचा आश्रय केलेले लोकायत व सर्व लौकिकसुद्धां कुटस्थापासून शरीरापर्यंत जेवढे म्हणून पदार्थ आहेत, त्या सर्वांच्या समूहाला आत्मा असें म्हणतात.

**श्रौतीकर्तुं स्वपक्षं ते कोशमन्नमयं तथा।**
**विरोचनस्य सिद्धान्तं प्रमाणं प्रतिजज्ञिरे ||6-61||**

' देह हाच आत्मा ' हा स्वतःचा पक्ष श्रुतिसिद्ध आहे, असें दाखविण्याकरितां ते प्राकृत अन्नमयकोशप्रतिपादक वाक्यें व स्थूल बुद्धि विरोचनाचा सिद्धान्त हीं प्रमाणें मानितात.

**जीवात्मनिर्गमे देहमरणस्यात्र दर्शनात्।**
**देहातिरिक्तएवात्मेत्याहुर्लोकायताः परे ||6-62||**

या व्यवहारांत जीवात्मा निघून गेला असतांच देह मृत होतो, असें दिसत असल्यामुळें आत्मा हा देहाहून निराळाच आहे, असें दुसरे लोकायत ( प्राकृत ) म्हणतात.

**प्रत्यक्षत्वेनाभिमताहंधीर्देहातिरेकिणम्।**
**गमयेदिन्द्रियात्मानं वच्मीत्यादिप्रयोगतः ||6-63||**

प्रत्यक्षरुपानें मान्य असलेली अहंबुद्धिच देहाहून अतिरिक्त अशा इंद्रियरुप

आत्म्याला, ' मी बोलतों ' इत्यादि प्रयोगावरुन सुचविते.

**वागादिनामिन्द्रियाणां कलहः श्रुतिषु श्रुतः।**
**तेन चैतन्यमेतेषामात्मत्वं तत एव हि ।।6-64।।**

श्रुतींमध्यें वागादि इंद्रियांचा कलह झाला असा निर्देश आहे. त्यावरुन तीं सचेतन आहेत असें व त्यामुळेंच तीं आत्मा असें सिद्ध होतें.

**हैरण्यगर्भाः प्राणात्मवादिनस्त्वेवमूचिरे।**
**चक्षुराद्यक्षलोपेऽपि प्राणसत्त्वे तु जीवति ।।6-65।।**
**प्राणोजागर्ति सुप्तेऽपि प्राणश्रैष्ठ्यादिकं श्रुतम्।**
**कोशः प्राणमयः सम्यग्विस्तरेण प्रपञ्चितः।। 6-66।।**

प्राण हाच आत्मा आहे असें म्हणणारे हैरण्यगर्भ तर असें म्हणतात कीं चक्षु, श्रोत्र इत्यादि इंद्रियांचा जरी लोप झाला तरी प्राण असला तर प्राणी वांचतो; तसेंच श्रुतीमध्यें देहेंद्रियादि सर्व निद्रित झालीं असताही प्राण जागतो व प्राणच सर्वात श्रेष्ठ आहे, नियन्ता आहे इत्यादि सांगितलेले आहे. प्राणमय कोशाचें तर फार विस्तारपूर्वक वर्णन केलेले आहे. तस्मात् प्राण हाच आत्मा.

**मन आत्मेति मन्यन्त उपासनपरा जनाः।**
**प्राणस्याभोक्तृता स्पष्टा भोक्तृत्वं मनसस्ततः ।।6-67।।**

उपासना करण्यामध्ये तत्पर झालेले लोक मन हाच आत्मा असे मानतात. प्राण भोक्ता नव्हे हें तर स्पष्टच आहे तस्मात् मन भोक्ता हे सिद्ध झाले.

**मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।**
**श्रुतो मनोमयःकोशस्तेनात्मेतीरितं मनः ।।6-68।।**

मनुष्यांच्या बंधाला व मोक्षाला कारण मनच आहे तसेंच मनोमय कोशही श्रुतींत सांगितलेला आहे. यास्तव मन हाच आत्मा असें आम्ही म्हणतो.

**विज्ञानमात्मेति पर आहुः क्षणिकवादिनः।**
**यतो विज्ञानमूलत्वं मनसो गम्यते स्फुटम् ।।6-69।।**

ज्याअर्थी मनाचें विज्ञान हें मूळ आहे असें स्पष्ट दिसतें, त्याअर्थी दुसरे क्षणिकवादि बौद्ध विज्ञान हाच आत्मा असें सांगतात.

**अहंवृत्तिरिदंवृत्तिरित्यन्तःकरणं द्विधा।**
**विज्ञानं स्यादहंवृत्तिरिदंवृत्तिर्मनो भवेत् ।।6-70।।**

मी ह्या वृत्तीचें व हें या वृत्तीचें असें अंतःकरण दोन प्रकारचें आहे. विज्ञान

अहंवृत्ति असून मन हें इदंवृत्ति म्हणजे दुस-या प्रकारचें आहे.

**अहंप्रत्ययबीजत्वमिदंवृत्तेरितिस्फुटम्।**
**अविदित्वा स्वमात्मानं बाह्यं वेत्ति न तु क्वचित् ।।6-71।।**

' हें ' अशा वृत्तीचें अहं ( मी हा ) प्रत्यय हें बीज आहे; हें अगदीं स्पष्ट आहे. कारण स्वतः आपणालाच न जाणतां बाह्य म्हणजे स्वतःहून अन्य पदार्थाला कधींच जाणतां येत नाहीं.

**क्षणे क्षणे जन्मनाशावहंवृत्तेर्मितौ यतः।**
**विज्ञानं क्षणिकं तेन स्वप्रकाशं स्वतो मितेः ।।6-72।।**

ज्याअर्थी प्रतिक्षणीं अहंवृत्तीचा जन्म व नाश झाल्याचें प्रत्ययाला येतें, त्याअर्थी विज्ञान हें क्षणिक आहे व तें स्वतःलाच जाणत असल्यामुळें स्वप्रकाशही आहे.

**विज्ञानमयकोशोऽयं जीव इत्यागमा जगुः।**
**सर्व संसार एतस्य जन्मनाशसुखादिकः ।।6-73।।**

हा विज्ञानमय कोशच जीव आहे, असें वेदहि सांगतात. जन्ममरण व सुखदुःख इत्यादिरुप हा सर्वहि संसार याचाच होय.

**विज्ञानं क्षणिकं नात्मा विद्युदभ्रनिमेषवत्।**
**अन्यस्यानुपलब्धत्वाच्छून्यं माध्यमिका जगुः ।।6-74।।**

विज, मेघ व पापण्यांचें लवणें याप्रमाणें क्षणिक असलेलें विज्ञान आत्मा नव्हे व अन्य कोणाचीहि उपलब्धि होत नसल्यामुळें माध्यमिक बौद्ध ' शून्य ' हा आत्मा असें म्हणूं लागले.

**असदेवेदमित्यादाविदमेव श्रुतं ततः।**
**ज्ञानज्ञेयात्मकं सर्वं जगद्भ्रान्तिप्रकल्पितम् ।।6-75।।**

ज्याअर्थी असत् ( शून्य ) हेंच पूर्वीं होतें इत्यादि श्रुतीमध्यें हेंच सांगितलें आहे त्याअर्थीं ज्ञान व ज्ञेयरुप असें हें सर्व जगत् भ्रान्तीमुळें कल्पिलेलें आहे.

**निरधिष्ठानविभ्रान्तेरभावादात्मनोऽस्तिता।**
**शून्यस्यापि ससाक्षित्वादन्यथा नोक्तिरस्य ते ।।6-76।।**

अधिष्ठानावांचून भ्रान्ति होणें शक्य नाहीं यास्तव आत्मा आहे असें सिद्ध होतें. तसेंच शून्यालासुद्धां साक्षी लागतच असल्यामुळेंहि त्याची सिद्धि होते. नाहीं तर तुला ह्या शून्याविषयीं बोलतांही येणार नाहीं.

**अन्यो विज्ञानमयतः आनन्दमय आन्तरः।**

**अस्तीत्येवोपलब्धव्य इति वैदिकदर्शनम् ।।6-77।।**

विज्ञानमयाहून निराळा व त्याच्या आंत असा आनंदमय आहे असेंच समजावें असें वैदिकदर्शन आहे ( असा श्रुतीचा उपदेश आहे ).

**अणुर्महान्मध्यमो वेत्येवं तत्रापि वादिनः।**
**बहुधा विवदन्ते हि श्रुतियुक्तिसमाश्रयात् ।।6-78।।**

आत्म्याविषयीं सुद्धां तो अणु, महान्, किंवा मध्यम आहे असें म्हणून वाद करणारे वादी श्रुतिवाक्यें व युक्ति यांचा आश्रय करुन नानाप्रकारें वाद करीत सुटतात.

**अणुं वदन्त्यान्तरालाः सूक्ष्मनाडीप्रचारतः।**
**रोम्णः सहस्त्रभागेन तुल्यासु प्रचरत्ययम् ।।6-79।।**

ज्याअर्थी रोमाच्या सहस्त्रपटीनें लहान ( सूक्ष्म ) असणा-या नाडींमध्यें हा फिरतो त्याअर्थी म्हणजे सूक्ष्मनाडीमध्यें
प्रचार करीत असल्यामुळें, हा अणु आहे असें आंतराल ( म्हणजे आत्मा आंत रहातो असें म्हणणारे वादी ) म्हणतात.

**अणोरणीयानेषोऽणुः सूक्ष्मात्सूक्ष्मतरं त्विति।**
**अणुत्वमाहुः श्रुतयः शतशोऽथ सहस्त्रशः ।।6-80।।**

अणूहूनही अणु, हा आत्मा अणु आहे, हें तत्त्व सूक्ष्माहूनहि ( आकाशाहूनहि ) सूक्ष्म आहे, इत्यादि शेकडों किंवा हजारों श्रुति हा अणु आहे, असें सांगतात.

**बालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य च।**
**भागो जीवः स विज्ञेय इति चाहापरा श्रुतिः ।।6-81।।**

शंभरप्रकारें विभागलेल्या केंसाच्या अग्राच्या शंभराव्या भागाएवढा तो जीव आहे, असें दुसरी श्रुति सांगते.

**दिगंबरा मध्यमत्वमाहुरापादमस्तकम्।**
**चैतन्यव्याप्तिसंदृष्टेरानखाग्रश्रुतेरपि ।।6-82।।**

पायांपासून मस्तकापर्यंत चैतन्य व्यापून राहिलें आहे, असा अनुभव येत असल्यामुळें व ' नखापासून मस्तकापर्यंत तो व्यापितो ' अशी श्रुति असल्यामुळें दिगंबर ( नग्न ) जैन, आत्मा शरीराच्या आकृतीचाच आहे, असें म्हणतात.

**सूक्ष्मनाडीप्रचारस्तु सूक्ष्मैरवयवैर्भवेत्।**
**स्थूलदेहस्य हस्ताभ्यां कञ्चुकप्रतिमोकवत् ।।6-83।।**

जसा स्थूलदेहाचा हस्तांच्या योगानें कवचामध्यें प्रवेश होतो त्याप्रमाणें आत्म्याचा सूक्ष्म नाडींतील प्रचारहि सूक्ष्म अवयवांच्या योगानें होतो.

**न्यूनाधिकशरीरेषु प्रवेशोऽपि गमागमैः।**
**आत्मांशानां भवेत्तेन मध्यमत्वं विनिश्चितम् ।।6-84।।**

आत्म्याच्या अंशाची वृद्धि व नाश यांच्या योगानें न्यून व अधिक शरीरामध्येंहि त्याचा प्रवेश होतो, तस्मात् तो मध्यम परिमाणाचाच आहे, असें निश्चित झालें.

**सांशस्य घटवन्नाशो भवत्येव तथा सति।**
**कृतनाशाकृताभ्यागमयोः को वारको भवेत् ।।6-85।।**

अंशयुक्त पदार्थांचा तर घटाप्रमाणें नाश होतो. मग असें झालें असतां, कृतनाश व अकृताभ्यागम या दोषांचें निवारण कोण करणार?

**तस्मादात्मा महानेव नैवाणुर्नापि मध्यमः।**
**आकाशवत्सर्वगतो निरंशः श्रुतिसंमतः ।।6-86।।**

तस्मात् आत्मा महत् परिमाणाचाच आहे. तो अणु नाहीं, मध्यमहि नाहीं. तर तो आकाशासारखा सर्वगत व निरंश, असा आहे. आणि हीच गोष्ट श्रुतीला मान्य आहे.

**इत्युक्त्वा तद्विशेषे तु बहुधा कलहं ययुः।**
**अचिद्ररुपोऽथ चिद्रुपश्चिदचिद्रुप इत्यपि ।।6-87।।**

असें म्हणून त्याच्या विशेष स्वरुपाविषयीं हा अचिद्रूप आहे, कीं चिद्रूप आहे, कीं चिदचिद्रूप आहे, अशाविषयींहि अनेक प्रकारें भांडत सुटतात.

**प्राभाकरास्तार्किकाश्च प्राहुरस्याचिदात्मताम् ।**
**आकाशावद्द्रव्यमात्मा शब्दवत्तद्गुणश्चितिः ।।6-88।।**

प्राभाकर मीमांसक व तार्किक हे हा आत्मा अचिद्रुप आहे, असे म्हणतात. आकाशाप्रमाणे आत्मा हे द्रव्य व शब्दाप्रमाणें चिति हा त्याचा गुण होय,असा त्यांचा अभिप्राय आहे.

**इच्छाद्वेषप्रयत्नाश्च धर्मधर्मौ सुखासुखे ।**
**तत्संस्काराश्च तस्यैते गुणाश्चितिवदीरिताः।। 6-89।।**

इच्छा, द्वेष, प्रयत्न, धर्म, अधर्म, सुख, दुःख व त्यांचे संस्कार असे हे चैतन्याप्रमाणेच त्याचे गुण सांगितले आहेत.

**आत्मनो मनसा योगे स्वादृष्टवशतो गुणाः।**
**जायन्तेऽथ प्रलीयन्ते सुषुप्तेऽदृष्टसंक्षयात् ।।6-90।।**
स्वतःच्या अदृष्टाच्या योगानें आत्म्याचा मनाशीं संयोग झाला असतां गुण उत्पन्न होतात व अदृष्टाचा क्षय झाला असतां निद्राकालीं ते लीन होतात.

**चितिमत्त्वाच्चेतनोऽयमिच्छाद्वेषप्रयत्नवान् ।**
**स्याद्धर्माधर्मयोः कर्ता भोक्ता दुःखादिमत्त्वतः ।।6-91।।**
हा चैतन्ययुक्त असल्यामुळें चेतन, इच्छा, द्वेष, व प्रयत्न यांनीं युक्त, धर्म व अधर्म यांचा कर्ता आणि दुःखादिकांनीं युक्त असल्यामुळें भोक्ता आहे.

**यथाऽत्र कर्मवशतः कादाचित्कं सुखादिकम्।**
**तथा लोकान्तरे देहे कर्मणेच्छादि जन्यते ।।6-92।।**
ज्याप्रमाणें या लोकीं कर्माच्या योगानें केव्हां केव्हां सुखदुःखादिकांची उत्पत्ति होते, त्याप्रमाणेंच परलोकांतील देहामध्येंसुद्धां कर्मामुळें इच्छादि गुण उत्पन्न होतात.

**एवं च सर्वगस्यापि सम्भवेतां गमागमौ।**
**कर्मकाण्डः समग्रोऽत्र प्रमाणमिति तेऽवदन् ।।6-93।।**
ह्याप्रमाणें सर्व व्यापी आत्म्याच्याहि ठिकाणीं जाणें व येणें ह्या क्रिया संभवतात. व याविषयीं सर्व कर्मकाण्ड प्रमाण आहे असें ते म्हणतात.

**आनन्दमयकोशो यः सुषुप्तौ परिशिष्यते।**
**अस्पष्टचित्स आत्मैषां पूर्वकोशोऽस्य ते गुणाः ।।6-94।।**
जो अस्पष्ट चैतन्ययुक्त असा आनंदमय कोश सुषुप्तीमध्यें अवशिष्ट रहातो तोच यांचा आत्मा व याचे ते पूर्वोक्त गुण म्हणजेच विज्ञानमय कोश होय.

**गूढं चैतन्यमुत्प्रेक्ष्य जडबोधस्वरुपताम्।**
**आत्मनो ब्रूवते भाट्टाश्चिदुत्प्रेक्षोत्थितस्मृतेः ।।6-95।।**
भट्टमीमांसक आत्म्याचें गूढ चैतन्य पाहून तो चिज्जडरुप आहे असें म्हणतात. जागृत झालेल्याच्या निद्राविषयक स्मरणावरुन आत्म्याच्या चैतन्याविषयीं तर्क होतो.

**जडो भूत्वा तदाऽस्वाप्समिति जाड्यस्मृतिस्तदा।**
**विना जाड्यानुभूतिं न कथंचिदुपपद्यते ।।6-96।।**
सुषुप्तिकालीं जड होऊन मी निजलों होतों, अशी जाड्यांविषयींची जी

स्मृति ती त्याकालच्या जाड्याच्या अनुभवावांचून होणें शक्य नाहीं.

**द्रष्टुर्दृष्टरलोपश्च श्रुतः सुप्तौ ततस्त्वयम्।**

**अप्रकाशप्रकाशाभ्यामात्मा खद्योतवद्युतः ।।6-97।।**

सुषुप्तीमध्यें द्रष्ट्याच्या दृष्टीचा लोप होत नाहीं, असें श्रुतीनें सांगितलें आहे. यास्तव हा आत्मा खद्योताप्रमाणें आकाश व प्रकाश यांनीं युक्त आहे.

**निरंशस्योभयात्मत्वं न कथंचिद्घटिष्यते।**

**तेन चिद्रूप एवात्मेत्याहुः सांख्यविवेकिनः ।।6-98।।**

अंशरहित अशा आत्म्याला उभयरुपता कधींच असणें युक्त नाहीं. यास्तव तो चिद्रूपच आहे असें सांख्यपंडित म्हणतात.

**जाड्यांशः प्रकृतेः रुपं विकारी त्रिगुणं च तत्।**

**चितोभोगापवर्गार्थं प्रकृतिः सा प्रवर्तते ।।6-99।।**

जो जाड्यांश प्रतीत होत असतो, तेंच प्रकृतीचें विकारी व त्रिगुणात्मक रुप आहे. ती प्रकृति चैतन्याला भोग व मोक्ष मिळावा म्हणून प्रवृत्त होते.

**असङ्गायाश्चितेर्बन्धमोक्षौ भेदाग्रहान्मतौ।**

**बन्धमुक्तिव्यवस्थार्थं पूर्वेषामिव चिद्भिदाम्।।6-100।।**

असंग अशा चैतन्याला बंध व मोक्ष हे दोन भाव त्यांच्या भेदाचें ज्ञान न झाल्यामुळें होतात. व बंध आणि मोक्ष यांची व्यवस्था लागण्याकरितां प्राभाकरांदिकांप्रमाणेंच आम्हीही पुरुष अनेक आहेत असें मानितों.

**महतः परमव्यक्तमिति प्रकृतिरुच्यते।**

**श्रुतावसङ्गता तद्वदसङ्गो हीत्यतः स्फुटा ।।6-101।।**

' महत्च्या पलीकडे अव्यक्त आहे ' अशा अर्थाच्या श्रुतीमध्यें प्रकृतीचा उल्लेख केलेला आहे व तसेंच ' हा पुरुष असंग आहे ' या ठिकाणीं त्याची असंगता स्पष्ट केली आहे.

**चित्सन्निधौ प्रवृत्तायाः प्रकृतेर्हि नियामकम्।**

**ईश्वरं ब्रुवते योगाः स जीवेभ्यः परः श्रुतः ।।6-102।।**

योगी चैतन्याच्या सन्निध असतानांच प्रवृत्त होणा-या प्रकृतीचा नियामक ईश्वर आहे असें म्हणतात. व तो जीवांहून पृथक् आहे, असेंही सांगतात.

**प्रधानक्षेत्रज्ञपतिर्गुणेश इति हि श्रुतिः।**

**आरण्यकेऽसंभ्रमेण ह्यन्तर्याम्युपपादितः ।।6-103।।**

' गुणसाम्यावस्थारुप प्रधान व जीव यांचा पति-स्वामी व सत्त्वादि गुणांचा

नियामक ’ इत्यादि श्रुति प्रसिद्धच
आहे. तसेंच आरण्यकामध्यें अंतर्यामिब्राह्मणांत सुद्धां हीच गोष्ट पुष्कळ प्रकारें वर्णिलेली आहे.

**अत्रापि कलहायन्ते वादिनः स्वस्वयुक्तिभिः।**
**वाक्यान्यपि यथाप्रज्ञं दाढर्यायोदाहरन्ति हि ।।6-104।।**

ह्याविषयीं सुद्धां वादी आपापल्या युक्ति योजून कलह करितात. आणि स्वमत दृढ करण्याकरितां श्रुतींची निरनिराळीं वाक्येंहि आपापल्या समजुतीप्रमाणें दाखवितात.

**क्लेशकर्मविपाकैस्तदाशयैरप्यसंयुतः।**
**पुंविशेषो भवेदीशो जीववत्सोऽप्यसङ्गचित् ।।6-105।।**

अविद्यादि क्लेश, त्रिविध कर्मे व भोगरुप विपाक आणि या सर्वांचे संस्कार यांनी कधींहि युक्त न होणारा जो विशेष पुरुष तोच ईश्वर होय. तोहि जीवाप्रमाणें असंगचैतन्यरुप आहे.

**तथाऽपि पुंविशेषत्वाद्घटतेऽस्य नियंतृता।**
**अव्यवस्थौ बन्धमोक्षावापतेतामिहान्यथा ।।6-106।।**

तरी तो एक विशेष पुरुष असल्यामुळें त्याच्याकडे नियन्तृता येते. आणि असें जर न मानलें तर याठिकाणीं बंध व मोक्ष यांची कांहीं व्यवस्थाच नाहीं, असें होणार.

**भीषास्मादित्येवमादावसङ्गस्य परात्मनः।**
**श्रुतं तद्युक्तमप्यस्य क्लेशकर्माद्यसङ्गमात् ।।6-107।।**

याच्या भयानें वारा वाहतो इत्यादि श्रुतीमध्यें असंग परमात्म्याचें जें ( सर्व भयोत्पादकत्व ) सांगितलें आहे तें क्लेश, कर्म, इत्यादिकांनीं हा युक्त नसल्यामुळेंच योग्य आहे.

**जीवानामप्यसङ्गत्वात् क्लेशादिर्न ह्यथाऽपि च।**
**विवेकाग्रहतः क्लेशकर्मादि प्रागुदीरितम् ।।6-108।।**

जीवही असंग असल्यामुळें त्यांना सुद्धां क्लेशादि दोष नाहींतच. तरीही पण विवेकाचा स्वीकार करितां येत नसल्यामुळें त्यांना क्लेश, कर्म इत्यादि प्राप्त होतात असें पूर्वी सांगितलें आहे.

**नित्यज्ञानप्रयत्नेच्छागुणानीशस्य मन्वते।**
**असङ्गस्य नियन्तृत्वमयुक्तमिति तार्किकाः ।।6-109।।**

असंग चैतन्याचे ठिकाणीं नियंतेपणा असणें अयोग्य आहे. यास्तव तार्किक लोक नित्य ज्ञान, नित्य प्रयत्न व नित्य इच्छा हे ईश्वराचे गुण मानितात.

**पुंविशेषत्वमप्यस्य गुणैरेव न चान्यथा।**
**सत्यकामः सत्यसंकल्पः इत्यादिश्रुतिर्जगौ ।।6-110।।**

ह्या चैतन्याला तरी जें पुरुषविशेषत्व आलेलें आहे तें याच गुणांच्या योगानें होय. अन्य कशानेंही नव्हे. तसेंच '
तो सत्यकाम, सत्यसंकल्प आहे ' इत्यादि श्रुतीनींही सांगितलें आहे.

**नित्यज्ञानादिमत्त्वेऽस्य सृष्टीरेव सदा भवेत्।**
**हिरण्यगर्भ ईशोऽतो लिङ्गदेहेन संयुतः ।।6-111।।**

परमात्मा नित्य ज्ञानादिकांनीं युक्त आहे असें जर मानलें तर सर्वकाल सृष्टीच राहील ( प्रलय कधीं होणार नाहीं ) यास्तव लिंगदेहानें युक्त असलेला हिरण्यगर्भ ईश आहे.

**उद्गीथब्राह्मण्ये तस्य माहात्म्यमतिविस्तृतम्।**
**लिङ्गसत्त्वेऽपि जीवत्वं नास्य कर्माद्यभावतः ।।6-112।।**

उद्गीथ ब्राह्मणामध्यें त्याचें माहात्म्य अति विस्तारपूर्वक वर्णिलेलें आहे. लिंगशरीर असतांनाही कर्मादिकांच्या अभावामुळें याचे ठिकाणीं जीवभाव नसतो.

**स्थूल देहं विना लिङ्गदेहो न क्वापि दृश्यते।**
**वैराजो देह ईशोऽतः सर्वतो मस्तकादिमान् ।।6-113।।**

स्थूल देहावांचून सूक्ष्म देह कोठेंच दिसत नाहीं. यास्तव ज्याला सर्व बाजूंनीं मस्तकें, नेत्र, इत्यादि असतात तो
विराट् देह ईश्वर होय.

**सहस्त्रशीर्षेत्येवं च विश्वतश्चक्षुरित्यपि।**
**श्रुतमित्याहुरनिशं विश्वरुपस्य चिन्तकाः ।।6-114।।**

' त्याला हजारों मुखें आहेत ' असें व ' त्याला सर्व बाजूंनीं नेत्र आहेत ' असेंही श्रुतींत सांगितलेलें आहे असें विश्वरुपाची उपासना करणारे वारंवार सांगत असतात.

**सर्वतः पाणिपादत्वे कृम्यादेरपि चेशता।**
**ततश्चतुर्मुखो देव एवेशो नेतरः पुमान् ।।6-115।।**

पण त्याला सर्वतः हात व पाय असतात, असें मानूं लागलें तर किडेसुद्धां ईश्वर होतील. तस्मात् चतुर्मुख जो देव तोच ईश्वर होय. इतर कोणीही पुरुष नव्हे.

**पुत्रार्थं तमुपासीना एवमाहुः प्रजापतिः।**
**प्रजा असृजतेत्यादिश्रुतिं चोदाहरन्त्यमी ।।6-116।।**

' पुत्राकरितां त्याची उपासना करणारे असें म्हणतात, ' व ' प्रजापतीनें प्रजा निर्माण केली ' इत्यादि श्रुति प्रमाण म्हणून दाखवितात.

**विष्णोर्नाभेः समुद्भूतो वेधाः कमलजस्ततः।**
**विष्णुरेवेश इत्याहुर्लोके भागवता जनाः ।।6-117।।**

कमलोद्भव ब्रह्मदेव विष्णूच्या नाभिकमलापासून उत्पन्न झालेला आहे, यास्तव विष्णूच ईश्वर होय. असें लोकांमध्यें भगवद्भक्त वैष्णव सांगतात.

**शिवस्य पादावन्वेष्टुं शाङ्र्गशक्तस्ततः शिवः।**
**ईशो न विष्णुरित्याहुः शैवा आगममानिनः ।।6-118।।**

विष्णु शंकराचे पाय पाहूं शकला नाहीं. यास्तव शिव हाच ईश्वर होय, विष्णु नव्हे, असें तांत्रिक शैव म्हणतात.

**पुरत्रयं सादयितुं विघ्नेशं सोऽप्यपूजयत्।**
**विनायकं प्राहुरीशं गाणपत्यमते रताः ।।6-119।।**

त्या शंकरानें सुद्धां त्रिपुराचें भस्म करण्याकरितां विघ्नेशाला पूजिलें आहे, म्हणून गणपतिभक्तांच्या मताचा आश्रय करणारे, विनायक हाच ईश्वर आहे, असें सांगतात.

**एवमन्ये स्वस्वपक्षाभिमानेनान्यथाऽन्यथा।**
**मन्त्रार्थवादकल्पादीनाश्रित्य प्रतिपेदिरे ।।6-120।।**

ह्याप्रमाणें दुसरेही वादी मंत्र, अर्थवाद, कल्प इत्यादिकांचा आश्रय करुन आपापल्या पक्षाचा अभिमान धरुन निरनिराळ्या प्रकारें ईश्वराची सिद्धि करितात. ( ईश्वराविषयीं भलभलत्या समजुती करुन घेतात. )

**अन्तर्यामिणमारभ्य स्थावरान्तेशवादिनः।**
**सन्त्यश्वत्थार्कवंशादेः कुलदैवतदर्शनात् ।।6-121।।**

अश्वत्थ, रुई, वेळु इत्यादिकही कुलदैवतें आहेत असें प्रत्ययाला येत असल्यामुळें अन्तर्यामीपासून पाषाणापर्यंत ईश्वर मानणारे वादी आहेत ( असें म्हणावें लागतें ).

**तत्त्वनिश्चयकामेन न्यायागमविचारिणाम्।**
**एकैव प्रतिपत्तिः स्यात् साऽप्यत्र स्फुटमुच्यते ।।6-122।।**

तत्त्वाविषयीं निश्चय व्हावा या इच्छेनें न्याय व आगम ( वेद ) यांचा विचार करणा-या पुरुषांचें ज्ञान एकच असतें. तें कोणतें हें आतां स्पष्ट सांगतों.

**मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम्।**
**अस्यावयवभूतैस्तु व्याप्तं सर्वमिदं जगत् ।।6-123।।**

माया ही प्रकृति आहे व मायावान् पुरुष महेश्वर आहे, असें जाणावें. या परमेश्वराच्या अवयवरुप अशा जीवांनीं हें सर्वही जगत् व्यापिलें आहे.

**इति श्रुत्यनुसारेण न्याय्यो निर्णय ईश्वरे।**
**तथा सत्यविरोधः स्यात्स्थावरान्तेशवादिनाम् ।।6-124।।**

अशी जी पूर्वी श्रुति सांगितली तिच्या अनुरोधानें ईश्वराविषयीं निर्णय करणें युक्त आहे. आणि असा निर्णय केल्यानेंच स्थावर पदार्थांपर्यंत ईश्वर मानणा-यांच्या मताशीं विरोध येणार नाहीं.

**माया चेयं तमोरुपा तापनीये तदीरणात्।**
**अनुभूतिं तत्र मानं प्रतिजज्ञे श्रुतिः स्वयम् ।।6-125।।**

नृसिंहोत्तरतापनीय नांवाच्या उपनिषदांत तसें सांगितलें असल्यामुळें ही माया तमोरुप आहे. त्याविषयीं स्वतः श्रुतीनें अनुभव हेंच प्रमाण आहे असें स्पष्टपणें सांगितलें आहे.

**जडं मोहात्मकं तच्चेत्यनुभावयति श्रुतिः।**
**आबालगोपं स्पष्टत्वादानन्त्यं तस्य साऽब्रवीत् ।।6-126।।**

तें जड मोहमय आहे असा श्रुति मुमुक्षुचा अनुभव करविते. व सर्व बालगोपालादिकांना ठाऊक असल्यामुळें तें अनन्त आहे असेंही सांगितलें आहे.

**अचिदात्मघटादिनाम् यत्स्वरुपं जडं हि तत्।**
**यत्रकुण्ठीभवेद्बुद्धिः स मोह इति लौकिकाः ।।6-127।।**

चैतन्यशून्य अशा घटादिकांचें जें स्वरुप तें जड हें सुप्रसिद्ध आहे. व ज्या ठिकाणीं बुद्धि कुंठीत होते तो मोह असें लौकिक म्हणतात.

**इत्थं लौकिकदृष्ट्यैतत्सर्वैरप्यनुभूयते।**
**युक्तिदृष्ट्या त्वनिर्वाच्यं नासदासीदितिश्रुतेः ।।6-128।।**

ह्याप्रमाणें लौकिक दृष्टीनें याचा सर्वांनाही अनुभव येतो व ' त्या वेळीं सत् नव्हतें व असत्ही नव्हतें 'अशी श्रुति असल्यामुळें युक्तिदृष्ट्या हें अनिर्वचनीय ठरतें.

**नासदासीद्विभातत्वान्नो सदासीच्च बाधनात्।**
**विद्यादृष्ट्या श्रुतं तुच्छं तस्यानित्यनिवृत्तितः ।।6-129।।**

व्यक्त दिसत असल्यामुळें असत् नव्हतें; बाध होत असल्यामुळें सत्ही नव्हतें. व त्याची निवृत्ति नित्य होत असल्यामुळें विद्येच्या दृष्टीनें तें तुच्छ आहे असें श्रुतीनें सांगितलें आहे.

**तुच्छाऽनिर्वचनीया च वास्तवी चेत्यसौ त्रिधा।**
**ज्ञेया माया त्रिभिर्बोधैः श्रौतयौक्तिकलौकिकैः ।।6-130।।**

ही माया श्रौत, यौक्तिक, व लौकिक अशा तीन प्रकारच्या ज्ञानानें तुच्छ, अनिर्वचनीय व वास्तविक अशी तीन प्रकारची आहे असें जाणावें.

**अस्य सत्त्वमसत्त्वं च जगतो दर्शयत्यसौ।**
**प्रसारणाच्च संकोचाद्यथा चित्रपटस्तथा ।।6-131।।**

ज्याप्रमाणें चित्रपट पसरला असतां व गुंडाळला असतां चित्राचें सत्त्व व असत्त्व दाखवितो, त्याप्रमाणें ही माया ह्या जगाचें सत्त्व व असत्त्व दाखविते.

**अस्वतन्त्रता हि माया स्यादप्रतीतेर्विना चितिम्।**
**स्वतन्त्रताऽपि तथैव स्यादसङ्गस्यान्यथाकृते ।।6-132।।**

चैतन्यावांचून हिची प्रतीतीच येत नसल्यामुळें ही माया परतंत्र आहे. तसेंच असंग चैतन्यालाही ही संग उत्पन्न करीत असल्यामुळें स्वतंत्रही आहे.

**कूटस्थासङ्गमात्मानं जगत्त्वेन करोति सा।**
**चिदाभासस्वरुपेण जीवेशावपि निर्ममे ।।6-133।।**

ती निर्विकार व असंग अशा आत्म्याला जगद्रूपानें भासविते. तसेंच चैतन्याच्या आभासारुपानें जीव व ईश्वर यांनाही निर्माण करिते.

**कूटस्थमनुपद्रुत्य करोति जगदादिकम्।**
**दुर्घटैकविधायिन्यां मायायां का चमत्कृतिः ।।6-134।।**

ही कूटस्थाला कांहींएक उपद्रव न करितां जगदादि करिते. अहो दुर्घट कृत्येंमात्र करणा-या मायेच्या ठिकाणीं चमत्कार तो कोणता ?

**द्रवत्वमुदके वन्हावौष्ण्यं काठिन्यमश्मनि।**
**मायाया दुर्घटत्वं च स्वतः सिद्ध्यति नान्यतः ।।6-135।।**

ज्याप्रमाणें उदकांत आर्द्रता, अग्नींत उष्णता व पाषाणांत कठिणता स्वतः सिद्ध असते, त्याचप्रमाणें मायेचें दुर्घटत्व स्वतः सिद्ध आहे अन्यतः सिद्ध नव्हे.

**न वेत्ति लोको यावत्तां साक्षात्तावच्चमत्कृतिम्।**
**धत्ते मनसि पश्चात्तु मायैषेत्युपशाम्यति।।6-136।।**

मनुष्य जोंपर्यंत त्या ( मायेच्या नियन्त्याला ) साक्षात् जाणत नाहीं तोंपर्यंत मनांत चमत्कार बाळगितो.(तोपर्यंत त्याला हा चमत्कार आहे असें वाटतें ) पण त्याचा साक्षात्कार झाल्यावर ही माया आहे असें समजून शांत होतो.

**प्रसरन्ति हि चोद्यानि जगद्वस्तुत्ववादिषु।**
**न चोदनीयं मायायां तस्याश्चोद्यैकरुपतः ।।6-137।।**

अशा प्रकारचे प्रश्न जग सत्य आहे असें म्हणणारे जे कोणी असतील त्यांना विचारणें युक्त आहे. ( आम्हां मायावाद्यांना असले प्रश्न विचारितां येत नाहींत कारण ) ती मायाच मुळीं प्रश्नरुप असल्यामुळें तिच्याविषयीं प्रश्न करितां येत नाहीं.

**चोद्येऽपि यदि चोद्यं स्यात् त्वच्चोद्ये चोद्यते मया।**
**परिहार्यं ततश्चोद्यं न पुनः प्रतिचोद्यताम् ।।6-138।।**

जर ह्या प्रश्नरुप मायेविषयींच प्रश्न करशील तर मीही तुझ्या प्रश्नावर प्रतिप्रश्न करीन. म्हणून प्रश्नाचा परिहार करावा व पुनः प्रति प्रश्न करुं नये.

**विस्मयैकशरीराया मायायाश्चोद्यरुपतः।**
**अन्वेष्यः परिहारोऽस्याः बुद्धिमद्भिः प्रयत्नतः ।।6-139।।**

आश्चर्य हेंच एक शरीर आहे जिचें अशी ही माया स्वतः आक्षेपात्मक असल्यामुळें बुद्धिमान् पुरुषांनीं प्रयत्नपूर्वक हिचा परिहार कसा होईल तें पहावें.

**मायात्वमेव निश्चेयमिति चेत्तर्हि निश्चिनु।**
**लोकप्रसिद्धमायाया लक्षणं यत्तदीक्ष्यताम् ।।6-140।।**

मायात्वाचाच अगोदर निश्चय कर्तव्य आहे असें जर म्हणशील तर ठीक आहे त्याच निश्चय कर. लोकमतप्रसिद्ध असलेल्या मायेचें लक्षण तेंच हिचें आहे, असें समजावें.

**न निरुपयितुं शक्या विस्पष्टं भासते च या।**

**सा मायेतीन्द्रजालादौ लोकाः संप्रतिपेदिरे ||6-141||**

जी निरुपण करितां येण्यासारखी नसून स्पष्टपणें भासते ती माया असें इंद्रजालादिकांविषयीं लोकांनीं ठरविलें आहे.

**स्पष्टं भाति जगच्चेदमशक्यं तन्निरुपणम्।**
**मायामयं जगत्तस्मादीक्षस्वापक्षपाततः ||6-142||**

हें जगत् स्पष्ट भासतें खरें पण त्याचें निरुपण करितां येत नाहीं. यास्तव पक्षपात न करितां हें जग मायामय आहे असें पहा.

**निरुपयितुमारब्धे निखिलैरपि पण्डितैः।**
**अज्ञानं पुरतस्तेषां भाति कक्षासु कासुचित् ||6-143||**

सर्वहि पंडितांनीं ( एकत्र मिळून जरी ) जगाच्या निरुपणाला आरंभ केला, तरी कोणच्या तरी एका कक्षेमध्यें
त्यांच्यापुढें अज्ञान उभें रहातेंच.

**देहेन्द्रियादयोभावा वीर्येणोत्पादिताः कथम्।**
**कथं वा तत्र चैतन्यमित्युक्ते ते किमुत्तरन् ||6-144||**

देह इंद्रियें इत्यादि पदार्थ वीर्याच्या योगानें कसे उत्पन्न झाले किंवा त्यांत चैतन्य कसें आलें असें विचारलें असतां ते काय उत्तर देतील.

**वीर्यस्यैष स्वभावश्चेत्कथं तद्विदितं त्वया।**
**अन्वयव्यतिरेकौ यौ भग्नौ तौ वन्ध्यवीर्यतः ||6-145||**

हा वीर्याचा स्वभाव आहे असें जर म्हणशील, तर तें तुला कसें समजलें ? अन्वयव्यतिरेकन्यायानें म्हणून म्हणशील तर त्यांचा वांझ स्त्रीच्या ठिकाणीं भंग होतो.

**न जानामि किमप्येतदित्यन्ते शरणं तव।**
**अत एव महान्तोऽस्य प्रवदन्तीन्द्रजालताम् ||6-146||**

मी कांहीं सुद्धां जाणत नाहीं, असेंच शेवटीं तुला अंगिकारिलें पाहिजे. आणि एवढ्याचकरितां महात्में याला इंद्रजाल असें म्हणतात.

**एतस्मात्किमेवेन्द्रजालमपरं यद्गर्भवासस्थितम्**
**रेतश्चेतति हस्तमस्तकपदप्रोद्भूतनानाङ्कुरम्।**
**पर्यायेण शिशुत्वयौवनजरावेषैरनेकैर्वृतं**
**पश्यत्यत्ति शृणोति जिघ्रति तथा गच्छत्यथागच्छति ||6-147||**

जें गर्भवासांत प्रविष्ट झालेलें रेत तें हस्त, मस्तक, पाद इत्यादि प्रकारें

उत्पन्न झालेल्या अंकुरांनीं परिणाम पावतें. तसेंच तें बालपण, तारुण्य, वृद्धत्व इत्यादि अनेक वेषांनीं निरनिराळ्या काळीं युक्त होऊन पहातें, खातें, ऐकतें, वास घेतें तसेंच जातें व येतें. तेव्हां आतां यापेक्षां निराळें तें गौडबंगाल कोणतें बरें ?

**देहवद्वटधानादौ सुविचार्य विलोक्यताम्।**
**क्व धाना कुत्र वा वृक्षस्तस्मान्मायेति निश्चिनु ।।6-148।।**

देहाप्रमाणेंच वटवृक्षाच्या बीजाविषयींसुद्धां उत्तम प्रकारें विचार करुन पहावा. त्याचें तें बीं कोठें व तो वृक्ष कोठें ? सारांश ही माया आहे असा निश्चय कर.

**निरुक्तावभिमानं ते दधते तार्किकादयः।**
**हर्षमिश्रादिभिस्ते तु खण्डनादौ सुशिक्षिताः ।।6-149।।**

जे कांहीं तार्किकादिक जगाच्या निरुपणाविषयीं अभिमान बाळगितात त्यांना हर्षमिश्रादि अद्वैतमतस्थापकांनीं खंडनादिकांविषयीं चांगला उपदेश केला आहे.

**अचिन्त्या खलु ये भावा न तांस्तर्केषु योजयेत्।**
**अचिन्त्यरचनारुपं मनसाऽपि जगत्खलु ।।6-150।।**

जे खरोखर अचिन्त्य भाव असतात त्यांच्याविषयीं तर्क करुं नये. हें जग तर मनालाहि कल्पना न करितां येण्यासारखें आहे.

**अचिन्त्यरचनाशक्तिबीजं मायेति निश्चिनु।**
**मायाबीजं तदेवैकं सुषुप्तावनुभूयते ।।6-151।।**

अकल्पित रचना करणा-या शक्तीनें युक्त असें जें बीज, तीच माया होय, असा निश्चय कर. व ज्याचा सुषुप्तींत अनुभव येतो, तेंच एक मायारुपी बीज आहे.

**जाग्रत्स्वप्नजगत्तत्र लीनं बीज इव द्रुमः।**
**तस्मादशेष जगतो वासनास्तत्र संस्थिताः ।।6-152।।**

बीजामध्यें जसा वृक्ष त्याप्रमाणें सुषुप्तीमध्यें जाग्रत् व स्वप्नकालिक विश्व ज्याअर्थी लीन होतें त्याअर्थी सर्वजगाच्या वासना तेथें रहातात.

**या बुद्धिवासनास्तासु चैतन्यं प्रतिबिम्बति।**
**मेघाकाशवदस्पष्टचिदाभासोऽनुमीयताम् ।।6-153।।**

( त्याठिकाणीं असणा-या ) ज्या बुद्धिवासना त्यांमध्यें चैतन्य प्रतिबिंबित होतें.

आणि म्हणून मेघाकाशाप्रमाणें अस्पष्ट असा चैतन्याचा भास तेथें असतो असें अनुमान करावें.

**साभासमेव तद्‌बीजं धीरुपेण प्ररोहति।**
**अतो बुद्धौ चिदाभासो विस्पष्टं प्रतिभासते ।।6-154।।**

आभासासहवर्तमानच तें बीजभूत अज्ञान बुद्धिरुपानें विकार पावतें. आणि त्यामुळें चिदाभास बुद्धीमध्यें स्पष्टपणें भासतो.

**मायाभासेन जीवेशौ करोतीति श्रुतौ श्रुतौ।**
**मेघाकाशजलाकाशाविव तौ सुव्यवस्थितौ ।।6-155।।**

' माया आभासाच्या योगानें जीव व ईश्वर करिते ' असे जे श्रुतीमध्यें सांगितलेले जीवेश त्या उभयतांची जलाकाश व मेघाकाशाप्रमाणें उत्तमप्रकारें व्यवस्था लागते.

**मेघवद्वर्तते माया मेघस्थिततुषारवत्।**
**धीवासनाश्चिदाभास्तुषारस्थखवत्स्थितः ।।6-156।।**

मेघासारखी ही माया आहे; मेघांतल्या तुषारांप्रमाणें बुद्धिवासना आहेत; व तुषारांतील आकाशप्रतिबिंबाप्रमाणें हा चिदाभास ( ईश्वर ) आहे.

**मायाधीनश्चिदाभासः श्रुतो मायी महेश्वरः।**
**अन्तर्यामी च सर्वज्ञो जगद्योनिः स एव हि ।।6-157।।**

जो मायेच्या अधीन असलेला चैतन्याभास तोच मायी व महेश्वर असें श्रुत आहे. आणि तोच अन्तर्यामी सर्वज्ञ व जगद्योनि ( जगाचें कारण ) होय हें प्रसिद्ध आहे.

**सौषुप्तमानन्दमयं प्रक्रम्यैवं श्रुतिर्जगौ।**
**एष सर्वेश्वर इति सोऽयं वेदोक्त ईश्वरः ।।6-158।।**

सुषुप्त्यवस्थेंतील आनन्दमय कोशाला अनुलक्षून श्रुतीनें ' हा सर्वेश्वर ' इत्यादि म्हटलें आहे. अर्थात् तो हा वेदोक्त ईश्वर होय.

**सर्वज्ञत्वादिके तस्य नैव विप्रतिपद्यताम्।**
**श्रौतार्थस्यावितर्क्यत्वान्मायायां सर्वसम्भवात् ।।6-159।।**

त्याच्या सर्वज्ञत्वादिकांविषयीं कुतर्क काढूं नयेच. कारण श्रुति प्रतिपादित अर्थ तर्कगम्य नसतो व मायेच्या योगानें सर्व कांहीं संभवतें.

**अयं यत्सृजते विश्वं तदन्यथयितुं पुमान्।**
**न कोऽपि शक्तस्तेनायं सर्वश्वर इतीरितः ।।6-160।।**

हा जें हें विश्व निर्माण करितो त्याला अन्यथा करण्यास कोणीहि पुरुष समर्थ नाहीं. म्हणून याला सर्वेश्वर असें श्रुतींत म्हटलें आहे.

**अशेषप्राणिबुद्धीनां वासनास्तत्र संस्थिताः।**
**ताभिः क्रोडीकृतं सर्वं तेन सर्वज्ञ ईरितः ।।6-161।।**

त्या सुषुप्तींतील अज्ञानामध्यें सर्व प्राण्यांच्या बुद्धींतील वासना राहिलेल्या असतात. व त्या वासनाच सर्व जगाला विषय करितात, त्यामुळें त्याला सर्वज्ञ असें म्हटलें आहे.

**वासनानां परोक्षत्वात्सर्वज्ञत्वं न हीक्ष्यते।**
**सर्वबुद्धिषु तद्दृष्ट्वा वासनास्वनुमीयताम् ।।6-162।।**

वासना अप्रत्यक्ष असल्यामुळें त्याचें सर्वज्ञत्व प्रत्ययाला येत नाहीं. पण तें सर्व बुद्धींमध्यें पाहून वासनांतही आहेच असें अनुमान करावें.

**विज्ञानमयमुख्येषु कोशेष्वन्यत्र चैव हि।**
**अन्तस्तिष्ठन् यमयति तेनान्तर्यामितां व्रजेत् ।।6-163।।**

विज्ञानमयादि कोशांमध्यें व तसेंच पृथिव्यादिकांच्या ठिकाणीं गूढ राहून ज्याअर्थीं हा नियमन करितो त्याअर्थीं तो अंतर्यामी होतो.

**बुद्धौ तिष्ठन्नान्तरोऽस्या धियानीक्ष्यश्च धीवपुः।**
**धियमन्तर्यमयतीत्येवं वेदेन घोषितम् ।।6-164।।**

हा बुद्धीमध्यें राहणारा, हिच्या अगदीं आंत असणारा, पण बुद्धीला न दिसणारा चिद्रूप आत्मा आंत राहून तिचें नियमन करितो, असें वेदानें स्पष्टपणें सांगितलें आहे.

**तन्तुः पटे स्थितो यद्वदुपादानतया तथा।**
**सर्वोपादानरुपत्वात् सर्वत्रायमवस्थितः ।।6-165।।**

उपादानभावानें जसा तंतु पटामध्यें राहिलेला असतो, तसा हा सर्वांना उपादानरुप असल्यामुळें सर्व ठिकाणीं राहिलेला आहे.

**पटादप्यान्तरस्तन्तुस्तन्तोरप्यंशुरान्तरः।**
**आन्तरत्वस्य विश्रान्तिर्यत्रासावनुमीयताम् ।।6-166।।**

पटाहूनहि तंतु सूक्ष्म असतो तंतूहूनहि कापसाचा कण आंतर ( सूक्ष्म ) असतो. ह्याप्रमाणें या सूक्ष्मत्वाची मर्यादा जेथें खुंटते, तेथें तो असें अनुमान करावें.

**द्वित्रान्तरत्वकक्षाणां दर्शनेऽप्ययमान्तरः।**

**न वीक्ष्यते ततो युक्तिश्रुतिभ्यामेव निर्णयः ।।6-167।।**

( असा विचार करुं लागलें असतां ) दोन किंवा तीन सूक्ष्म सूक्ष्म कक्षा जरी दिसल्या तरी हा सर्वान्तर्यामी दिसत नाहीं. यास्तव त्याचा श्रुति व युक्ति यांच्या योगानेंच निर्णय करावा.

**पटरुपेण संस्थानात् पटस्तन्तोर्वपुर्यथा।**
**सर्वरुपेण संस्थानात्सर्वमस्य वपुस्तथा ।।6-168।।**

ज्याप्रमाणें पटरुपानें होऊन राहिल्यामुळें पट हेंच तंतूचें शरीर तसेंच हा सर्वरुपानें राहिल्यामुळें सर्व याचें शरीर आहे.

**तन्तोः संकोचविस्तारचलनादौ पटस्तथा।**
**अवश्यमेव भवति न स्वातन्त्र्यं पटे मनाक् ।।6-169।।**

तंतूच्या संकोच, विस्तार, चलन इत्यादिकालीं पटहि अवश्यच तसा होतो. म्हणून पटाचे ठिकाणीं थोडेंहि स्वातंत्र्य नसतें.

**तथान्तर्याम्ययं यत्र यया वासनया यथा।**
**विक्रियेत तथाऽवश्यं भवत्येव न संशयः ।।6-170।।**

त्याप्रमाणेंच हा अंतर्यामी जेथें ज्या वासनेनें व जसा विक्रित होतो तसें तें कार्य अवश्य होतेंच, यांत कांहीं शंका नाहीं.

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारुढानि मायया ।।6-171।।**

हे अर्जुना, हा नियन्ता ( जन्ममरणपरंपरारुप ) यंत्रावर आरुढ झालेल्या सर्व भूतांना मायेच्या योगानें फिरवीत सर्व प्राण्यांच्या हृदयांत रहातो.

**सर्वभूतानि विज्ञानमयास्ते हृदये स्थिताः।**
**तदुपादानभूतेशस्तत्र विक्रियते खलु ।।6-172।।**

जे पूर्वोक्त विज्ञानमय कोश तींच सर्वभूतें होत. ते ( विज्ञानमय ) हृदयामध्यें राहिलेले असतात. कारण तेथेंच त्यांचा उपादान कारणभूत ईश्वर विकार पावतो, हें प्रसिद्ध आहे.

**देहादिपञ्जरं यन्त्रं तदारोहोऽभिमानिता।**
**विहितप्रतिषिद्धेषु प्रवृत्तिर्भ्रमणं भवेत् ।।6-173।।**

देहाचा जो हा पिंजरा तेंच यंत्र होय; त्याच्यावर अभिमान ठेवून तोच मी असें जें म्हणणें, तेंच त्यावर आरुढ होणें होय; आणि विहित व प्रतिषिद्ध कर्मांमध्यें जें प्रवृत्त होणें तेंच भ्रमण होय.

**विज्ञानमयरुपेण तत्प्रवृत्तिस्वरुपतः।**
**स्वशक्त्येशो विक्रियते मायया भ्रामणं हि तत् ।।6-174।।**

ईश्वर स्वतःच्या शक्तीनें विज्ञानमयरुपानें कर्मामध्यें प्रवृत्ति करणारा म्हणून जो विकार पावतो, तेंच मायेकडून भ्रमण करविणें होय.

**अन्तर्यमयतीत्युक्त्याऽयमेवार्थः श्रुतौ श्रुतः।**
**पृथिव्यादिषु सर्वत्र न्यायोऽयं योज्यताम् धिया ।।6-175।।**

श्रुतीमध्यें, आंत राहून नियमन करितो अशा निर्देशानें हाच अर्थ व्यक्त केला आहे. हाच न्याय सर्वत्र पृथिव्यादिकांच्या ठिकाणीं विचारपूर्वक योजावा.

**जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिर्जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः।**
**केनापि देवेन हृदि स्थितेन यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि ।।6-176।।**

मी धर्म जाणतों, पण तेथें माझी प्रवृत्ति होत नाहीं. तसेंच मी अधर्मसुद्धां जाणतों, पण त्यापासून माझी निवृत्ति होत नाहीं. तर माझ्या हृदयामध्यें बसलेला कोणी एक देव मला जशी प्रेरणा करितो, तसें मी करितों.

**नार्थः पुरुषकारेणेत्येवं मा शंक्यतां यतः।**
**ईशः पुरुषकारस्य रुपेणापि विवर्तते ।।6-177।।**

ज्याअर्थी ईश्वर प्रयत्नरुपानें सुद्धां परिणाम पावतो त्याअर्थी प्रयत्नाचा उपयोग नाहीं अशी शंका घेऊं नये.

**ईदृग्बोधेनेश्वरस्य प्रवृत्तिर्मैव वार्यताम्।**
**तथाऽपीशस्य बोधेन स्वात्मासङ्गत्व धीजनिः ।।6-178।।**

अशा ज्ञानानें ईश्वराच्या प्रवृत्तीचें निवारण करुं नये. कारण ईश्वराचा तसा जरी बोध झाला, तरी प्रत्यगात्मा असंग आहे अशी बुद्धि उत्पन्न होते.

**तावता मुक्तिरित्याहुः श्रुतयः स्मृतयस्तथा।**
**श्रुतिस्मृति ममैवाज्ञे इत्यपीश्वरभाषितम् ।।6-179।।**

तसल्या बोधानेंच मुक्ति मिळते, असें श्रुति व स्मृति सांगतात. व श्रुतिस्मृति या माझ्याच आज्ञा आहेत असें ईश्वरानें सांगितलें आहे.

**आज्ञाया भीतिहेतुत्वं भीषास्मादिति हि श्रुतम्।**
**सर्वेश्वरत्वमेतत्स्यादन्तर्यामित्वतः पृथक् ।।6-180।।**

ज्याअर्थी ' याच्या भीतीनें वारा वहातो ' इत्यादि प्रकारें श्रुतींत वर्णन आहे; त्याअर्थी आज्ञा हेंच भीतीचें कारण आहे. हें सर्वेश्वरत्व अंतर्यामित्वाहून

भिन्न आहे.

**एतस्य वा अक्षरस्य प्रशासन इति श्रुतिः।**
**अन्तः प्रविष्टः शास्ताऽयं जनानामिति च श्रुतिः ।।6-181।।**

याविषयींच, ' ह्या अविनाशी परमात्म्याच्या आज्ञेमध्यें, हें गार्गि, सूर्य व चंद्र रहातात. ' अशी व ' हा सर्व जीवांच्या आंत प्रवेश करुन त्यांचें नियमन करितो ' अशी श्रुति आहे.

**जगद्योनिर्भवेदेष प्रभवाप्ययकृत्त्वतः।**
**आविर्भावतिरोभावावुत्पत्तिप्रलयौ मतौ ।।6-182।।**

जगाची उत्पत्ति व प्रलय हे करीत असल्यामुळें हा जगाची योनि होतो. उत्पत्ति व प्रलय म्हणजे प्रकट होणें व गुप्त होणें असेंच आम्हांला मान्य आहे.

**आविर्भावयति स्वस्मिन्विलीनं सकलं जगत्।**
**प्राणिकर्मवशादेष पटो यद्वत्प्रसारितः ।।6-183।।**

ज्याप्रमाणें पसरलेला चित्रपट स्वतःवरची चित्रें प्रकट करितो, त्याप्रमाणें प्राण्याच्या कर्मामुळें हा स्वतःमध्येंच लीन झालेलें सर्व जग प्रकट करितो.

**पुनस्तिरोभावयति स्वात्मन्येवाखिलं जगत्।**
**प्राणिकर्मक्षयवशात्संकोचितपटो यथा ।।6-184।।**

ज्याप्रमाणें गुंडाळलेल्या पटांत सर्व चित्रांचा लय होतो, त्याप्रमाणें प्राण्यांच्या कर्माचा क्षय झाला असतां स्वतःमध्येंच हा ईश्वर सर्व जगत् पुनः लीन करितो.

**रात्रिघस्त्रौ सुप्तिबोधावुन्मीलननिमीलने।**
**तूष्णींभावमनोराज्ये इव सृष्टिलयाविमौ ।।6-185।।**

सृष्टीचे हे उत्पत्ति प्रलयभाव, रात्र व दिवस, निद्रा व जागृति, डोळें झांकणें व उघडणें किंवा कांहींएक विचार न करणें व मनोराज्य यांप्रमाणें आहेत.

**आविर्भावतिरोभावशक्तिमत्त्वेन हेतुना।**
**आरम्भपरिणामादिचोद्यानां नात्र सम्भवः।। 6-186।।**

या ईश्वराच्याठिकाणीं प्रकट करणें व लीन करणें ही शक्ति असल्यामुळें आरंभ व परिणाम विषयक प्रश्नांचा संभव नाहीं.

**अचेतनानां हेतुः स्याज्जाड्यांशेनेश्वरस्तथा।**
**चिदाभासांशतस्त्वेष जीवानां कारणं भवेत् ।।6-187।।**

ईश्वर जड अंशाच्या योगानें अचेतन पदार्थांचें कारण होतो व तसेंच हा चैतन्याभासाच्या अंशांनीं जीवांचें कारण होतो.

**तमः प्रधानः क्षेत्राणां चित्प्रधानश्चिदात्मनाम्।**
**परः कारणतामेति भावनाज्ञानकर्मभिः ||6-188||**
**इति वार्तिककारेण जडचेतनहेतुता।**
**परमात्मन एवोक्ता न ईश्वरस्येति चेच्छृणु ||6-189||**

संस्कार, ध्यानादि ज्ञान व पुण्यादि कर्म यांच्या योगानें परमात्माच तमोगुण प्रधान होऊन क्षेत्रांचा (शरीरांचा, आकारांचा ) व चैतन्यप्रधान होऊन जीवांचा हेतु होतो; अशाप्रकारें वार्तिककारांनीं परमात्माच चराचर जगाचें कारण आहे, ईश्वर नव्हे असें म्हटलें आहे, म्हणून जर म्हणशील तर ऐक.

**अन्योन्यध्यासमत्रापि जीवकूटस्थयोरिव ।**
**ईश्वर ब्रह्मणोः सिद्धं कृत्वा ब्रूते सुरेश्वरः ||6-190||**

येथें सुद्धां जीव व कूटस्थ यांच्याप्रमाणेंच ईश्वर व ब्रह्म यांचा अन्योन्याध्यास गृहीत धरुनच सुरेश्वराचार्य असें म्हणत आहेत.

**सत्यंज्ञानमनन्तं यत् ब्रह्म तस्मात्समुत्थिताः ।**
**खं वाय्वग्निजलोर्व्योषध्यन्नदेहा इति श्रुतिः ||6-191||**

' जें सत्य, ज्ञान व अनंत ब्रह्म त्यापासून आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी, औषधि, अन्न व देह हे पदार्थ उत्पन्न झाले, ' अशी श्रुती आहे.

**आपातदृष्टितस्तत्र ब्रह्मणो भाति हेतुता ।**
**हेतोश्च सत्यता तस्मादन्योन्याध्यास इष्यते ||6-192||**

त्या श्रुतीमध्यें स्थूल दृष्टीनें पहाणा-याला ब्रह्म याचें कारण आहे असें वाटतें. व कारण सत्य असतें ( असा न्याय आहे. ) तस्मात् अन्योन्याध्यास मानावाच लागतो.

**अन्योन्यध्यासरुपोऽसावन्नलिप्तपटो यथा ।**
**घट्टितेनैकतामेति तद्वद्भ्रान्त्यैकतां गतः ||6-193||**

ज्याप्रमाणें खळीनें सारवलेला पट खळीच्या लेपाशीं ऐक्य पावतो त्याप्रमाणें अन्योन्याध्यासरुप असा हा ईश, भ्रांतीनें ऐक्याला पावतो.

**मेघाकाशमहाकाशौ विविच्येते न पामरैः ।**
**तद्वद्ब्रह्मेशयोरैक्यं पश्यन्त्यापातदर्शिनः ||6-194||**

ज्याप्रमाणें विषयांमुळें दीन झालेल्या प्राण्यांना मेघाकाश व महाकाश यांचें

पृथक्करण करितां येत नाहीं, त्याप्रमाणें स्थूलदृष्टि प्राकृतांना ब्रह्म व ईश्वर यांचें पृथक्करण करितां येत नाहीं; म्हणजे ते त्यांचें ऐक्य पहातात.

**उपक्रमादिभिर्लिङ्गैस्तात्पर्यस्य विचारणात् ।**
**असङ्गं ब्रह्म मायावी सृजत्येष महेश्वरः ।।6-195।।**

उपक्रमादि तात्पर्यबोधक लिंगांवरुन तात्पर्याचा विचार केला असतां, ब्रह्म असंग आहे व हा मायावी महेश्वर सृष्टि करितो असें समजतें.

**सत्यं ज्ञानमनन्तं चेत्युपक्रम्योपसंहृतम् ।**
**यतो वाचो निवर्तन्त इत्यसङ्गत्वनिर्णयः ।।6-196।।**

' सत्यं ज्ञानं अनंतं ब्रह्म ' असा आरंभ करुन ' यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह । आनंदं ब्रह्मणो विद्वान् । न बिभेति कुतश्चन । ' असा शेवटीं उपसंहार केला आहे. त्यावरुन ब्रह्म असंग आहे असा निर्णय होतो.

**मायी सृजति विश्वं संनिरुद्धस्तत्र मायया ।**
**अन्य इत्यपरा ब्रूते श्रुतिस्तेनेश्वरः सृजेत् ।।6-197।।**

मायावी हें विश्व निर्मितो व त्यांत दुसरा मायेमुळें बद्ध होतो, असें दुसरी श्रुति सांगते. त्यामुळें ईश्वर सृष्टा होय.

**आनन्दमय ईशोऽयं बहुस्यामित्यवैक्षत ।**
**हिरण्यगर्भरुपोऽभूत्सुप्तिः स्वप्नो यथा भवेत् ।।6-198।।**

या आनंदमय ईश्वरानें ' मी पुष्कळ व्हावें ' असा विचार केला. व ज्याप्रमाणें सुषुप्ति स्वप्न होते त्याचप्रमाणें तो हिरण्यगर्भरुप झाला.

**क्रमेण युगपद्वैषा सृष्टिर्ज्ञेया यथाश्रुति ।**
**द्विविधाश्रुतिसद्भावात् द्विविधस्वप्नदर्शनात् ।।6-199।।**

दोन्ही प्रकारच्या श्रुति असल्यामुळें व दोन प्रकारचीं स्वप्नें पडत असल्यामुळें श्रुतीप्रमाणेंच क्रमानें किंवा एकदमहि सृष्टि उत्पन्न होते असें समजावें.

**सूत्रात्मा सूक्ष्मदेहाख्यः सर्वजीवघनात्मकः ।**
**सर्वाहंमानधारित्वात् क्रियाज्ञानादिशक्तिमान् ।।6-200।।**

सर्व जीवांच्या समुदायानें बनलेला व सूक्ष्मदेहसंज्ञक सूत्रात्मा सर्व व्यष्टिदेहाच्या ठिकाणीं अहंकार ठेवीत असल्यामुळें क्रिया, ज्ञान इत्यादि शक्तींनीं युक्त होतो.

**प्रत्यूषे वा प्रदोषे वा मग्नो मन्दे तमस्ययम् ।**
**लोकोभाति यथा तद्वदस्पष्टं जगदीक्ष्यते ।।6-201।।**

हा लोक उषःकालीं किंवा प्रदोषकालीं मन्द अंधकारांत निमग्न झाला असतां, जसा भासतो त्याप्रमाणें त्याकालीं हें जग अस्पष्ट दिसतें.

**सर्वतो लाञ्छितो मष्या यथा स्याद्घट्टितः पटः ।**
**सूक्ष्माकारैस्तथेशस्य वपुः सर्वत्र लाञ्छितम् ।।6-202।।**

ज्याप्रमाणें खळ लावलेला पट शाईनें चित्राच्या आकाराप्रमाणें आंखितात त्याप्रमाणें ईश्वराचें शरीर सूक्ष्म आकृतीनीं सर्वत्र चिन्हित होतें.

**सस्यं वा शाकजातं वा सर्वतोऽङ्कुरितं यथा ।**
**कोमलं तद्वदेवैष पेलवो जगदङ्कुरः ।।6-203।।**

ज्याप्रमाणें पूर्णपणें उगवलेलें धान्य किंवा वनस्पति कोमल असते, त्याचप्रमाणें हा जगाचा अंकुर अति कोमल असतो.

**आतपाभातलोको वा पटो वा वर्णपूरितः ।**
**सस्यं वा फलितं यद्वत्तथा स्पष्टवपुर्विराट् ।।6-204।।**

सूर्यप्रकाशानें स्पष्ट दिसणारा लोक, किंवा रंग भरलेला चित्रपट अथवा पिकलेलें धान्य जसें स्पष्टपणें भासतें, त्याप्रमाणें व्यक्त शरीरानें विराट भासूं लागतो.

**विश्वरुपाध्याय एष उक्तः सूक्तेऽपि पौरुषे ।**
**धात्रादिस्तम्बपर्यन्तानेतस्यावयवान्विदुः ।।6-205।।**

विश्वरुप अध्यायामध्यें व तसेंच पुरुषसूक्तांतहि याचेंच वर्णन केलेलें आहे. ब्रह्मादिस्तंबपर्यंत जेवढे म्हणून जीव आहेत तेवढे सर्वहि याचे अवयव आहेत असें पंडित समजतात.

**ईशसूत्रविराड्वेधोविष्णुरुद्रेन्द्र वन्हयः ।**
**विघ्नभैरवमैरालमारिकायक्षराक्षसाः ।।6-206।।**
**विप्रक्षत्रियविट्शूद्रा गवाश्वमृगपक्षिणः ।**
**अश्वत्थवटचूताद्या यवब्रीहितृणादयः ।।6-207।।**
**जलपाषाणमृत्काष्ठवास्याकुद्दालकादयः ।**
**ईश्वराः सर्व एवै ते पूजिताः फलदायिनः ।।6-208।।**

मायावी, सूत्रात्मा, विराट्, ब्रह्मदेव, विष्णु, शिव, इंद्र, अग्नि, गजानन, भैरव, मैराल, मारिका (देवी ), यक्ष, राक्षस, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, गाय, घोडा, मृग, पक्षी, पिंपळ, वड, आंबा, यव, तांदूळ, गवत, उदक, पाषाण, मृत्तिका, लांकूड, सुताराचा वांकस, कुदळ इत्यादि हे सर्वहि

ईश्वर होत. व त्यांची पूजा केली असतां, ते फल देतात.

**यथा यथोपासते तं फलमीयुस्तथा तथा ।**
**फलोत्कर्षापकर्षौ तु पूज्यपूजानुसारतः ।।6-209।।**

त्याची जशी जशी उपासना करितात तसें तसें प्राण्यांना फल मिळतें. पण दैवत व भक्ति यांच्या अनुरोधानें फलामध्यें उत्तमाधम भाव येतो.

**मुक्तिस्तु ब्रह्मतत्त्वस्य ज्ञानादेवा न चान्यथा ।**
**स्वप्रबोधं विना नैव स्वस्वप्नो हीयते यथा ।।6-210।।**

जसें स्वतः जागें झाल्यावाचून स्वतः पहात असलेलें स्वप्न नष्ट होत नाहीं त्याप्रमाणें मुक्ति ब्रह्मतत्त्वाच्या ज्ञानानेंच मिळेल अन्य कशानेंहि मिळणार नाहीं.

**अद्वितीयब्रह्मतत्त्वे स्वप्नोऽयमखिलं जगत् ।**
**ईशजीवादिरुपेण चेतनाचेतनात्मकम् ।।6-211।।**

ईश्वर, जीव इत्यादि रुपानें जें हें जडचैतन्यरुप सर्व जग आहे, तें अद्वितीय अशा ब्रह्मतत्त्वाचा साक्षात्कार झाला असतां, स्वप्न होतें.

**आनन्दमयविज्ञानमयावीश्वरजीवकौ ।**
**मायया कल्पितावेतौ ताभ्यां सर्वं प्रकल्पितम् ।।6-212।।**

आनंदमय कोश व विज्ञानमय कोश हेच ईश्वर व जीव होत. हे उभयतांही मायेनें कल्पिलेले आहेत; व त्यांनी पुढें हें सर्व जग कल्पिलेलें आहे.

**ईक्षणादि प्रवेशान्ता सृष्टिरीशेन कल्पिता ।**
**जाग्रदादिविमोक्षान्तः संसारो जीवकल्पितः ।।6-213।।**

ईश्वरानें बहु व्हावें या विचारापासून भूतादि निर्माण करुन त्यांत प्रवेश करेपर्यंत सृष्टी केली व जाग्रतावस्थेपासून मोक्षापर्यंत जो संसार तो जीवानें कल्पिला आहे.

**अद्वितीयं ब्रह्मतत्त्वमसङ्गं तन्न जानते ।**
**जीवेशयोर्मायिकयोर्वृथैव कलहं ययुः ।।6-214।।**

अप्रत्यक्ष- द्वैतशून्य व असंग असें जें ब्रह्मतत्व त्याला न जाणल्यामुळें मायिक अशा जीवेश्वरांविषयीं ते व्यर्थच कलह करीत आहेत.

**ज्ञात्वा सदा तत्त्वनिष्ठाननुमोदामहे वयम् ।**
**अनुशोचाम एवान्यान्न भ्रान्तेर्विवदामहे ।।6-215।।**

आम्ही तत्त्वनिष्ठ पुरुषाला ओळखून सर्वदा त्याला आनंदानें अनुमोदन देतों,

पण भ्रांतीमुळें अज्ञ राहिलेल्या पुरुषांविषयीं आम्हांला खेद जरी होतो, तरी त्याच्याशीं आम्ही वाद करीत बसत नाहीं.

**तृणार्चकादियोगान्ता ईश्वरे भ्रान्तिमाश्रिताः ।**
**लोकायतादिसांख्यान्ता जीवे विभ्रान्तिमाश्रिताः ।।6-216।।**

तृणाची पूजा करणा-यांपासून योग्यांपर्यंत जेवढे वादी पूर्वी सांगितले आहेत, तेवढे ते सर्वहि ईश्वराविषयीं भ्रमिष्ट झाले आहेत व चार्वाकापासून सांख्यापर्यंत जेवढे वादी तेवढे ते सर्वहि जीवाविषयीं भ्रमिष्ट आहेत.

**अद्वितीयब्रह्मतत्त्वं न जानन्ति यदा तदा ।**
**भ्रान्ता एवाखिलास्तेषां क्व मुक्तिः क्वेह वा सुखम् ।।6-217।।**

ज्यापेक्षां अद्वितीय असें हें ब्रह्मतत्व ते जाणत नाहींत, त्यापेक्षां ते सर्व भ्रान्तच होत. अशा भ्रान्तांना मुक्ति कोठून मिळणार ? किंवा ऐहिक सुख तरी कोठचें आलें आहे ?

**उत्तमाधमभावश्चेत्तेषां स्यादस्तु तेन किम् ।**
**स्वप्नस्थराज्यभिक्षाभ्यां न बुद्धः स्पृश्यते खलु ।।6-218।।**

त्यांच्यांतसुद्धां ( बुद्धिद्वारा ) उत्तमकनिष्ठ भाव येतो असें जर म्हणाल तर तो येईना बिचारा ! त्याच्या योगानें काय होणार आहे ! जागृत झालेला पुरुष स्वप्नांतील राज्य किंवा भिक्षा यांच्या योगानें लिप्त होत नाहीं, हें प्रसिद्धच आहे.

**तस्मान्मुमुक्षिभिर्नैव मतिर्जीवेशवादयोः ।**
**कार्या किंतु ब्रह्मतत्त्वं विचार्यं बुध्यतां च तत् ।।6-219।।**

त्याअर्थी मुमुक्षु पुरुषांनीं जीव व ईश्वर यांच्या वादामध्यें बुद्धीला सक्त होऊं देऊं नये, तर ब्रह्मतत्त्वाचा विचार करावा, व तें जाणावें.

**पूर्वपक्षतया तौ चेत्तत्त्वनिश्चयहेतुताम् ।**
**प्राप्नुतोऽस्तु निमज्जस्व तयोर्नैतावताऽवशः ।।6-220।।**

ते जीवेश्वरवाद पूर्वपक्ष या भावानें तत्त्वनिश्चयाला उपकारक होतात, असें जर तुझें म्हणणें असेल तर तें ठीक आहे. पण तेवढ्यावरुन परतंत्र होऊन तूं त्यांतच निमग्न होऊं नकोस.

**असङ्गचिद्विभुर्जीवः सांख्योक्तस्तादृगीश्वरः ।**
**योगोक्तस्तत्त्वमोरर्थौ शुद्धौ ताविति चेच्छृणु ।।6-221।।**

जीव हा असंग चैतन्यरुप विभु आहे असें सांख्यशास्त्रांत सांगितलें आहे, व

ईश्वर तसाच आहे, असें योगशास्त्रांत सांगितलें आहे. तेच तुमचे तत् व त्वं यांचे शुद्ध अर्थ आहेत, असें जर म्हणशील तर ऐक.

**न तत्त्वमोरुभावर्थावस्मत्सिद्धान्ततां गतौ ।**
**अद्वैतबोधनायैव सा कक्षा काचिदिष्यते ।।6-222।।**

तत् व त्वं यांचे दोन्ही अर्थ आमच्या सिद्धान्ताचे विषय नाहींत. कारण अद्वैतसाक्षात्कार होण्याकरितांच केवल ती एक आम्ही मर्यादा केली आहे.

**अनादिमायया भ्रान्ता जीवेशौ सुविलक्षणौ ।**
**मन्यन्ते तद्व्युदासाय केवलं शोधनं तयोः ।।6-223।।**

जे कारणशून्य मायेनें भ्रमिष्ट होतात, ते जीव व ईश्वर हे अत्यन्त भिन्न आहेत असें मानितात. यास्तव केवल
त्यांचा निरास करण्याकरितां आम्हीं त्यांचें शोधन करितों.

**अत एवात्र दृष्टान्तो योग्यः प्राक् सम्यगीरितः ।**
**घटाकाशमहाकाशजलाकाशाभ्रखात्मकः ।।6-224।।**

म्हणूनच या ठिकाणीं पूर्वीं स्पष्टपणें सांगितलेला घटाकाशादिरुप दृष्टान्त योग्य होतो.

**जलाभ्रोपाध्यधीने ते जलाकाशाभ्रखे तयोः ।**
**आधारौ तु घटाकाशमहाकाशौ सुनिर्मलौ ।।6-225।।**

तें जलाकाश व अभ्राकाश या नांवाचें द्विविध आकाश जल व अभ्र या उपाधींच्या आधीन असतें, पण त्या द्विविध आकाशाचे जे जे दोन घटाकाश व महाकाश नांवाचे आधार, ते अति निर्मल असतात.

**एवमानन्दविज्ञानमयौ मायाधियोर्वशौ ।**
**तदधिष्ठानकूटस्थब्रह्मणी तु सुनिर्मले ।।6-226।।**

त्याप्रमाणेंच हे आनंदमय व विज्ञानमय कोश अनुक्रमें माया व बुद्धि यांच्या आधीन रहातात. पण त्याचें अधिष्ठान जें कूटस्थ व ब्रह्म तें अत्यंन्त निर्मल असतें.

**एतत्कक्षोपयोगेन सांख्ययोगौ मतौ यदि ।**
**देहोऽन्नमयकक्षत्वादात्मत्वेनाभ्युपेयताम् ।।6-227।।**

जर या कक्षेच्या उपयोगाकरितां सांख्य व योग यांचा स्वीकार करावयाचा असेल तर अन्नमय ही सुद्धां एक कक्षा असल्यामुळें देह शुद्ध आत्मा आहे, हें चार्वाकमतही स्वीकारावयास काय प्रत्यवाय आहे ?

**आत्मभेदो जगत्सत्यमीशोऽन्यः इति चेत्त्रयम् ।**
**त्यज्यते तैस्तदा सांख्ययोगवेदान्तसंमतिः ।।6-228।।**

आत्म्याचा भेद, जगाचें सत्यत्व व ईश्वराचें अन्यत्व हीं तीन मतें त्यांनीं टाकिलीं कीं सांख्य योग व वेदान्त यांचें एकमत होतें.

**जीवोऽसङ्गत्वमात्रेण कृतार्थ इति चेत्तदा ।**
**स्रक्चन्दनादिनित्यत्वमात्रेणापि कृतार्थता ।।6-229।।**

जीव हा ' पुरुष असंग आहे ' असें ज्ञान झाल्यानेंच जर कृतार्थ होत असेल, तर पुष्पमाला, चंदन इत्यादि पदार्थ नित्य आहेत असें समजल्यानेंहि कृतार्थ होईल.

**यथास्रगादिनित्यत्वं दुःसम्पाद्यं तथाऽऽत्मनः ।**
**असङ्गत्वं न सम्भाव्यं जीवतोर्जगदीशयोः ।।6-230।।**

ज्याप्रमाणें माला इत्यादिरुप जगाचें नित्यत्व सिद्ध करणें अति कठिण आहे, त्याप्रमाणेंच जग व ईश्वर हे अस्तित्वांत आहेत, तों आत्म्याचें असंगत्व सिद्ध होणें शक्य नाहीं.

**अवश्यं प्रकृतिः सङ्गं पुरेवापादयेत्तथा ।**
**नियच्छत्येतमीशोऽपि कोऽस्य मोक्षस्तथा सति ।।6-231।।**

प्रकृतिहि पूर्वींप्रमाणेंच त्याला आसक्त करील व तसेंच ईश्वरहि त्याचें नियमन करील; आणि तसें झालें असतां याचा मोक्ष कोठचा ?

**अविवेककृतःसङ्गो नियमश्चेति चेत्तदा ।**
**बलादापतितो मायावादः सांख्यस्य दुर्मतेः ।।6-232।।**

संग व नियमन हीं अविवेकामुळें होतात असें जर म्हणावें तर दुर्बुद्धि सांख्याला मायावाद बलात्कारानें स्वीकारावा लागेल.

**बन्धमोक्षव्यवस्थार्थमात्मनानात्वमिष्यताम् ।**
**इति चेन्न यतो माया व्यवस्थापयितुं क्षमा ।।6-233।।**

बंध व मोक्ष यांची सयुक्तिपणें व्यवस्था लागण्याकरितां आत्मे अनेक आहेत असें स्वीकारावें असें जर म्हणशील तर तें अयोग्य आहे. कारण माया त्यांची व्यवस्था करण्यास समर्थ आहे.

**दुर्घटं घटयामीति विरुद्धं किंन्न पश्यसि ।**
**वास्तवौ बन्धमोक्षौ तु श्रुतिर्न सहतेतराम् ।।6-234।।**

दुर्घट प्रकारहि मी घडवितें असा विरुद्ध प्रकार ( इंद्रजालादिकांत ) पहात

नाहींस का ? श्रुतीला तर बंधमोक्ष खरे आहेत हें म्हणणें यत्किंचितहि खपत नाहीं.

**न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः ।**
**न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता ।।6-235।।**

नाश, उत्पत्ति, बद्धप्राणि, साधक, मुमुक्षु, मुक्त इत्यादि वस्तुतः कांहीं एक नाहीं. व हाच खरा प्रकार आहे.

**मायाख्यायाः कामधेनोर्वत्सौ जीवेश्वरावुभौ ।**
**यथेच्छं पिबतां द्वैतं तत्त्वं त्वद्वैतमेव हि ।।6-236।।**

मायासंज्ञक कामधेनूचीं जीव व ईश्वर हीं दोन वासरें आहेत. यास्तव तीं द्वैताचा यथेच्छ उपभोग घेवोत; पण खरोखरच जर तत्त्व पाहिजे असेल, तर तें अद्वैतच होय.

**कूटस्थब्रह्मणोर्भेदो नाममात्रादृते न हि ।**
**घटाकाशमहाकाशौ वियुज्येते न हि क्वचित् ।।6-237।।**

केवल नांवावांचून कूटस्थ व ब्रह्म यांचा भेद होत नाहीं; कारण घटाकाश व महाकाश यांचा कधींच वियोग होत नाहीं.

**यदद्वैतं श्रुतं सृष्टेः प्राक्तदेवाद्य चोपरि ।**
**मुक्तवपि वृथा माया भ्रामयत्यखिलाञ्जनान् ।।6-238।।**

जें सृष्टीच्या पूर्वी अद्वैत होतें असें श्रुतींत ही सांगितलेलें आहे, तेंच आज आहे व तेंच पुढें मुक्तिकालींहि असणार. असें जरी आहे, तरी ही माया ह्या सर्व लोकांना व्यर्थ भ्रमांत पाडिते.

**ये वदन्तीत्थमेतेऽपि भ्राम्यन्तेऽविद्ययाऽत्र किम् ।**
**न यथापूर्वमेतेषामत्र भ्रान्तेरदर्शनात् ।।6-239।।**

असें बोलतात तेसुद्धां अविद्येच्या योगानें भ्रान्त होतात. मग तत्त्वज्ञानांतच काय आहे ! असें नाहीं. ते पूर्वींप्रमाणेंच भ्रान्त होत नाहींत; कारण त्यांच्याठिकाणीं द्वैत व अद्वैत याविषयीं भ्रान्ति दिसत नसते.

**ऐहिकामुष्मिकः सर्वः संसारो वास्तवस्ततः ।**
**न भाति नास्ति चाद्वैतमित्यज्ञानिविनिश्चयः ।।6-240।।**

सर्वहि ऐहिक व पारलौकिक संसार खरा आहे त्यामुळें अद्वैत भासत नाहीं म्हणून तें नाहींच असा अज्ञान्यांचा निश्चय असतो.

**ज्ञानिनो विपरीतोऽस्मान्निश्चयः सम्यगीक्ष्यते ।**

**स्वस्वनिश्चयतो बद्धो मुक्तोऽहं चेति मन्यते ||6-241||**

ज्ञान्यांचा निश्चय याहून निराळा असतो. ते खरें खरें जाणतात; आणि आपापल्या निश्चयानेंच मी बद्ध आहें, मी मुक्त आहें, असें मानतात.

**नाद्वैतमपरोक्षं चेन्न चिद्रूपेण भासनात् ।**
**अशेषेण न भातं चेत् द्वैतं किं भासतेऽखिलम् ||6-242||**

अद्वैताचा अनुभव येत नाहीं असें जर म्हणशील, तर तें योग्य नव्हे; कारण चिद्रूपानें तें प्रत्यक्ष प्रत्ययाला येत आहे. आतां तें संपूर्णपणें प्रत्ययाला येत नाहीं, असें जर म्हणशील तर द्वैत तरी सर्व भासतें का !

**दिङ्मात्रेण विभानं तु द्वयोरपि समं खलु ।**
**द्वैतसिद्धिवदद्वैतसिद्धिस्ते तावता न किम् ||6-243||**

एकदेशी ज्ञान तर दोघांचेंही खरोखर सारखेंच आहे. मग तेवढ्यानें द्वैतसिद्धीप्रमाणें अद्वैतसिद्धि कां नाहीं होणार ?

**द्वैतेन हीनमद्वैतं द्वैतज्ञाने कथं त्विदम् ।**
**चिद्भानं त्वविरोध्यस्य द्वैतस्यातोऽसमेउभे ||6-244||**

जें द्वैतशून्य तें अद्वैत. मग द्वैतज्ञान असतांना हें अद्वैतज्ञान कसें होणार ! चैतन्यभान तर ह्या द्वैताच्या विरुद्ध नाहीं. तस्मात् हीं दोन्हीं भानें सारखीं नाहींत.

**एवं तर्हि शृणु द्वैतमसन्मायामयत्वतः ।**
**तेन वास्तवमद्वैतं परिशेषाद्विभासते ||6-245||**

असें जर म्हणतोस तर आतां ऐक. द्वैत हें मायामय असल्यामुळें खोटें आहे, त्यामुळें अवशिष्ट राहणारें खरें अद्वैत भासतें.

**अचिन्त्यरचनारुपं मायैव सकलं जगत् ।**
**इति निश्चित्य वस्तुत्वमद्वैते परिशेष्यताम् ||6-246||**

अचिन्त्य रचना आहे ज्याची असें हें सर्व जग मायाच आहे असा निश्चय करुन अद्वैताच्या ठिकाणींच वस्तुत्व आहे असें ठरवावें.

**पुनर्द्वैतस्य वस्तुत्वं भाति चेत्त्वं तथा पुनः ।**
**परिशीलय को वाऽत्र प्रयासस्तेन ते वद ||6-247||**

द्वैताचें वस्तुत्व पुनः भासेल तर तूं पुनरपि तसेंच ( द्वैत खोटें व अद्वैत खरें असें ) परिशीलन कर. असें केल्यामुळें तुला त्यांत काय श्रम होणार आहेत ? सांग.

**कियन्तं कालमिति चेत् खेदोऽयं द्वैत इष्यताम् ।**
**अद्वैते तु न युक्तोऽयं सर्वानार्थनिवारणात् ।।6-248।।**

असा हा विचार किती दिवस आम्ही करीत रहावें ! म्हणून जर विचाराल तर असा खेद द्वैताविषयीं करावा. कारण अद्वैतावस्थेंत सर्व अनर्थाची निवृत्ति होत असल्यामुळें अद्वैताविषयीं तो करणें युक्त नाहीं.

**क्षुत्पिपासादयो दृष्टा यथापूर्वं मयीति चेत् ।**
**मच्छब्दवाच्येऽहङ्कारे दृशतां नेति को वदेत् ।।6-249।।**

क्षुधा, तृषा इत्यादि भाव, माझ्याठिकाणीं पूर्वीप्रमाणेंच भासतात असें जर म्हणशील, तर ' अहं ' याशब्दानें ज्ञात होणारा जो अहंकार त्याच्या ठिकाणीं ते दिसेनात ! त्याला नाहीं कोण म्हणतें !

**चिद्रुपेऽपि प्रसज्येरंस्तादात्म्याध्यासतो यदि ।**
**माऽध्यासं कुरु किं तु त्वं विवेकं कुरु सर्वदा ।।6-250।।**

उभयतांचें ऐक्य भासूं लागल्यामुळें जर चिदात्म्याच्या ठिकाणीं ते भाव प्रसक्त होऊं लागले, तर तादात्म्यरुप अध्यास होऊं देऊं नको आणि सर्वदा त्यांचें विचारानें पृथक्करण कर.

**झटित्यध्यास आयाति दृढवासनयेति चेत् ।**
**आवर्तयेद्विवेकं च दृढं वासयितुं सदा ।।6-251।।**

दृढ वासनेच्या योगानें अध्यास एकाएकीं होतो, असें जर म्हणणें असेल तर त्याची निवृत्ति दृढ होण्याकरितां सर्वदा विवेक करावा.

**विवेके द्वैतमिथ्यात्वं युक्त्यैवेति न भण्यताम् ।**
**अचिन्त्यरचनात्वस्यानुभुतिर्हि स्वसाक्षिकी ।।6-252।।**

विवेक केल्यावरसुद्धां द्वैतमिथ्या आहे असें जें वाटतें तें तरी युक्तीनेंच कीं नाहीं ? असें म्हणूं नये. कारण ह्या द्वैताची रचना अचिंत्य आहे. अशा त-हेचा अनुभव स्वतःला येत असतो.

**चिदप्यचिन्त्यरचना यदि तर्ह्यस्तु नो वयम् ।**
**चितिं सुचिन्त्यरचनां ब्रूमो नित्यत्वकारणात् ।।6-253।।**

जर चैतन्याचीसुद्धां अचिन्त्य रचनाच आहे असें म्हणशील, तर ती असेना ? नित्यत्वामुळें आम्ही चैतन्याची सहज विचार करितां येण्यासारखी रचना आहे असें म्हणत नाहीं.

**प्रागभावो नानुभूतश्चितेर्नित्या ततश्चितिः ।**

**द्वैतस्य प्रागभावस्तु चैतन्येनानुभूयते ।।6-254।।**

ज्या अर्थी चैतन्याचा प्रागभाव ( पूर्वीं नसणें ) कोणीहि पाहिलेला नाहीं; त्या अर्थी तें नित्य आहे. द्वैताच्या प्रागभावाचा तर चैतन्याला अनुभव येतो.

**प्रागभावयुतं द्वैतं रच्यते हि घटादिवत् ।**
**तथापि रचनाऽचिन्त्या मिथ्या तेनेन्द्रजालवत् ।।6-255।।**

प्रागभावानें युक्त असलेल्या द्वैताची घटाप्रमाणें रचना होते. हें प्रसिद्धच आहे. पण त्याची रचना अचिन्त्य आहे म्हणून इंद्रजालाप्रमाणें तें खोटें असें ठरतें.

**चित्प्रत्यक्षा ततोऽन्यस्य मिथ्यात्वं चानुभूयते ।**
**नाद्वैतमपरोक्षं चेत्येतन्न व्याहतं कथम् ।।6-256।।**

चैतन्य प्रत्यक्ष आहे व अन्य सर्व मिथ्या आहे असा अनुभव येतो मग अद्वैत अपरोक्ष नाहीं असें जें बोलणें तें व्याहत ( खंडित ) कसें होणार नाहीं !

**इत्थं ज्ञात्वाऽप्यसन्तुष्टाः केचित्कुत इतीर्यताम् ।**
**चार्वाकादेः प्रबुद्धस्याप्यात्मा देहः कुतो वद ।।6-257।।**

असें जाणूनहि कांहीं अतृप्त कां असतात तें सांगा, असें जर म्हणाल तर ऊहापोहकुशल अशाहि चार्वाकादिकाला देह आत्मा, हें कां वाटतें सांग.

**सम्यग्विचारो नास्त्यस्य धीदोषादिति चेत्तथा ।**
**असन्तुष्टास्तु शास्त्रार्थं न त्वैक्षन्त विशेषतः ।।6-258।।**

याच्या बुद्धिदोषामुळें उत्तम विचार नाहीं असें जर म्हणशील तर त्याचप्रमाणें असंतुष्ट रहाणारे लोक बुद्धिदोषामुळें शास्त्रार्थ विशेषतः जाणत नाहींतच.

**यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः ।**
**इति श्रौतं फलं दृष्टं नेति चेद्दृष्टमेव तत् ।।6-259।।**

या पुरुषाच्या हृदयाचा आश्रय करुन राहिलेल्या ज्या तृष्णा असतात, त्या जेव्हां सर्व निवृत्त होतात इत्यादि श्रुतिप्रतिपादित फल दृष्ट ( या लोकीं अनुभवास येणारें ) नाहीं, असें जर म्हणशील, तर आम्ही सांगतों कीं तें दृष्टच आहे.

**यदा सर्वे प्रभिद्यन्ते हृदयग्रन्थयस्त्विति ।**
**कामा ग्रन्थिस्वरुपेण व्याख्याता वाक्यशेषतः ।।6-260।।**

' जेव्हां सर्व हृदयग्रंथी नष्ट होतात ' ह्या वाक्यशेषानें तर कामांचें

ग्रंथिस्वरुपानें व्याख्यान केलें आहे.

**अहङ्कारचिदात्मानावेकीकृत्याविवेकतः ।**
**इदं मे स्यादिदं मे स्यादितीच्छाः कामशब्दिताः ।।6-261।।**

अविवेकाच्या योगानें अहंकार व चिदात्मा यांचें ऐक्य करुन हें मला असावें याची मला प्राप्ति व्हावी, अशा प्रकाराच्या ज्या इच्छा त्यांनाच काम हें नांव आहे.

**अप्रवेश्य चिदात्मानं पृथक् पश्यन्नहङ्कृतिम् ।**
**इच्छंस्तु कोटिवस्तूनि न बाधो ग्रन्थिभेदतः ।।6-262।।**

चिदात्म्यास अहंकारांत प्रविष्ट न करितां अहंकारास पृथक् पहाणा-या पुरुषानें कोट्यवधि वस्तूंची जरी इच्छा केली, तरी ग्रंथिभेद झालेला असल्यामुळें कांहीं बाध नाहीं.

**ग्रन्थिभेदेऽपि सम्भाव्या इच्छाः प्रारब्धदोषतः ।**
**बुध्वाऽपि पापबाहुल्यादसन्तोषो यथा तव ।।6-263।।**

जसें ज्ञान झाल्यावरहि पुष्कळ पापामुळें तुझ्या ( मतानें ) असंतोष राहतो, त्याचप्रमाणें ग्रंथीचा भेद झाल्यावरहि प्रारब्ध दोषांमुळें इच्छा संभवनीय आहेत.

**अहङ्कारगतेच्छाद्यैर्देहव्याध्यादिभिस्तथा ।**
**वृक्षादिजन्मनाशैर्वा चिद्रूपात्मनि किं भवेत् ।।6-264।।**

ज्याप्रमाणें देहस्थ व्याधि इत्यादिकांच्या योगानें अथवा वृक्षादि जन्मनाशाच्या योगानें ( कांहीं होत नाहीं, ) त्याप्रमाणें अहंकारगत इच्छादिकांच्या योगानें तरी विदूषित आत्म्याच्या ठिकाणीं काय होणार ?

**ग्रन्थिभेदात्पुराऽप्येवमिति चेत्तन्न विस्मर ।**
**अयमेव ग्रन्थिभेदस्तव तेन कृती भवान् ।।6-265।।**

ग्रंथीचा भेद होण्याच्या पूर्वींसुद्धां असेंच आहे असें जर म्हणशील, तर तें विसरुं नको. हाच तुझा ग्रंथिभेद होय, व त्यामुळें तूं कृतकृत्य झालास.

**नैवं जानन्ति मूढाश्चेत्सोऽयं ग्रन्थिर्न चापरः ।**
**ग्रन्थितत्भेदमात्रेण वैषम्यं मूढबुद्धयोः ।।6-266।।**

मूढ पुरुष असें जाणत नाहींत असें जर म्हणाल तर तोच हा ग्रंथि आहे अन्य कोणी नव्हे; आणि मूढ व ज्ञानी यांच्यामध्यें ग्रंथी व तिचा भेद एवढ्यावरुनच वैषम्य येतें.

**प्रवृत्तौ वा निवृत्तौ वा देहेन्द्रियमनोधियाम् ।**

**न किंचिदपि वैषम्यमस्त्यज्ञानिविबुद्धयोः ।।6-267।।**

देह, इंद्रियें, मन व बुद्धि यांच्या प्रवृत्तिकालीं किंवा निवृत्ति कालीं अज्ञानी व ज्ञानी यांमध्यें थोडेसेंहि अंतर पडत नाहीं.

**व्रात्यश्रोत्रिययोर्वेदपाठापाठकृता भिदा ।**
**नाहारादावस्ति भेदः सोऽयं न्यायोऽत्र योज्यताम् ।।6-268।।**

पतित ब्राह्मण व श्रोत्रिय यांच्यामध्यें वेदाचें अपठण व पठण यांच्यामुळेंच भेद पडतो. यांच्या आहारादिकांत कांहीं भेद नसतो. तोच न्याय या ठिकाणीं योजावा.

**न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ।**
**उदासीनवदासीन इति ग्रन्थिभिदोच्यते ।।6-269।।**

दुःखाची प्राप्ति झाली असतां त्याचा द्वेष करीत नाहीं व सुखाची निवृत्ति झाली असतां त्याची इच्छा करीत नाहीं. तर उदासीनासारखा राहतो. या वाक्यानें ग्रंथीचा भेदच सांगितला आहे.

**औदासिन्यं विधेयं चेद्वच्छब्दव्यर्थता तदा ।**
**न शक्ता अस्य देहाद्या इति चेद्रोग एव सः ।।6-270।।**

उदासीनतेचें विधान केलें आहे असें जर म्हणावें, तर, ' वत् ' हा शब्द व्यर्थ होतो. याचे देहादि ( ज्ञानानंतर ) अशक्त होतात, असें जर म्हणशील तर तो रोगच होय.

**तत्त्वबोधं क्षयं व्याधिं मन्यन्ते ये महाधियः ।**
**तेषं प्रज्ञाऽतिविशदा किं तेषां दुःशकं वद ।।6-271।।**

जे प्रचंड बुद्धिमान् तत्त्वबोध हा क्षय किंवा रोग समजतात, त्यांची बुद्धि फार निर्मल ! ! त्यांना काय अशक्य आहे सांग पाहूं ?

**भरतादेरप्रवृत्तिः पुराणोक्तेति चेत्तदा ।**
**जक्षन् क्रीडन् रतिं विन्दन्नित्यश्रौषीर्न किं श्रुतिम् ।।6-272।।**

भरतादिकांची अप्रवृत्ति पुराणांमध्यें सांगितली आहे असें जर म्हणाल, तर भक्षण करीत, क्रीडा करीत, व स्त्रियांशीं करमणूक करीत इत्यादि श्रुति तूं ऐकिल्या नाहींस का ?

**न ह्याहारादि सन्त्यज्य भरताद्याः स्थिताः क्वचित् ।**
**काष्ठपाषाणवत्किन्तु सङ्गभीता उदासते ।।6-273।।**

कारण, भरतादिक आहारादिकांचा त्याग करुन काष्ठ व पाषाणांप्रमाणे

कधींच राहिलेले नाहींत. परंतु संसर्गाला भिऊन ते उदास रहात होते.

**सङ्गी हि बाध्यते लोके निःसङ्गः सुखमश्नुते ।**
**तेन सङ्गः परित्याज्यः सर्वदा सुखमिच्छता ||6-274||**

कारण, आसक्त रहाणा-या पुरुषाला व्यवहारांत पीडा होते. व निस्पृहाला सुख मिळतें. ( असा अनुभव येतो. ) यास्तव सुखेच्छु पुरुषानें सतत सर्वसंगपरित्याग करावा.

**अज्ञात्वा शास्त्रहृदयं मूढो वक्त्यन्यथाऽन्यथा ।**
**मूर्खाणां निर्णयस्त्वास्तास्मत्सिद्धान्त उच्यते ||6-275||**

शास्त्ररहस्य न जाणतां मूर्ख भलभलतेंच बोलत असतो. पण मूर्खांचा निर्णय राहूंदे. आतां आम्ही आमचा सिद्धांत सांगतों.

**वैराग्यबोधोपरमाः सहायास्ते परस्परम् ।**
**प्रायेण सह वर्तन्ते वियुज्यन्ते क्वचित् क्वचित् ||6-276||**

वैराग्य, बोध व शांति हे भाव एकमेकांला सहाय्य करीत असतात. ते बहुतकरुन बरोबर रहातात व केव्हां केव्हां त्यांचा वियोग होतो.

**हेतुस्वरुपकार्याणि भिन्नान्येषामसंकरः ।**
**यथावदवगन्तव्यः शास्त्रार्थं प्रविचिन्वता ||6-277||**

ज्या अर्थी यांचे हेतु, स्वरुपें व कार्यें भिन्न भिन्न आहेत, त्या अर्थी त्यांचा असंकर ( भिन्नता ) आहे; तो शास्त्रार्थाचें प्रमाणतः शोधन करणा-या मुमुक्षूनें योग्य प्रकारें जाणावा.

**दोषदृष्टिर्जिहासा च पुनर्भोगेष्वदीनता ।**
**असाधारणहेत्वाद्या वैराग्यस्य त्रयोप्यऽमी ||6-278||**

दोषांविषयीं चिंतन, त्याग करण्याची इच्छा व पुनः भोगांविषयीं अदीनता हे वैराग्याचे तिन्ही असाधारण हेत्वांदिक आहेत.

**श्रवणादित्रयं तद्वत्तत्त्वमिथ्याविवेचनम् ।**
**पुनर्ग्रन्थेरनुदयो बोधस्यैते त्रयो मताः ||6-279||**

श्रवणादि साधनत्रय, तसेंच सत्यमिथ्या यांचें विवेचन व हृदय ग्रंथींचा पुनरपि उदय न होणें हीं तीन बोधाचीं कारणादि आहेत.

**यमादिर्धीनिरोधश्च व्यवहारस्य संक्षयः ।**
**स्युर्हेत्वाद्या उपरतेरित्यसंकर ईरितः ||6-280||**

यमनियमादि, वृत्तीचा निरोध व व्यवहाराचा बाध हे उपरतीचे हेत्वादिक

आहेत. यास्तव त्यांचा ( वैराग्यादिकांचा ) असंकर सांगितला आहे.

**तत्त्वबोधः प्रधानं स्यात् साक्षान्मोक्षप्रदत्वतः ।**
**बोधोपकारिणावेतौ वैराग्योपरमावुभौ ।।6-281।।**

साक्षात् मोक्षप्राप्ति करुन देत असल्यामुळें तत्त्वबोध यांत मुख्य आहे. वैराग्य आणि उपरम हे दोन भाव ज्ञानोपकारक आहेत.

**त्रयोऽप्यत्यन्तपक्वाश्चेन्महतस्तपसः फलम् ।**
**दुरितेन क्वचित्किंचित्कदाचित्प्रतिबध्यते ।।6-282।।**

हे तिन्ही अत्यंत परिपक्व अवस्थेंत असणें हें मोठ्या तपाचें फल आहे. पण कोठें एखाद्या स्थलीं कांहीं निमित्तानें व केव्हां केव्हांच त्यांना दुष्कृतामुळें प्रतिबंध होतो.

**वैराग्योपरती पूर्णे बोधस्तु प्रतिबध्यते ।**
**यस्य तस्य न मोक्षोऽस्ति पुण्य लोकस्तपोबलात् ।।6-283।।**

ज्याची वैराग्य व शांति मात्र पूर्ण असून ज्ञान प्रतिबद्ध झालेलें असतें, त्याला मोक्ष मिळत नाहीं, तर तपाच्या सामर्थ्यानें पुण्यलोक प्राप्ति होते.

**पूर्णे बोधे तदन्यौ द्वौ प्रतिबद्धौ यदा तदा ।**
**मोक्षो विनिश्चितः किन्तु दृष्टदुःखं न नश्यति ।।6-284।।**

जेव्हां ज्ञान पूर्ण असून त्यांहून इतर जे दोन भाग ( वैराग्य व शांति ते, प्रतिबद्ध होतात, तेव्हां मोक्ष निश्चयानें मिळतो; पण ऐहिक दुःखांचा नाश होत नाहीं.

**ब्रह्मलोकतृणीकारो वैराग्यस्यावधिर्मतः ।**
**देहात्मवत् परात्मत्वदार्ढ्ये बोधः समाप्यते ।।6-285।।**
**सुप्तिवद्विस्मृतिः सीमा भवेदुपरम्यस्य हि ।**
**दिशाऽनया विनिश्चेयं तारतम्यमवान्तरम् ।।6-286।।**

ब्रह्मलोक तृणासारखा मानणें ही वैराग्याची सीमा मानलेली आहे; तसेंच देहात्मभावनेप्रमाणें परात्म्याविषयीं दृढ भावना झाली कीं बोध संपला; आणि निद्रेंतील विस्मृतीप्रमाणें सर्वांची विस्मृति होणें ही शांतीची सीमा आहे; या दिशेनें इतर तारतम्यांविषयीं निश्चय करावा.

**आरब्धकर्मनानात्वाद्बुद्धानामन्यथाऽन्यथा ।**
**वर्तनं तेन शास्त्रार्थे भ्रमितव्यं न पण्डितैः ।।6-287।।**

प्रारब्धगति नानाप्रकारची असल्यामुळें त्याचें वर्तन नानाप्रकारें होत असतें; पण त्यामुळें शाहाण्यांनीं शास्त्रार्थाविषयीं भ्रमिष्ट होणें युक्त नव्हे.

**स्वस्वकर्मानुसारेण वर्त्तन्तां ते यथा तथा ।**
**अविशिष्टः सर्वबोधः समा मुक्तिरिति स्थितिः ।।6-288।।**

आपापल्या कर्मानुरुप ते कसेंहि वर्तन करोत. सर्वांतर्यामी ब्रह्म मी आहें, हें ज्ञान एकाकार आहे व त्यामुळें सर्वांची मुक्ति सारखीच, अशी वस्तुस्थिति आहे.

**जगच्चित्रं स्वचैतन्ये पटे चित्रमिवार्पितम् ।**
**मायया तदुपेक्ष्यैव चैतन्यं परिशेष्यताम् ।।6-289।।**

वस्त्रावरील चित्राप्रमाणें आत्मचैतन्यावर मायेमुळें जगद्रूपी चित्र काढिलेलें आहे. यास्तव त्याची उपेक्षा करुन चैतन्याला अवशिष्ट ठेवावें.

**चित्रदीपमिमं नित्यं येऽनुसन्दधते बुधाः ।**
**पश्यन्तोऽपि जगच्चित्रं ते मुह्यन्ति न पूर्ववत् ।।6-290।।**

जे ज्ञानी या चित्रदीपाकडे नित्य अनुसंधान ठेवितात, ते हें जगच्चित्र पहात असले तरी पूर्वीप्रमाणें मोहित होत नाहींत.

**इति षष्ठोऽध्यायः ।।6।।**


---









**Shree Virupaksh Mandir Gopur & Pashan Rath at Vittal Mandir Hampi**




Shambhavi Chakra



।। जयति शांभवी । जयति शिवा जय ।।



आरती त्रिनयना। शंभू कैलासीचा राणा।।धृ।।
पंचमुखी परमेश्वर । कैलासी राहे निरंतर ।१। उज्जैनी सिध्देश्वर। आरती ओवाळु चरणावर ।२।
भूकैलास शिरगुर। तेथे राहे श्रीकल्मेश्वर ।३। निरंजन सांगे जोडोनी कर। आरती करी वारंवार ।४।

आरती सद्‌गुरुनाथा । स्वामी निरंजन समर्था । आरती सद्‌गुरुनाथा । स्वामी निरंजन समर्था ।।धृ।।
सदाचार सार साचा । मंत्र दिधला जीवनाचा । सर्व धर्माचा समन्वय । मार्ग दाविला अद्वय ।।1।।
विवेक वैराग्याचा दीप । लावुनी चरणासमीप । उज्जयिनी शाखा, विहंगम । शांभवी दीक्षा सुगम ।।2।।
दूर केले हो आवरण । त्रिवेणी संगमी स्नान । स्वयंप्रकाशे भगवान । निखळ आनंदी रममाण ।।3।।
सद्‌गुरुकृपा होता । अवघी हरपली चिंता । विनयानंद विनवी आता । चरणी ठेवूनिया माथा ।।4।।

## समन्वय से समाधि

**शुध्द, स्थिर, व्यापक आणि परिपूर्ण म्हणजे परमार्थ.**

www.vchindia.com

**Vinayanand Charitable Home India 416203**
'Kaivalya', 924/30, Vishalnagar, **HUPARI.** Dist. Kolhapur (MS) India- 416203
**Phone:- 0230-2450365 Mob. 0-93-2500-5525 Email:- vchindia@gmail.com**

Published by : Shri Krishna Dasharath Dhanavade (Vinayanand) At. Po. Hupari Dist. Kolhapur - 416203
Typing by : Sou.Sima Jyotiram Jadhav, At & Post : Jambhali Tal. Shirol Dist. Kolhapur Mob.09823061385
Copies : 500 Price : "Swadhyay" Printed by : Ajantha Mudranalaya Ph. : 0230-2434946, 09423041146